# ।। विवेकचूडामणि ।।

**।।ओम नमो शिवा ।।**
**।।श्री सद्‌गुरु प्रसन्न ।।**

**गुरुपौर्णिमेनिमित्त** विश्वगुरु श्रीनारायण, ब्रह्मदेव, नारदमहर्षि, श्रीवेदव्यास, शुकमुनी, गौडपाद, श्रीगोविंदपाद अशी श्रेष्ठ गुरुपरंपरा लाभलेले महानतपस्वी श्रीमद्‌आद्यशंकराचार्य यांचा जन्म (इसवी सन ७८८ मध्ये ) वैशाख शुक्ल पंचमी रोजी केरळ मधील कालडी ग्रामी, नंबुद्री ब्राह्मण कुलांत झाला. केवळ ३२ वर्षे आयुष्य लाभूनसुध्दा त्यांनी पूर्व दिशेला ऋग्वेदीय गोवर्ध्दन मठ,पश्चिमेस सामवेदीय शारदापीठ, दक्षिणेस यजुर्वेदीय श्रृंगेरी मठ आणि उत्तरेला अथर्ववेदीय ज्योतीर्मठाची स्थापना केली आहे. उपनिषद्‌, ब्रह्मसूत्र, विष्णु सहस्त्रनाम, गीता इत्यादी सूत्रे आणि श्लोक यांची सुलभ व्याख्या केली असून वेद-स्मृति, रामायण, महाभारत आणि अन्य कित्येक ग्रंथांचे अध्ययन करुन त्यांनी अद्वैत वेदांताचा मूलगामी सिध्दांत विश्वाला प्रदान केला आहे. तसेच कांही प्रकरणग्रंथही प्रकट झाले आहेत त्यांपैकीच **।। विवेकचूडामणि ।।** या ग्रंथाचे सार्थ प्रकाशन होताना आनंद होत आहे. या ग्रंथांमध्ये गुरुशिष्य सुसंवादरुपी १ ते ७५ प्रकरणे आहेत. एकूण श्लोक संख्या ५८१ इतकी असून २५४ ब हा १ श्लोक कांही ठिकाणी गृहित धरला जातो तो यामध्ये समाविष्ट केला आहे. कांही श्लोकांमध्ये पाठभेदही आढळतात. विवेक चूडामणि या ग्रंथातील साधन चतुष्टी तसेच अनुबंध चतुष्टी या संबंधी श्री सद्‌गुरु निरंजन महाराज खूप सोप्या भाषेमध्ये आपले विचार विशद करीत असत, स्वस्वरुपाचे अनुसंधान करणे याला भक्ति म्हणतात. साधकांनी या ग्रंथाचा यथोचित अभ्यास करुन आपले स्वरुपस्थितीला प्राप्त होणेसाठी प्रामाणिक प्रयत्न करावा. कारण **।।दुर्लभं त्रयमेवैतद्देवानुग्रहहेतुकम्‌ मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुषसंश्रयः ।।** या तीन गोष्टी दुर्लभ होत. आयुष्यामध्ये ईशकृपा, सद्‌गुरुकृपा, अंतःकरणकृपा आणि शास्त्रकृपा या चार कृपा श्रेष्ठ आहेत. सद्भक्तांना या कृपेचा लाभ होऊन जीवन कृतार्थ घडो. ही सद्‌गुरुचरणी विनम्र प्रार्थना.

VINAYANAND CHARITABLE HOME, INDIA 416 203
www.vchindia.com

**मंगळवार दिनांकः- ०७-०७-२००९, आषाढ शु ।।. १५ गुरुपौर्णिमा शके १९३१**
**स्थळः-श्री सद्‌गुरु निरंजन महाराज आश्रम मौजे वडगांव जिल्हा कोल्हापूर**
आश्रम फोन नं. ०२३०-२३५७११८, मोबाईल ०९४२०३३५७४८
आपला विनम्र
**विनयानंद ९४०३६८९१०५**

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**श्रीमत् शंकराचार्यकृत**

**|| विवेकचूडामणि ||**

**सर्ववेदान्तसिध्दान्तगोचरं तमगोचरम् गोविन्दं परमानन्दं सद्गुरुं प्रणतोऽस्म्यहम् ||१||**

सर्व वेदान्तसिध्दांताचा मुख्य विषय, नित्यानन्दस्वरुपी तद्वत् वाणी व मन यांच्या योगानें समजण्यास अशक्य अशा सद्गुरु गोविंदाला मी प्रणाम करितो.

**जन्तूनां नरजन्म दुर्लभमतः पुंस्त्वं ततो विप्रता**
**तस्माद्वैदिकधर्ममार्गपरता विद्वत्त्वमस्मात्परम्**
**आत्मानात्मविवेचनं स्वनुभवो ब्रह्मात्मना संस्थिति-**
**र्मुक्तिर्नो शतकोटिजन्मसु कृतैः पुण्यैर्विना लभ्यते ||२||**

प्राण्यांना नरदेहप्राप्ति दुर्लभ होय त्यांतही पुरुषदेह दुर्लभ. त्यांतही ब्राह्मण्य दुर्लभ होय. त्यांतही वेदोक्तधर्ममार्गाचे ठायी तत्परता असणें दुर्लभ होय. त्यांतही विद्वत्ता दुर्लभ होय. व त्यामध्येंही आत्मा व अनात्मा यांचे विवेचन होणे दुर्लभ होय व एवढ्या गोष्टी घडून आल्या तथापि अनुभव दुर्लभ. एवढेही होऊन ब्रह्मस्वरुपी लीन होणे अर्थात मुक्तिसाध्य होणें हे अतिदुर्लभ होय. तस्मात् अनेक जन्मांमध्ये कोट्यवधि सत्कर्मे केल्याशिवाय मुक्ति कदापि मिळत नाही.

**दुर्लभं त्रयमेवैतद्देवानुग्रहहेतुकम् मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुषसंश्रयः ||३||**

मनुष्यदेह, मोक्षाची इच्छा व सत्पुरुषांचा आश्रय ह्या तीन गोष्टी दुर्लभ होत. अशा दुर्लभ गोष्टी ईश्वराच्या प्रसादाने मिळतात.

**लब्ध्वा कथंचिन्नरजन्म दुर्लभं तत्रापि पुंस्त्वं श्रुतिपारदर्शनम्**
**यस्त्वात्ममुक्तौ न यतेत मूढधीः स ह्यात्महा स्वं विनिहन्त्यसद्ग्रहात् ||४||**

दुर्लभ नरदेह व त्यांमध्यें पुरुषदेह व त्यांमध्यें वेदशास्त्र बोध ही महाप्रयासाने प्राप्त झाली असून जो कोणी मूर्ख मोक्षप्राप्तीसाठी प्रयत्न करीत नाहीं तो आत्मघातकी अर्थात् आत्म्याची हिंसा करणारा होत्साता आपला नाश करुन घेतो.

**इतः को न्वस्ति मूढात्मा यस्तु स्वार्थे प्रमाद्यति**
**दुर्लभं मानुषं देहं प्राप्त तत्रापि पौरुषम् ||५||**

दुर्लभ मनुष्यदेह व त्यांमध्यें पुरुषदेह प्राप्त झाला असता जो आपल्या स्वार्थाचे ठायी दुर्लक्ष करितो त्यापेक्षा दुसरा मूढात्मा म्हणजे मूर्ख पुरुष कोण बरे आहे ?

**वदन्तु शास्त्राणि यजन्तु देवान्कुर्वन्तु कर्माणि भजन्तु देवताः**
**आत्मैक्यबोधेन विना विमुक्ति-र्नसिध्यति ब्रह्मशतान्तरेऽपि ||६||**

लोक अनेक शास्त्रें बोलोत, अनेक देवांची पूजा करोत, अनेक कर्मे आचरोत, अनेक देवतांला भजोत; परंतु आत्म्याच्या ऐक्याचा बोध झाल्यांवाचून शेकडो ब्रह्मदेव होऊन गेले तथापि मुक्ति म्हणून प्राप्त व्हावयाची नाहीं.

**अमृतत्त्वस्य नाशास्ति वित्तेनेत्येव हि श्रुतिः**
**ब्रवीति कर्मणो मुक्तेरहेतुत्वं स्फुटं यतः||७||**

द्रव्याचे योगाने मोक्ष प्राप्त होण्याची आशा नाहीं, अशी श्रुति आहे. तद्वत् कर्माच्या योगानेही मुक्ति मिळण्याची आशा नाहीं, असे स्पष्ट श्रुति सांगत आहे.

**अतो विमुक्त्यै प्रयतेत् विद्वान् संन्यस्तबाह्यार्थसुखस्पृहः सन्**

V
pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**सन्तं महान्तं समुपेत्य देशिकं तेनोपदिष्टार्थसमाहितात्मा ||८||**
या कारणांकरिता बाह्य विषयसुखाची इच्छा टाकून मोठ्या सद्‌गुरूचा आश्रय धरुन त्यांच्या उपदेशाने एकाग्र चित्त करुन विद्वानाने मुक्ति प्राप्त होण्यासाठी प्रयत्न करावा.

**उद्धरेदात्मनात्मानं मग्नं संसारवारिधौ योगारुढत्वमासाद्य सम्यग्दर्शननिष्ठया ||९||**
योग काय आहे ? हे जाणून सर्वांभूती निष्ठापूर्वक समदृष्टि ठेवून या मायान्वित संसारसमुद्रामध्ये निमग्न झालेल्या आत्म्याचा आत्मानात्मविचाराने उद्धार करावा.

**संन्यस्य सर्वकर्माणि भवबन्धविमुक्तये**
**यत्यतां पण्डितैर्धीरैरात्माभ्यास उपस्थितैः ||१०||**
गंभीर, ज्ञात्या, व तत्पर विद्वानांनी भवबंधनापासून मुक्त होण्यासाठी सर्व कर्माचा न्यास (त्याग करुन ) आत्मानात्मविचाराचा निदिध्यास ठेवावा, अर्थात् मनामध्यें वारंवार एकसारखे चिंतन करावे.

**चित्तस्य शुध्दये कर्म न तु वस्तूपलब्धये**
**वस्तुसिद्धिर्विचारेण न किंचित्कर्मकोटिभिः ||११||**
कर्म जे आपण करितो ते फक्त अन्तःकरणाचे शुध्दीसाठी होय; वस्तुप्राप्तिकरिता नव्हे. वस्तूची सिद्धि विचाराच्या योगाने होते; कोट्यावधि कर्मे केली म्हणून कांही होत नाहीं.

**सम्यग्विचारतः सिद्धा रज्जुतत्त्वावधारणा**
**भ्रान्त्योदितमहासर्पभयदुःखविनाशिनी ||१२||**
चांगल्या विचाराच्या योगाने सिद्ध झालेला रज्जूच्या सत्य स्वरुपाचा निश्चय-जसा भ्रान्ती पावलेल्या अविचारी जनांनी मानलेल्या सर्पभयरुपी दुःखाचा नाश करितो, तद्वत् सुविचाराने जन्ममरणरुप संसाराचा नाश होऊन मोक्ष प्राप्त होतो.

**अर्थस्य निश्चयो दृष्टो विचारेण हितोक्तितः**
**न स्नानेन न दानेन प्राणायमशतेन वा ||१३||**
सत्यवक्त्या पुरुषाच्या सांगण्यावरुन आत्मस्वरुप कसे आहे याचा निश्चय पूर्ण विचारान्ती करता येतो. शेकडो स्नाने केली शेकडो दाने दिली व शेकडो प्राणायाम खेचले तथापि त्यांच्या योगाने आत्मस्वरुपाचा निश्चय कदापि करिता येणार नाहीं.

**अधिकारिणमाशास्ते फलसिध्दिर्विशेषतः**
**उपाया देशकालाद्याः सन्त्यस्मिन्सहकारिणः ||१४||**
विशेषकरुन फलाचि सिध्दि होण्याकरिता, फलसिध्दि इच्छिणारा, योग्य अधिकारी असण्याची फारच आवश्यकता आहे व अशा कामी देश, काल इत्यादि उपाय साहाय्य करणारे आहेत.

**अतो विचारः कर्तव्यो जिज्ञासोरात्मवस्तुनः ||**
**समासाद्य दयासिन्धुं गुरुं ब्रह्मविदुत्तमम् ||१५||**
याकरिता आत्मस्वरुप जाणण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषाने प्रथमतः दयाळू व ब्रह्मजाणत्या पुरुषांमध्ये उत्तम असा गुरु पाहून त्यांजपाशी जाऊन नंतर आत्मस्वरुपाचा पूर्ण विचार करावा.

**मेधावी पुरुषो विद्वानुहापोहविचक्षणः**
**अधिकार्यात्मविद्यायामुक्तलक्षणलक्षितः ||१६||**

V
**pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files**
**Get yours now!**
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

आत्मविद्याप्राप्त्यर्थ अधिकाऱ्याची आवश्यकता असते.
तो अधिकारी उत्तम बुध्दिमान, विद्वान, भवति न भवति चालविण्याचे कामी
प्रवीण व शास्त्रोक्त लक्षणांनी युक्त असा पाहिजे.

**विवेकिनो विरक्तस्य शमादिगुणशालिनः**
**मुमुक्षोरेव हि ब्रह्मजिज्ञासायोग्यता मता ।।१७।।**

आत्मानात्मविवेक जाणणारा; संसारात विरक्त; शम, दम, इत्यादि गुणांनी युक्त व
मोक्षप्राप्तीला उत्सुक, अशा पुरुषालाच ब्रह्मजिज्ञासेचा अधिकार आहे.

**साधनान्यत्र चत्वारि कथितानि मनीषिभिः**
**येषु सत्स्वेव सन्निष्ठा यदभावे न सिध्यति ।।१८।।**

ज्ञात्या विचारी सिध्द पुरुषांनी याविषयी चार साधने सांगितली आहेत
ही असली तरच ब्रह्मनिष्ठा सिध्द होते. नाही तर नाही.

**आदौ नित्यानित्यवस्तुविवेकः परिगण्यते**
**इहामुत्र फलभोगविरागस्तदनन्तरम् ।।१९।।**
**शमादिषट्कसम्पत्तिर्मुमुक्षुत्वमिति स्फुटम्**
**ब्रह्म सत्यं जगन्मिथ्येत्येवंरुपो विनिश्चयः ।।२०।।**
**सोऽयं नित्यानित्यवस्तुविवेकः समुदाहृतः**
**तद्वैराग्यं जुगुप्सा या दर्शनश्रवणादिभिः ।।२१।।**
**देहादिब्रह्मपर्यन्ते ह्यनित्ये भोगवस्तुनि**
**विरज्य विषयव्रातादोषदृष्ट्या मुहुर्मुहुः ।।२२।।**
**स्वलक्ष्ये नियतावस्था मनसः शम उच्यते ।**
**विषयेभ्यः परावर्त्य स्थापनं स्वस्वगोलके ।।२३।।**
**उभयेषामिन्द्रियाणां स दमः परिकीर्तितः**
**बाह्यानालम्बनं वृत्तेरेषोपरतिरुत्तमा ।।२४।।**

प्रथमतः नित्य व अनित्य अर्थात् नाशवंत व अक्षय वस्तूचा विचार गणलेला आहे. व
नंतर इहलोकींच्या व परलोकींच्या फलभोगाचे ठायी विरक्तता मानलेली आहे.
शमदमादिक सहा साधनांची संपत्ति व मोक्षप्राप्तीच्छा ही चार साधने स्पष्ट होत. ब्रह्म हे
सत्य, अविनाशी होय. जग हे मिथ्या विनाशी (नाशवंत) होय असा जो मनाचा
निश्चय करणे त्याला नित्यानित्यवस्तूंचा विवेक अर्थात पृथक्पणाचे ज्ञान ही संज्ञा
होय. देहापासून ब्रह्मलोकापर्यंत ज्या प्रत्यक्ष पाहिलेल्या व कानांनी ऐकलेल्या
भोगवस्तू त्या टाकण्याची इच्छा होणे याचे नांव वैराग्य होय. विषय सदोष आहेत
असे वारंवार ध्यानी मनी आणून विषयांच्या समुदायाचे ठायी वारंवार विरक्ति उत्पन्न
होऊन आत्मवस्तूच्या ठिकाणी जी कांहीं निश्चित स्थिति उत्पन्न होते तिजला शम
अशी संज्ञा होय. ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये यांना विषयांपासून परतवून त्यांची त्यांच्या
त्यांच्या गोलकाचे ठायी स्थापना करणे, याला दम म्हणतात. चित्तवृत्तीला बहिर्मुख न
होऊ देणे, याचेच नांव उत्कृष्ट उपरति होय.

**सहनं सर्वदुःखानामप्रतीकारपूर्वकम्**
**चिन्ताविलापरहितं सा तितिक्षा निगद्यते ।।२५।।**

**pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files**
**Get yours now!**
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

निवारणार्थ उपाय न करिता दुःख सहन करणे व चिंता आणि शोक येणेकरुन रहित असणे अशा मनोवृत्तीला तितिक्षा म्हणतात.

**शास्त्रस्य गुरुवाक्यस्य सत्यबुद्ध्यवधारणम्**
**सा श्रध्दा कथिता सद्भिर्यया वस्तूपलभ्यते ||२६||**

शास्त्रांवर व गुरुवचनावर, ते सत्य आहे असा जो निश्चय त्याला ज्ञानी साधुजन श्रद्धा म्हणतात, की ज्या श्रध्देने आत्मवस्तु प्राप्त होते.

**सर्वदा स्थापनं बुद्धेः शुद्धे ब्रह्मणि सर्वथा**
**तत्समाधानमित्युक्तं न तु चित्तस्य लालनम् ||२७||**

अन्तकरणाला पाहिजे तो विषय देऊन संतुष्ट करणे हे कांहीं समाधान नव्हे. तर दोषरहित परमात्म्याचे ठायी सदा सर्वदा बुद्धि निमग्न करणे याचे नांव समाधान.

**अहंकारादिदेहान्तान्बन्धानज्ञानकल्पितान्**
**स्वस्वरुपावबोधेन मोक्तुमिच्छा मुमुक्षुता ||२८||**

अहंकारापासून देहापर्यंत जी बंधने अज्ञानाने कल्पिलेली आहेत त्या बन्धनांपासून स्वस्वरुपाच्या बोधाने मुक्त होण्याची जी इच्छा तिला मुमुक्षता ही संज्ञा होय.

**मन्दमध्यमरुपापि वैराग्येण शमादिना**
**प्रसादेन गुरोः सेयं प्रवृद्धा सूयते फलम् ||२९||**

ही जी मोक्षप्राप्तीची इच्छा ती मंद किंवा मध्यम जरी असली; तथापि विषयाचे ठायी वैराग्य ठेवल्याने शम, दमादि साधनानें व सद्गुरुंच्या प्रसादाने ती परिपक्व होऊन मोक्षफलास प्रसवते.

**वैराग्यं च मुमुक्षुत्वं तीव्रं यस्य तु विद्यते**
**तस्मिन्नेवार्थवन्तः स्युः फलवन्तः शमादयः||३०||**

ज्या पुरुषाची मोक्षप्राप्तीची इच्छा व वैराग्य ही तीव्र असतात अशा विरक्त पुरुषाचेच ठायी पूर्वोक्त,शम, दमादि गुण फलद्रूप होतात.

**एतयोर्मन्दता यत्र विरक्तत्वमुमुक्षयोः**
**मरौ सलीलवत्तत्र शमादेर्भासमात्रता ||३१||**

वैराग्य आणि मुक्त होण्याची इच्छा ही जेथे मंद असतात तेथे, जसे निर्जल प्रदेशात मृगजळ भासते त्याप्रमाणे शमादिक आभासमात्र असतात.

**मोक्षकारणसामग्र्यां भक्तिरेव गरीयसी**
**स्वस्वरुपानुसन्धानं भक्तिरित्यभिधीयते ||३२||**

मोक्ष होण्यास जी सामग्री लागते तीत भक्ति फार श्रेष्ठ आहे. स्वस्वरुपाचे अनुसंधान करणे याला भक्ति म्हणतात.

**स्वात्मतत्त्वानुसन्धानं भक्तिरित्यपरे जगुः**
**उक्तसाधनसंपन्नस्तत्त्वजिज्ञासुरात्मनः ||३३||**
**उपसीदेद्गुरुं प्राज्ञ्यं यस्माद्बन्धविमोक्षणम्**
**श्रोत्रियोऽवृजिनोऽकामहतो यो ब्रह्मवित्तमः||३४||**
**ब्रह्मण्युपरतः शान्तो निरिन्धन इवानलः**
**अहेतुकदयासिन्धुर्बन्धुरानमतां सताम् ||३५||**

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

दुसरे म्हणतात की, स्वात्मतत्त्वाचे अनुसंधान ठेवणे याचे नाव भक्ति. वर जी साधने सांगितली आहेत त्या साधनांच्या योगाने आत्म्याचे तत्त्व जाणण्याची इच्छा जो पुरुष करितो. त्या पुरुषाने विद्वान सद्‌गुरुला शरणागत जावे म्हणजे संसारबंधनापासून सुटका होईल. पूर्वनिर्दिष्ट गुरु कसा असला पाहिजे तर चतुर्वेद जाणणारा, निर्दोष, निरिच्छ, ब्रह्मज्ञानी, जनांमध्ये श्रेष्ठ, ब्रह्माचे ठायी लीन, निरिंधन अर्थात काष्ठरहित अग्नीप्रमाणे शांत, कांहीं कारणाशिवाय दयेचा केवळ समुद्र व नम्र सत्पुरुषांचा बांधव, अशा प्रकारचा असावा.

**तमाराध्य गुरुं भक्त्या प्रव्हप्रश्रयसेवनैः**
**प्रसन्नं तमनुप्राप्य पृच्छेज्ज्ञातव्यमात्मनः ||३६||**

अशा गुरुचे उक्त प्रकाराच्या योगाने अर्थात भक्तीने, नम्रतेने प्रीतीने व सेवनाने आराधन करुन समीप जाऊन त्याला प्रसन्न करावे व आपणाला जाणण्यायोग्य जे आत्मज्ञान वगैरे ते पुढे लिहिल्याप्रमाणे विचारावे.

**स्वामिन्नमस्ते नतलोकबन्धो कारुण्यसिन्धो पतितं भवाब्धौ**
**मामुद्धरात्मीयकटाक्षदृष्ट्या ऋज्व्यातिकारुण्यसुधाभिवृष्ट्या ||३७||**

हे स्वामिन् -गुरो ! हे भक्तलोकबंधो ! करुणासागर !! मी जो या संसाररुपी समुद्रात पडलेला आहे त्या माझा आपल्या सरळ करुणामृतवृष्टिकारक कटाक्षदृष्टीने उद्धार करा.

**दुर्वारसंसारदावाग्नितप्तं दोधूयमानं दुरदृष्टवातैः**
**भीतं प्रपन्नं परिपाहि मृत्योः शरण्यमन्यद्यदहं न जाने ||३८||**

हे गुरो ! टाळण्यास अशक्य व दुःसह अशा संसाररुपी दावाग्नीमध्ये मी पोळून गेलो आहे. व दुष्ट प्रारब्धरुपी वायूने भयभीत होऊन कंपायमान झालो आहे. तर अशा संकटापासून माझे संरक्षण करा. मी आपल्याला अनन्य भावे शरणागत आहे. आपणाशिवाय रक्षण करणारा अन्य कोणी मी जाणत नाहीं, अर्थात आपल्यावाचून त्राता अन्य कोणी नाहीं.

**शान्ता महान्तो निवसन्ति सन्तो वसन्तवल्लोकहितं चरन्तः**
**तीर्णाः स्वयं भीमभवार्णवं जना न हेतुनान्यानपि तारयन्तः ||३९||**

वसंताप्रमाणे लोकांचे हित करणारे, शांत आणि थोर असे सज्जन स्वतः घोर संसारसागराला तरुन कांहीं स्वार्थावाचून ( अर्थात केवळ दयेने ) इतरांना तारीत होत्साते (या जगी ) राहतात.

**अयं स्वभावः स्वत एव यत्पर - श्रमापनोदप्रवणं महात्मनाम्**
**सुधांशुरेष स्वयमर्ककर्कश - प्रभाभितप्तामवति क्षितिं किल ||४०||**

दुसऱ्याचे श्रम दूर करण्यास स्वतः तत्पर असणे हा थोरांचा स्वभावच होय. हा चंद्र सूर्याच्या प्रखर किरणांनी सर्वोपरी तापलेल्या पृथ्वीचे स्वतः होऊन रक्षण करतो; म्हणजे आपल्या शीतल किरणांनी तिचा ताप दूर करतो.

**ब्रह्मानन्दरसानुभूतिकलितैः पूर्तैः सुशीतैः सितै-**
**र्युष्मद्वाक्कलशोज्झितैः श्रुतिसुखैर्वाक्यामृतैः सेचय**
**संतप्तं भवतापदावदहनज्वालाभिरेनं प्रभो**
**धन्यास्ते भवदीक्षणक्षणगतेः पात्रीकृताः स्वीकृताः ||४१||**

V
pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

**कथं तरेयं भवसिन्धुमेतं का वा गतिर्मे कतमोऽस्त्युपायः**
**जाने न किंचित्कृपयाव मां प्रभो संसारदुःखक्षतिमातनुष्व ।।४२।।**
**तथा वदन्तं शरणागतं स्वं संसारदावानलतापतप्तम्**
**निरिक्ष्य कारुण्यरसार्द्रदृष्ट्या दद्यादभीतिं सहसा महात्मा ।।४३।।**

''प्रभो ! ब्रह्मानंदरसाच्या अनुभवाने युक्त, पवित्र, फारच शीत, सयुक्तिक, तुमच्या वाणीरुप कलशातून निघालेल्या आणि कानाला गोड लागणाऱ्या अशा वाक्यरुप अमृतांनी आपण मला स्नान घाला. कारण, प्रापंचिक ताप हाच एक दावाग्नि त्याच्या ज्वालांनी मी संतप्त झालेला आहे. जे तुमच्या कृपाकटाक्षाच्या गतीला क्षणभर पात्र झाले; म्हणजे त्यांच्याकडे तुम्ही क्षणभर कृपादृष्टीने पाहिले, ते तुम्ही अंगीकारलेले लोक धन्य होत. या भवसागराला कसा तरु; माझी काय गति होईल; ( सद्‌गतीचा ) उपाय कोणता; हे मी कांहींच जाणत नाहीं. प्रभो ! कृपा करुन माझे रक्षण करा, आणि, माझ्या संसारसंबंधी दुःखांचा नाश करा.'' अशा प्रकारे बोलणारा आणि संसाररुप दावाग्नीच्या तापाने तापलेला जो आपला शिष्य, त्याला दयेच्या पाझराने ओलसर झालेल्या दृष्टीने पाहून उदार अंतःकरणाच्या सद्‌गुरुने एकदम अभय द्यावे.

**विद्वान्स तस्मा उपसत्तिमीयुषे मुमुक्षवे साधु यथोक्तकारिणे**
**प्रशान्तचित्ताय शमान्विताय तत्त्वोपदेशं कृपयैव कुर्यात् ।।४४।।**

शरण आलेला, मोक्षाची इच्छा करणारा, सांगितल्याप्रमाणे उत्तम रीतीने करणारा, अगदी शांत ज्याचे चित्त, आणि जो जितेंद्रिय अशा शिष्याला त्या ज्ञानी सद्‌गुरुने केवळ दयेने ब्रह्मतत्त्वाचा उपदेश करावा.

**।।श्री गुरुरुवाच।।**

**मा भैष्ट विद्वंस्तव नास्त्यपायः संसारसिन्धोस्तरणेऽस्त्युपायः**
**येनैव याता यतयोऽस्य पारं तमेव मार्गं तव निर्दिशामि ।।४५।**

सद्‌गुरु म्हणाले - बा जाणत्या ! भिऊ नको. तुझा नाश होणार नाहीं. संसारसागराच्या तरण्यास उपाय आहे. पुरातन संन्यासी ज्या मार्गाने या संसारसागराच्या पार गेले, तोच मार्ग मी तुला सांगतो.

**अस्त्युपायो महान्कश्चित्संसारभयनाशनः**
**येन तीर्त्वा भवाम्भोधिं परमानन्दमाप्स्यसि ।।४६।।**

संसारसंबंधी भय नाहींसे करणारा एक मोठा उपाय आहे. त्या योगाने तू संसारसागराला तरुन परमानंदाला प्राप्त होशील.

**वेदान्तार्थविचारेण जायते ज्ञानमुत्तमम्**
**तेनात्यन्तिकसंसारदुःखनाशो भवत्यनु ।।४७।।**

वेदान्तशास्त्राच्या अर्थाचा विचार केल्याने उत्तम ज्ञान होते. नंतर त्या ज्ञानाच्या योगाने संसारसंबंधी दुःखांचा अगदी नाश होतो.

**श्रध्दाभक्तिध्यानयोगाम्मुमुक्षो - र्मुक्तेर्हेतून्वक्ति साक्षाच्छ्रुतेर्गीः**
**यो वा एतेष्वेव तिष्ठत्यमुष्य मोक्षोऽविद्याकल्पिताद्देहबन्धात् ।।४८।।**

श्रध्दा, भक्ति आणि ध्यानयोग हे मुक्त होऊ इच्छिणाऱ्याला मुक्तीचे उपाय आहेत, असे साक्षात वेदवाणी सांगते. जो या उपायांवरच अवलंबून राहतो, त्याची अविद्येने

**pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files**
**Get yours now!**
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

कल्पिलेल्या देहबंधनापासून सुटका होते.

**अज्ञानयोगात्परमात्मनस्तव ह्यनात्मबन्धस्तत एव संसृतिः**
**तयोर्विवेकोदितबोधवन्हिरज्ञानकार्यं प्रदहेत्समूलम् ।।४९।।**

वस्तुतः ब्रह्मस्वरुपी अशा तुला स्वरुपाच्या अज्ञानाने या देहादिक अनात्मवस्तूंपासून बंधन प्राप्त झाले आहे. आणि यापासूनच संसार प्राप्त झाला आहे. या आत्मा आणि अनात्मा या दोहोंच्या विवेचनापासून उदयास आलेला ज्ञानरुप अग्नि अज्ञानाला व त्याच्या कार्याला समूळ जाळून टाकील.

**।।शिष्य उवाच।।**

**कृपया श्रूयतां स्वामिन् प्रश्नोऽयं क्रियते मया**
**तदुत्तरमहं श्रुत्वा कृतार्थः स्यां भवन्मुखात् ।।५०।।**

शिष्य म्हणाला, स्वामिन ! मी हा प्रश्न करीत आहे, तो कृपा करुन श्रवण करावा. या प्रश्नाचे उत्तर आपल्या मुखांतून श्रवण करुन मी कृतार्थ होईन.

**को नाम बन्ध कथमेष आगतः कथं प्रतिष्ठास्य कथं विमोक्षः**
**कोऽसावनात्मा परमः क आत्मा तयोर्विवेकः कथमेतदुच्यताम् ।।५१।।**

बंध म्हणजे काय? हा आला कसा? याची स्थिती कशी आहे? आणि यापासुन सुटका कशी होईल? अनात्मा तो कोणता? स्वरुपभूत परमात्मा कोणता? आणि त्याचे विवेचन कसे ? हे सांगावे.

**।।श्रीगुरुरुवाच।।**

**धन्योऽसि कृतकृत्योऽसि पावितं ते कुलं त्वया**
**यदविद्याबन्धमुक्त्या ब्रह्मीभवितुमिच्छसि ।।५२।।**

सद्गुरु म्हणाले - तू धन्य आहेस. कृतकृत्य आहेस. तू आपले कुल पवित्र केलेस. कारण, तू अविद्याबंधनापासून मुक्त होऊन ब्रह्म होऊ इच्छित आहेस.

**ऋणमोचनकर्तारः पितुः सन्ति सुतादयः**
**बन्धमोचनकर्ता तु स्वस्मादन्यो न कश्चन ।।५३।।**

मुले इत्यादिक लोक बापाला ऋणांतून मुक्त करणारे असतात; पण संसारबंधनांतून सोडविणारा स्वतांहून दुसरा कोणीही नाहीं.

**मस्तकन्यस्तभारादेर्दुःखमन्यैर्निवार्यते**
**क्षुधादिरकृतदुःखं तु विना स्वेन न केनचित् ।।५४।।**

मस्तकावर ठेवलेल्या ओझ्याचे किंवा दुसऱ्या कशाचे दुःख इतर लोक (ओझे वगैरे हलके करुन) दूर करु शकतात, पण क्षुधादिकांपासून झालेले दुःख स्वतःवाचून कोणाच्यानेहि ते दूर करवत नाहीं.

**पथ्यमौषधसेवा च क्रियते येन रोगिणा**
**आरोग्यसिध्दिर्दृष्ट्या नान्यानुष्ठितकर्मणा।।५५।।**

जो रोगी पथ्य करतो. आणि औषधसेवन करतो, त्याला आरोग्य प्राप्त झाल्याचे आढळात येते; पण रोग्याच्या ऐवजी दुसरा जर कोणी पथ्य व औषधसेवन करु लागले तर त्याच्या योगाने रोग्याला आरोग्य प्राप्त झाल्याचे आढळत नाहीं.

**वस्तुस्वरुपं स्फुटबोधचक्षुषा स्वेनैव वेद्यं ननु पण्डितेन**

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

**चन्द्रस्वरुपं निजचक्षुषैव ज्ञातव्यमन्यैरवगम्यते किम् ||५६||**

आत्म्याचे स्वरुप अपरोक्ष ज्ञानरुप नेत्राने स्वतःलाच समजण्यास शक्य आहे.
पण ते पंडिताच्या द्वाराने प्रत्यक्ष जाणण्यास शक्य नाहीं.
जसे चंद्राचे बिंब स्वतःच्या नेत्रांनीच प्रत्यक्ष दिसू शकेल,
पण इतर लोकांच्या द्वाराने ते आपल्याला प्रत्यक्ष दिसू शकेल का?

**अविद्याकामकर्मादिपाशबन्धं विमोचितुम्**
**कः शक्नुयाद्विनात्मानं कल्पकोटिशतैरपि ||५७||**

शेकडो कोटी कल्प गेले तरी; अविद्या, काम, कर्म इत्यादिक पाशांच्या बन्धाला
सोडविण्यास स्वतःवाचून दुसरा कोण समर्थ होईल?

**न योगेन न सांख्येन कर्मणा नो न विद्यया**
**ब्रह्मात्मैकत्वबोधेन मोक्षः सिध्यति नान्यथा ||५८||**

योग, सांख्य, कर्म, अथवा विद्या यांच्या योगाने मोक्ष होत नाहीं. तर जीव आणि ब्रह्म
यांच्या ऐक्यज्ञानानेच मोक्ष होतो. अन्यथा नाहीं.

**वीणाया रुपसौन्दर्यं तन्त्रीवादनसौष्ठवम्**
**प्रजारञ्जनमात्रं तन्न साम्राज्याय कल्पते||५९||**

सतारीचा सुंदर आकार व तिच्या तारा छेडण्यामध्ये कुशलता, हे सर्व जनरंजनमात्र
आहे; यापासून कांहीं मोक्षप्राप्ति होऊ शकणार नाहीं !

**वाग्वैखरी शब्दझरी शास्त्रव्याख्यानकौशलम्**
**वैदुष्यं विदुषां तद्वद्भुक्तये न तु मुक्तये ||६०||**

तद्वत् शब्दांची केवळ झारीच अशी विद्वानांची वैखरी वाणी ,
त्यांचे शास्त्राची परिस्फुटता करण्याचे कौशल्य, तशीच त्यांची विद्वता
हे सर्व भोगासाठी आहे; मोक्षासाठी नाहीं.

**अविज्ञाते परे तत्त्वे शास्त्राधीतिस्तु निष्फला**
**विज्ञातेऽपि परे तत्त्वे शास्त्राधीतिस्तु निष्फला ||६१||**

आत्म्याचे स्वरुप जाणले नाहीं तर केलेला शास्त्राभ्यास फोल होय.
तद्वत् आत्मस्वरुप जाणल्यानंतर शास्त्राभ्यास फोल होय.

**शब्दजालं महारण्यं चित्तभ्रमणकारणम्**
**अतः प्रयत्नाज्ज्ञातव्यं तत्त्वज्ञानात्तत्त्वमात्मनः||६२||**

शब्दजाल हे एक मोठे जंगल आहे. ते चित्ताला भांबावून सोडण्यास मात्र कारण आहे.
यासाठी ( शब्दजालांत न पडता) प्रयत्नाने तत्त्वज्ञानापासून आत्मतत्त्व जाणावे.

**अज्ञानसर्पदष्टस्य ब्रह्मज्ञानौषधं विना**
**किमु वेदैश्च शास्त्रैश्च किमु मन्त्रैः किमौषधैः ||६३||**

अज्ञानरुप सर्पाने ज्याला दंश केला अशा मनुष्याला एका ब्रह्मज्ञानरुप औषधावाचून;
वेद, शास्त्रें, मंत्र आणि लौकिक औषधे यांच्या योगाने काय होणार आहे? कांहींही
होणार नाहीं.

**न गच्छति विना पानं व्याधिरौषधशब्दतः**
**विनाऽपरोक्षानुभवं ब्रह्मशब्दैर्न मुच्यते ||६४||**

V
pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

औषध प्याल्यावाचून केवळ औषधाचे नाव घेतल्याने रोग जसा जात नाहीं तद्वत्
अपरोक्ष ज्ञान झाल्यावाचून केवळ 'ब्रह्म ब्रह्म' असा जप केल्याने जीव मुक्त होत नाहीं.

**अकृत्वा दृश्यविलयमज्ञात्वा तत्त्वमात्मनः**
**ब्रह्मशब्दैः कुतो मुक्तिरुक्तिमात्रफलैर्नृणाम् ||६५||**

दृश्य पदार्थांचा लय केल्यावाचून व आत्मतत्त्व जाणल्यावाचून;
केवळ कंठशोष हेच मात्र ज्याचे फल अशा पोकळ शब्दांनी
मनुष्यांना मोक्ष कोठून होणार? व्हावयाचा नाहीं.

**अकृत्वा शत्रुसंहारमगत्वाखिलभूश्रियम्**
**राजाहमिति शब्दान्नो राजा भवितुमर्हति ||६६||**

शत्रूंचा नायनाट केल्यावाचून व सकल पृथ्वीचे ऐश्वर्य मिळविल्यावाचून केवळ
'मी राजा मी राजा' असा घोष केल्याने कोणी राजा होण्यास पात्र होत नाहीं.

**आप्तोक्तिं खननं तथोपरि शिलाद्युत्कर्षणं स्वीकृतिं**
**निक्षेपः समपेक्षते नहि बहिः शब्दैस्तु निर्गच्छति**
**तद्वद् ब्रह्मविदोपदेशमननध्यानादिभिर्लभ्यते**
**मायाकार्यतिरोहितं स्वममलं तत्त्वं न दुर्युक्तिभिः ||६७||**

भूमीत पुरुन ठेवलेले द्रव्य काढण्याला; प्रामाणिक मनुष्याने सांगण्याची, खणण्याची,
तशीच त्यावर असलेली शिळा वगैरे एकीकडे करण्याची आणि ते हस्तगत करुन
घेण्याची जशी आवश्यकता आहे, केवळ बाहेर पुष्कळ ओरड केल्याने ते जसे निघत
नाहीं, तद्वत मायेने आणि तिच्या कार्याने झाकलेले शुध्द आत्मतत्त्व परोक्ष ब्रह्मज्ञान्याला
उपदेश, मनन, ध्यान इत्यादिक उपायांनी प्राप्त होते. कुतर्कांनी होत नाहीं.

**तस्मात्सर्वप्रयत्नेन भवबन्धविमुक्तये**
**स्वैरवे यत्नः कर्तव्यो रोगादाविव पण्डितैः ||६८||**

तस्मात्, रोगादिक जाण्याविषयी जसा स्वतःच प्रयत्न केला पाहिजे, तद्वत भवबंधनातून
सुटका होण्यासाठी शहाण्या मनुष्यांनी स्वतःच सर्वथा प्रयत्न केला पाहिजे.

**यस्त्वयाद्य कृतः प्रश्नो वरीयाञ्छास्त्रविन्मतः**
**सूत्रप्रायो निगूढार्थो ज्ञातव्यश्च मुमुक्षुभिः ||६९||**

जो तू आता प्रश्न केलास तो सर्वोत्कृष्ट आहे; शास्त्रज्ञांना मान्य आहे; सूत्रभूत
आहे; त्याचे उत्तर गुप्त आहे; आणि तो मुमुक्षुजनांनी जाणण्याजोगा आहे.

**शृणुष्वावहितो विद्वन्यन्मया समुदीर्यते**
**तदेतच्छ्रवणात्सद्यो भवबन्धाद्विमोक्ष्यसे||७०||**

सुज्ञा ! या प्रश्नाचे जे मी उत्तर सांगतो; ते तू चित्त देऊन श्रवण कर, याचे श्रवण
केल्याने तू खरोखर भवबंधनातून मुक्त होशील.

**मोक्षस्य हेतुः प्रथमो निगद्यते वैराग्यमत्यन्तमनित्यवस्तुषु**
**ततः शमश्चापि दमस्तितिक्षा न्यासः प्रसक्ताखिलकर्मणां भृशम् ||७१||**

अनित्य वस्तूंच्या ठिकाणी वैराग्य हे मोक्षाचे पहिले कारण सांगतात.
आणि त्या मागून शम, दम, तितिक्षा व चिकटलेल्या सकल कर्मांचा
अत्यंत त्याग ही मोक्षाची साधने सांगतात.

V
pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**ततः श्रुतिस्तन्मननं सतत्त्व - ध्यानं चिरं नित्यनिरन्तरं मुनेः**
**ततोऽविकल्पं परमेत्य विद्वानिहैव निर्वाणसुखं समृच्छति ।।७२।।**

तदनंतर वेदान्तश्रवण, श्रवण केलेल्याचे मनन आणि ध्यानामध्ये खंड न पाडता एकसारखे पुष्कळ काळपर्यंत निदिध्यासन ही मुमुक्षुला मोक्षाची साधने सांगितली आहेत. परिपूर्ण निदिध्यासन झाल्यानंतर निर्विकल्प अशा परब्रह्म स्वरुपास प्राप्त होऊन ज्ञानी या लोकीच मोक्षसुखाला पावतो.

**यद्बोद्धव्यं तवेदानीमात्मानात्मविवेचनम्**
**तदुच्यते मया सम्यक् श्रुत्वात्मन्यवधारय ।। ७३।।**

आता तुला जे आत्मा आणि अनात्मा यांचे विवेचन समजून घ्यायचे ते मी उत्तम रीतीने सांगतो. ते श्रवण करुन तू आपल्या चित्तात ठसवून घे.

**मज्जास्थिमेदः पलरक्तचर्म - त्वगाह्वयैर्धातुभिरेभिरन्वितम्**
**पादोरुवक्षोभुजपृष्ठमस्तकै- रङ्गैरुपाङ्गैरुपयुक्तमेतत् ।।७४।।**

मी आणि माझे अशा नात्याने प्रसिध्द असे जे हे मोहाचे स्थानभूत शरीर ते मज्जा, अस्थि, मेद, मांस, रक्त, चर्म, आणि त्वचा या नावांच्या धातूंनी वेढले आहे आणि पाय, मांड्या, उर, बाहु, पाठ, आणि मस्तक या अंगांनी व उपांगांनी युक्त आहे. या शरीराला विद्वान लोक स्थूल शरीर म्हणतात

**अहंमतेति प्रथितं शरीरं मोहास्पदं स्थूलमितीर्यते बुधैः**
**नभोनभस्वद्दहनाम्बुभूमयः सूक्ष्माणि भूतानि भवन्ति तानि ।।७५।।**
**परस्परांशैर्मिलितानि भूत्वा स्थूलानि च स्थूलशरीरहेतवः**
**मात्रास्तदीया विषया भवन्ति शब्दादयः पञ्च सुखाय भोक्तुः।।७६।।**

आकाश, वायु, अग्नि, जल, आणि भूमि ही पाच सूक्ष्म भूते आहेत. ती परस्परांच्या अंशांनी युक्त होऊन स्थूल होतात. आणि स्थूल देहाच्या घटनेस कारण होतात. पाच भूतांच्या ज्या शब्द, स्पर्श, रुप, रस आणि गंध या तन्मात्रा त्यांना विषय म्हणतात. त्या भोक्त्याला सुख देतात.

**य एषु मूढा विषयेषु बद्धा रागोरुपाशेन सुदुर्दमेन**
**आयान्ति निर्यान्त्यध ऊर्ध्वमुच्चैः स्वकर्मदूतेन जवेन नीताः ।।७७।।**

जे मूढ पुरुष, तोडण्यास अतिशय कठिण अशा रागरुपी जबरदस्त फासाने विषयांचे ठायी बद्ध झालेले असतात, ते स्वतःचे कर्म हाच एक दूत, त्याने झपाट्याने नेले जाणारे अतिशय अधोगतीस आणि ऊर्ध्वगतीस जात येत असतात.

**शब्दादिभिः पञ्चभिरेव पञ्च पञ्चत्वमापुः स्वगुणेन बद्धः**
**कुरङ्गमातङ्गपतङ्गमीन- भृङ्गा नरः पञ्चभिरपञ्चः किम् ।।७८।।**

स्वतःच्या गुणांनी बांधलेले हरिण, हत्ती, पतंग, मस्त्य, आणि भुंगा हे पाच प्राणी शब्दादिक पाच विषयांपैकी अनुक्रमे एकेक विषयावर आसक्त झाल्यामुळे मरण पावतात. तर मग पाचही विषयांचे ठायी आसक्त झालेला मनुष्यप्राणी विषयांच्या पायी मरणप्राय दुःख पावेल यात काय सांगायचे आहे.

**दोषेण तीव्रो विषयः कृष्णसर्पविषादपि**
**विषं निहन्ति भोक्तारं द्रष्टारं चक्षुषाप्ययम् ।।७९।।**

V
pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

कृष्ण सर्पाच्या विषापेक्षाही विषय आपल्या अंगच्या दोषाने फार जलाल आहे. असे
म्हणण्याचे कारण, कृष्णसर्पाचे विष खाणाऱ्याची मात्र हानि करते;
पण विषयाने तर आपल्याकडे नुसती दृष्टि टाकली की लगेच त्याला पछाडतो.

**विषयाशामहापाशाद्यो विमुक्तः सुदुस्त्यजात्**
**स एव कल्पते मुक्त्यै नान्यः षट्शास्त्रवेद्यपि ।।८०।।**

अतिशय प्रयासाने सुध्दा सुटायचा नाहीं, अशा विषयवासनारुप जबरदस्त पाशातून
जो मनुष्य मोकळा झाला. तोच मोक्षास प्राप्त होऊ शकतो. बाकी,
सहा शास्त्रे जाणणारा असला तरी देखील मोक्षास प्राप्त होऊ शकत नाहीं.

**आपातवैराग्यवतो मुमुक्षुन् भवाब्धिपारं प्रति यातुमुद्यतान्**
**आशाग्रहो मज्जयतेऽन्तराले विगृह्य कण्ठे विनिवर्त्य वेगात् ।।८१।।**

न ठसलेले दिखाऊ मात्र वैराग्य ज्यांच्या अंगी असते असे जे मुमुक्षुजन
संसार समुद्राच्या पैलतीरास जाण्याचा प्रयत्न करीत असतात, त्यांना, विषयांची आशा
हीच सुसर झपाट्याने गळ्यासी धरुन आणि परतवून मध्येच म्हणजे भर
संसारसमुद्रात बुडविते.

**विषयाशाग्रहो येन सुविरक्त्यसिना हतः**
**स गच्छति भवाम्भोधेः पारं प्रत्यूहवर्जितः ।।८२।।**

विषयांची आशा हीच सुसर तिला ज्याने दृढ वैराग्यरुप तरवारीने मारले, तो
निर्विघ्नपणे संसारसमुद्राच्या पार जातो.

**विषमविषयमार्गैर्गच्छतोऽनच्छबुद्धेः प्रतिपदमभियातो मृत्युरप्येष विद्धि**
**हितसुजनगुरुक्त्या गच्छतः स्वस्य युक्त्या**
**प्रभवति फलसिद्धिः सत्यमित्येव विद्धि ।।८३।।**

जो मलिनबुध्दीचा पुरुष विषयरुप खडतर मार्गांनी जात असतो, त्याच्यावर
पावलोपावली मृत्यु चाल करतो असे समज. तसेच, जो पुरुष आपले हित इच्छिणारा
आणि सज्जन अशा गुरुचे सांगणे आणि स्वतःची युक्ति या सुमार्गाने जात असतो,
त्याला अवश्य फलाची सिद्धि होते, असेच समज.

**मोक्षस्य कांक्षा यदि वै तवास्ति त्यजातिदूराद्विषयान्विषं यथा**
**पीयूषवत्तोषदयाक्षमार्जव - प्रशान्तिदान्तीर्भज नित्यमादरात् ।।८४।।**

तुला जर मोक्षाची इच्छा असेल तर तू विषयांना विषाप्रमाणे अगदी दूर एकीकडे टाक
आणि संतोष, दया, क्षमा, सरळपणा, शम, आणि दम यांचे अमृताप्रमाणे नित्य आदराने
सेवन कर.

**अनुक्षणं यत्परिहृत्य कृत्य- मनाद्यविद्याकृतबन्धमोक्षणम्**
**देहः परार्थोऽयममुष्य पोषणे यः सज्जते स स्वमनेन हन्ति ।।८५।।**

अनादि अविद्येने केलेले जे बंधन, त्यातून सुटका करुन घेणे हे जे आपले अवश्य
कर्तव्य ते एका बाजूला ठेवून जो पुरुष कोल्ह्याकुत्र्याच्या भक्ष्यस्थानी पडणाऱ्या या
देहाचे पोषण करण्यात मात्र गुंतलेला असतो, तो स्वतःच आपल्याला दुःखी करतो.

**शरीरपोषणार्थी सन् य आत्मानं दिदृक्षति**
**ग्राहं दारुधिया धृत्वा नदिं तर्तुं स इच्छति ।।८६।।**

V
**pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files**
**Get yours now!**
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

जो मनुष्य शरीरपोषणावर लक्ष ठेवून आत्म्याला जाणू इच्छितो, तो
( तरून जाण्याच्या उपयोगी पडणारे) लाकूड आहे
अशा भ्रमाने सुसरीला गच्च आवळून धरून नदीपार जाऊ इच्छितो.

**मोह एव महामृत्युर्मुमुक्षोर्वपुरादिषु**
**मोहो विनिर्जितो येन स मुक्तिपदमर्हति ||८७||**

शरीरादिकांवर जो मोह तोच मुमुक्षु मनुष्याला महामृत्यु होय.
त्या मोहाला ज्याने जिंकले तोच मुक्तिपद पावण्यास पात्र होतो.

**मोहं जहि महामृत्युं देहदारासुतादिषु**
**यं जित्वा मुनयो यान्ति तद्विष्णोः परमं पदम् ||८८||**

शरीर, स्त्री, पुत्र इत्यादिकांचे ठायी जो मोह हाच एक महामृत्यु, त्याचा समूळ नाश कर,
कारण, त्या मोहाला जिंकून मुनि विष्णुंचे जे प्रसिद्ध पद (मोक्ष) त्याप्रत प्राप्त होतात.

**त्वङ्मांसरुधिरस्नायुमेदोमज्जास्थिसंकुलम्**
**पूर्णं मूत्रपुरिषाभ्यां स्थूलं निन्द्यमिदं वपुः ||८९||**

हे स्थूल शरीर त्वचा, मांस, रक्त, स्नायु, मेद, मज्जा आणि अस्थि यांनी वेढलेले
व मलमूत्रांनी भरलेले असल्यामुळे निंद्य आहे.

**पञ्चीकृतेभ्यो भूतेभ्यः स्थूलेभ्यः पूर्वकर्मणा**
**समुत्पन्नमिदं स्थूलं भोगायतनमात्मनः**
**अवस्था जागरस्तस्य स्थूलार्थानुभवो यतः||९०||**

आत्म्याचे सुखदुःख भोगण्याचे ठिकाण असे हे स्थूल शरीर पंचीकृत स्थूलभूतांपासून
प्राक्तन (पूर्व ) कर्माने उत्पन्न झाले, जागृति ही त्या स्थूल शरीराची अवस्था आहे.
कारण, त्या अवस्थेमध्ये स्थूल विषयांचे प्रत्यक्ष ज्ञान होत असते.

**बाह्येन्द्रियैः स्थूलपदार्थसेवां स्रक्चन्दनस्त्र्यादिविचित्ररुपाम्**
**करोति जीवः स्वयमेतदात्मना तस्मात्प्रशस्तिर्वपुषोऽस्य जागरे ||९१||**

जीव, बाह्य जी श्रोत्रादिक इंद्रिये त्यांच्या द्वारा माळा चंदन, स्त्रिया इत्यादिक
नानाप्रकारच्या स्थूल पदार्थांचा उपभोग या स्थूल शरीराच्या रुपाने स्वतः घेत असतो,
म्हणून जागृती अवस्थेत स्थूल शरीर असते, अशी या शरीराच्या संबंधाने प्रसिद्धी
आहे.

**सर्वोऽपि बाह्यसंसारः पुरुषस्य यदाश्रयः**
**विद्धि देहमिदं स्थूलं गृहवद्गृहमेधिनः ||९२||**

जसे गृहस्थाश्रमाचे घर, तसे हे स्थूल शरीर आहे असे समज, कारण,
पुरुषाचा सर्व बाह्य प्रपंच या स्थूल देहावर अवलंबून आहे.

**स्थूलस्य सम्भवजरामरणानि धर्माः**
**स्थौल्यादयो बहुविधाः शिशुताद्यवस्थाः**
**वर्णाश्रमादिनियमा बहुधा यमाः स्युः**
**पूजावमानबहुमानमुखा विशेषाः ||९३||**

उत्पत्ति, वृध्दापकाळ, मरण, इत्यादिक धर्म, स्थूलपणा, कृशता, बाल्यादिक याप्रमाणे
बहुत प्रकारच्या अवस्था, वर्णाश्रमादिकासंबंधी पुष्कळ प्रकारचे नियम, अनेक प्रकारचे

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

रोग, पूजा, अवमान, बहुमान इत्यादिक प्रकार स्थूल देहाला लागू आहेत.

**बुद्धीन्द्रियाणि श्रवणं त्वगक्षि घ्राणं च जिव्हा विषयावबोधनात्**
**वाक्पाणिपादं गुदमप्युपस्थः कर्मेन्द्रियाणि प्रवणेन कर्मसु ||९४||**

श्रोत्र, त्वचा, चक्षु, घ्राण आणि रसना ही शब्दादिक विषयांना जाणतात, म्हणून त्यांना ज्ञानेंद्रिये म्हणतात वाणी, हात पाय, गुद आणि उपस्थ ही भाषणादिक कर्मांचे ठायी प्रवृत्त होतात, म्हणून त्यांना कर्मेंद्रिये म्हणतात.

**निगद्यतेऽन्तःकरणं मनोधीर अहंकृतिश्चित्तमिति स्ववृत्तिभिः**
**मनस्तु संकल्पविकल्पनादिभिः बुद्धिः पदार्थाध्यवसायधर्मतः||९५||**
**अत्राभिमानादहमित्यहङ्कृतिः स्वार्थानुसन्धानगुणेन चित्तम् ||९६||**

एकच अंतःकरण आपल्या (अंतःकरणाच्या) भिन्न भिन्न वृत्ति असल्यामुळे मन, बुद्धि, अहंकार आणि चित्त अशा नावांनी म्हटले जाते. संकल्प, विकल्प इत्यादिक वृत्तींच्या योगाने अंतःकरणाला मन म्हणतात. 'अमुक पदार्थ आहे,' असा निश्चय करणे या वृत्तीच्या योगाने अंतःकरणाला बुद्धि म्हणतात. या शरीरावर 'मी मी' असा अभिमान करणें या वृत्तीच्या योगाने अंतःकरणाला अहंकार म्हणतात आणि स्वतःच्या विषयावर अनुसंधान ठेवणे या वृत्तीच्या योगाने त्याला चित्त म्हणतात.

**प्राणापानव्यानोदानसमाना भवत्यसौ प्राणः**
**स्वयमेव वृत्तिभेदाद्विकृतिभेदात्सुवर्णसलिलादिवत् ||९७||**

जसे सुवर्ण अथवा उदक आपले भिन्न भिन्न विकार (परिणाम) असल्यामुळे भिन्न भिन्न नावांनी ओळखले जाते, तद्वत हा प्राण स्वतःच्या भिन्न भिन्न वृत्तीमुळे प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान असा पाच प्रकारचा गणला आहे.

**वागादिपञ्च श्रवणादिपञ्च प्राणादिपञ्चभ्रमुखानि पञ्च**
**बुद्ध्याद्यविद्यापि च कामकर्मणी पुर्यष्टकं सूक्ष्मशरीरमाहुः ||९८||**

वाणी आदिक पाच कर्मेंद्रिये, श्रोत्रादिक पाच ज्ञानेंद्रिये, प्राणादिक पाच प्राण, आकाशादिक पाच भूते, बुद्ध्यादिक चार अंतःकरणे, अविद्या, काम आणि कर्म या आठ नगरींना सूक्ष्म शरीर म्हणतात.

**इदं शरीरं श्रृणु सूक्ष्मसंज्ञितं लिङ्गं त्वपञ्चीकृतभूतसम्भवम्**
**सवासनं कर्मफलानुभावकं स्वाज्ञानतोऽनादिरुपाधिरात्मनः||९९||**

श्रवण कर, ज्यांचे पंचीकरण झाले नाहीं अशा पंचभूतांपासून उत्पन्न झालेले, वासनांनी युक्त, कर्मफलांचा भोग देणारे, असे हे सूक्ष्म किंवा लिंग शरीर स्वतःच्या स्वरुपाच्या अज्ञानामुळे आत्म्याला अनादि उपाधिरुप आहे.

**स्वप्नो भवत्यस्य विभक्त्यवस्था स्वमात्रशेषेण विभाति यत्र**
**स्वप्ने तु बुद्धिः स्वयमेव जाग्रत् कालीननानाविधवासनाभिः**
**कर्त्रादिभावं प्रतिपद्य राजते यत्र स्वयंज्योतिरयं परात्मा ||१००||**
**धीमात्रकोपाधिरशेषसाक्षी न लिप्यते तत्कृतकर्मलेशैः**
**यस्मादसङ्गस्तत एव कर्मभिःर्न लिप्यते किञ्चिदुपाधिना कृतैः||१०१||**

स्वप्न ही या लिंगशरीराची वेगळी (स्वतंत्र) अवस्था होय, कारण, या अवस्थेत लिंगशरीर मात्र एकटे उरलेले असते. जागृति अवस्थेत बुद्धि नानाप्रकारच्या वासनांनी

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

कर्ता, कार्य इत्यादिक रुपाला प्राप्त होऊन आपले काम करीत असते. मात्र या अवस्थेत बुद्धि ज्याला उपाधि आहे आणि सर्वांचा साक्षी असा हा परमात्मा स्वतः शोभत असतो, आणि बुद्धीने केलेल्या कर्मांच्या लेशाने देखील लिप्त होत नाहीं. ज्यापेक्षा तो परमात्मा असंग आहे म्हणूनच तो उपाधिने केलेल्या कर्मांनी किंचित देखील लिप्त होत नाहीं.

**सर्वव्यापृतिकरणं लिङ्गमिदं स्याच्चिदात्मनः पुंसः**
**वास्यादिकमिव तक्ष्णस्तेनैवात्मा भवत्यसङ्गोऽयम् ||१०२||**

सुताराला आपले सर्व काम करण्याचे साधन जसे वाकस वगैरे असते, त्याप्रमाणे चैतन्यस्वरुपी आत्म्याला सर्व व्यापार करण्याचे साधन असे लिंग शरीर आहे. म्हणूनच आत्मा हा स्वतः असंग आहे.

**अन्धत्वमन्दत्वपटुत्वधर्माः सौगुण्यवैगुण्यवशाद्धि चक्षुषः**
**बाधिर्यमूकत्वमुखास्तथैव श्रोत्रादिधर्मा न तु वेत्तुरात्मनः ||१०३||**

अंधपणा, मंददृष्टि, अथवा चलाख दृष्टि हे डोळ्याचे धर्म आहेत. आणि ते त्याच्या (डोळ्याच्या ) बरेवाईटपणापासून होत असतात. तसेच बहिरेपणा, मुकेपणा इत्यादिक धर्मही श्रोत्रादिकांचे आहेत. पण साक्षीभूत आत्म्याचे नव्हेत.

**उच्छवासनिःश्वासविजृम्भणक्षुत् प्रस्पन्दनाद्युत्क्रमणादिकाः क्रियाः**
**प्राणादिकर्माणि वदन्ति तज्ज्ञाः प्राणस्य धर्मावशनापिपासे ||१०४||**

उच्छवास, निःश्वास, जांभई, भूक, हालणे-चालणे, आणि एका शरीरातून निघून दुसऱ्या शरीरात जाणे इत्यादिक क्रिया, ही प्राणादिकांची कामे आहेत; आणि तहान व भूक हे प्राणाचेच धर्म आहेत, असे तत्त्ववेत्ते म्हणतात.

**अन्तःकरणमेतेषु चक्षुरादीषु वर्ष्मणि**
**अहमित्यभिमानेन तिष्ठत्याभासतेजसा ||१०५||**
**अहंकारः स विज्ञेयः कर्ता भोक्ताभिमान्ययम्**
**सत्त्वादिगुणयोगेन चावस्थात्रयमश्नुते ||१०६||**
**विषयाणामानुकूल्ये सुखी दुःखी विपर्यये**
**सुखं दुःखं च तद्धर्मः सदानन्दस्य नात्मनः ||१०७||**

या चक्षुरादिक इंद्रियांवर आणि शरीरावर चिदाभासाच्या तेजाने 'मी मी' असा अभिमान धरुन जे अंतःकरण राहिले आहे तोच; कर्ता आणि भोक्ता अशा प्रकारचा अभिमान बाळगणारा अहंकार असे समजावे. तोच अहंकार सत्वादिक गुणांच्या योगाने जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या तीन अवस्थांना भोगीत असतो. पाहिजेत ते विषय असले म्हणजे तो सुखी असतो, आणि नकोत ते असले म्हणजे तो दुःखी होतो. तस्मात सुख आणि दुःख हे अहंकाराचे धर्म आहेत; पण सदानंदरुपी आत्म्याचे धर्म नव्हेत.

**आत्मार्थत्वेन हि प्रेयान् विषयो न स्वतः प्रियः**
**स्वत एव हि सर्वेषामात्मा प्रियतमो यतः ||१०८||**
**तत आत्मा सदानन्दो नास्य दुःखं कदाचन**
**यत्सुषुप्तौ निर्विषय आत्मानन्दोऽनुभूयते**
**श्रुतिः प्रत्यक्षमैतिह्यमनुमानं च जाग्रति ||१०९||**

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

विषय आत्म्याच्या कामी पडतो म्हणून तो फार आवडता आहे; पण तो स्वतः
आवडता नाहीं आणि आत्मा तर स्वतःच सर्वांना अतिशय आवडता आहे. म्हणून
आत्मा हा सर्वदा आनंदरुप आहे. याला दुःख कधीही होत नाहीं. सुषुप्तीमध्ये
विषयरहित आत्मानंद सर्वांच्या अनुभवास येतो. या आत्मानंदाच्या अनुभवाविषयी
श्रुति, प्रत्यक्ष, परंपरागतप्रसिद्धि आणि अनुमान ही चार प्रमाणे आहेत.

**अव्यक्तनाम्नी परमेशशक्तिरनाद्यविद्या त्रिगुणात्मिका परा**
**कार्यानुमेया सुधियैव माया यया जगत्सर्वमिदं प्रसूयते ।।११०।।**

अव्यक्त हे नाव धारण करणारी, अनादि अविद्यारुप, त्रिगुणात्मक, कार्याहून पलीकडची
आणि कार्यांवरुन जिच्याविषयी पंडितांना अनुमान करता येते, अशी जी परमेश्वराची
शक्ति तीच माया समजावी. या मायेच्या योगाने हे सर्व जग उत्पन्न होते.

**सन्नाप्यसन्नाप्युभयात्मिका नो भिन्नाप्यभिन्नाप्युभयात्मिका नो**
**साङ्गाप्यनङ्गाप्युभयात्मिका नो महाद्भुतानिर्वचनीयरुपा ।।१११।।**

ही माया खरी नाहीं, खोटी नाहीं, आणि खरे व खोटे या दोहोंनी मिश्र अशा स्वरुपाचीही
नाहीं, तशीच ही आपल्या अधिष्ठानाहून भिन्न नाहीं, अभिन्न नाहीं
आणि भिन्न व अभिन्न अशा मिश्र स्वरुपाचीही नाहीं. ही साकार नाहीं, निराकार
नाहीं व साकार आणि निराकार अशा मिश्र स्वरुपाचीही नाहीं, तर ही फार
आश्चर्यजनक आणि अनिर्वचनीय म्हणजे जिच्या स्वरुपाचा निर्णय करता येत नाहीं
अशी आहे.

**शुद्धाद्वयब्रह्मविबोधनाश्या सर्पभ्रमो रज्जुविवेकतो यथा**
**रजस्तमः सत्त्वमिति प्रसिद्धा गुणास्तदीयाः प्रथितैः स्वकार्यैः ।।११२।।**

जसे रज्जूचे ज्ञान झाल्याने तिच्यावर झालेली सर्पभ्रांति दूर होते, तद्वत शुद्ध आणि
अद्वितीय अशा ब्रह्माच्या ज्ञानाने या मायेचा नाश होतो. हिच्या सकल विदित
कार्यांवरुन हिचे सत्व, रज आणि तम हे तीन गुण प्रसिद्ध आहेत.

**विक्षेपशक्ती रजसः क्रियात्मिका यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी**
**रागादयोऽस्याः प्रभवन्ति नित्यं दुःखादयो ये मनसो विकाराः ।।११३।।**

क्रियारुप जी विक्षेपशक्ति ती रजोगुणाची आहे. या विक्षेपशक्तीपासून अनादिकाळची
संसारप्रवृत्ति चालली आहे. राग, विषयाची आवड आणि दुःख इत्यादिक
जे मनाचे विकार, ते नेहमी विक्षेपशक्तीपासूनच उत्पन्न होत असतात.

**कामः क्रोधो लोभदम्भाद्यसूयाहंकारेर्ष्यामत्सराद्यास्तु घोराः**
**धर्मा एते राजसाः पुम्प्रवृत्तिःर्यस्मादेषा तद्रजो बन्धहेतुः।।११४।।**

काम, क्रोध, लोभ, दंभ, असूया, अहंकार, ईर्ष्या आणि मत्सर इत्यादिक
जे घोर विकार आहेत, ते रजोगुणाचे धर्म होत. ज्यामुळे जीव कर्मात प्रवृत्त होतो,
तो रजोगुणच बंधास कारण होय.

**एषावृतिर्नाम तमोगुणस्य शक्तिर्यया वस्त्ववभासतेऽन्यथा**
**सैषा निदानं पुरुषस्य संसृतेःर्विक्षेपशक्ते प्रसरस्य हेतुः ।।११५।।**

जिच्यामुळे एक प्रकारची वस्तु असता दुसऱ्या प्रकारची दिसते, अशी जी आवरणशक्ति;
ती तमोगुणाची होय आणि हीच पुरुषाला संसार (जन्म-मरणरुप) प्राप्त होणे

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

व विक्षेपशक्तीच्या अधीन होण्याचे कारण होय.

**प्रज्ञावानपि पण्डितोऽपि चतुरोऽप्यत्यन्तसूक्ष्मार्थदृक्**
**व्यालीढस्तमसा न वेत्ति बहुधा सम्बोधितोऽपि स्फुटम्**
**भ्रान्त्यारोपितमेव साधु कलयत्यालम्बते तद्गुणान्**
**हन्तासौ प्रबला दुरन्ततमसः शक्तिर्महत्यावृतिः ||११६||**

पुरुष बुध्दिमान, पंडित, चतुर आणि अतिशय सूक्ष्मदृष्टीचा जरी असला, व त्याला पुष्कळ प्रकारे स्पष्ट कितीही जरी समजावले तरी तो तमोगुणाने जोपर्यंत घेरलेला असतो तोपर्यंत खरी गोष्ट समजत नाहीं. भ्रांतीने कल्पिलेलेच त्याला बरे वाटते आणि त्या कल्पित वस्तूच्याच गुणांना तो अवलंबून राहतो. अरेरे! या दुर्निवार तमोगुणाची आवरणशक्ति मोठी शिरजोर आहे.

**अभावना वा विपरीतभावनासम्भावना विप्रतिपत्तिरस्याः**
**संसर्गयुक्तं न विमुञ्चति ध्रुवं विक्षेपशक्तिः क्षपयत्यजस्त्रम् ||११७||**

या आवरणशक्तीचा ज्याला संसर्ग झाला, अशा पुरुषाला अज्ञान, गैरसमज, कल्पना आणि संशय ही खरोखर कधीही सोडीत नाहींत, आणि विक्षेपशक्ति त्याला निरंतर हैराण करीत असते.

**अज्ञानमालस्यजडत्वनिद्राप्रमादमूढत्वमुखास्तमोगुणाः**
**एतैः प्रयुक्तो न हि वेत्ति किञ्चिन्निद्रालुवत्स्तम्भवदेव तिष्ठति ||११८||**

अज्ञान, आलस्य, जडता, निद्रा, प्रमाद आणि मूढता इत्यादिक तमोगुणाचे धर्म आहेत. या गुणांचा ज्यांच्यात संचार झाला, तो पुरुष कांहीं जाणत नाहीं. केवळ झोपाळूसारखा किंवा खांबासारखा स्तब्धच राहतो.

**सत्त्वं विशुध्दं जलवत्तथापि ताभ्यां मिलित्वा सरणाय कल्पते**
**यत्रात्मविम्बः प्रतिविम्बितः सन् प्रकाशयत्यर्क इवाखिलं जडम् ||११९||**

सत्वगुण जरी पाण्यासारखा अगदी निर्मळ आहे; तथापि तो रजोगुण आणि तमोगुण यांशी मिश्र झाला म्हणजे बिघडतो. त्या सत्वगुणांत प्रतिबिंबित झालेले आत्मस्वरुप सूर्याप्रमाणे सकल जड वस्तूंना प्रकाशित करीत असते.

**मिश्रस्य सत्त्वस्य भवन्ति धर्मास्त्वमानिताद्या नियमा यमाद्याः**
**श्रद्धा च भक्तिश्च मुमुक्षुता च दैवी च सम्पत्तिरसन्निवृत्तिः ||१२०||**

मानी नसणे, नियम, यम, श्रद्धा , भक्ति, मुमुक्षुता, दैवी संपत्ति आणि दुष्ट पदार्थांपासून दूर असणे हे मिश्र झालेल्या सत्वगुणाचे धर्म आहेत.

**विशुद्धसत्त्वस्य गुणाः प्रसादः स्वात्मानुभूतिः परमा प्रशान्तिः**
**तृप्तिः प्रहर्षः परमात्मनिष्ठा यया सदानन्दरसं समृच्छति ||१२१||**

प्रसन्नता, स्वस्वरुपाचा अनुभव, अतिशय शांतता, तृप्ति, अतिशय आनंद आणि जिच्या योगाने सर्वदा आनंदरसाची प्राप्ति होईल अशी परमात्म्याचे ठिकाणी निष्ठा हे अतिशय शुद्ध अशा सत्वगुणाचे धर्म आहेत.

**अव्यक्तमेतत्त्रिगुणैर्निरुक्तं तत्कारणं नाम शरीरमात्मनः**
**सुषुप्ति रेतस्य विभक्त्यवस्था प्रलीनसर्वेन्द्रियबुद्धिवृत्तिः ||१२२||**

या (सत्व, रज आणि तम ) तीन गुणांची, जी साम्यावस्था तिला अव्यक्त म्हणतात.

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

तेच आत्म्याचे कारण नावाचे शरीर होय. सर्व इंद्रियांच्या आणि बुद्धीच्या वृत्ति जिच्यात लीन झालेल्या आहेत, अशी सुषुप्ती या अव्यक्ताची वेगळी (स्वतंत्र) अवस्था होय.

**सर्वप्रकारप्रमितिप्रशान्तिर्बीजात्मनावस्थितिरेव बुद्धेः**
**सुषुप्तिरेतस्य किल प्रतीतिः किञ्चिन्न वेद्मीति जगत्प्रसिद्धे : ।।१२३।।**

सर्व प्रकारच्या म्हणजे इंद्रियादिक प्रमाणांचा लय होणे आणि बुध्दीचे निजरुपाने राहणे यालाच सुषुप्ति म्हणतात. या सुषुप्तिमधल्या 'मी कांहीं जाणत नाहीं' अशा आपल्या अज्ञानाच्या अनुभवाला प्रत्येक मनुष्य प्रसिद्ध करतो म्हणून सुषुप्तीमध्ये आत्मा साक्षिरुपाने असतो असे समजते.

**देहेन्द्रियप्राणमनोऽहमादयः सर्वे विकारा विषयाः सुखादयः**
**व्योमादिभूतान्यखिलं न विश्वमव्यक्तपर्यन्तमिदं ह्यनात्मा ।।१२४।।**

देह, इंद्रिय, प्राण, मन आणि अहंकार इत्यादिक सर्व विकार, सुखादिक विषय, आकाशादिक भूते आणि अव्यक्तापर्यंत सकल जगत हे सर्व अनात्मा होय.

**माया मायाकार्यं सर्वं महदादि देहपर्यन्तम्**
**असदिदमनात्मकं त्वं विद्धि त्वं मरुमरीचिकाकल्पम् ।।१२५।।**

माया आणि महत्तत्वापासून देहापर्यंत सगळे मायेचे कार्य, ही अनात्मा असून निर्जल प्रदेशातील मृगजलाप्रमाणे मिथ्या आहेत.

**अथ ते संप्रवक्ष्यामि स्वरुपं परमात्मनः**
**यद्विज्ञाय नरो बन्धान्मुक्तः कैवल्यमश्नुते ।।१२६।।**

शिष्या ! आता तुला मी परमात्म्याचे स्वरुप सांगतो. जे स्वरुप जाणल्याने मनुष्य बंधातून सुटून मुक्तीस प्राप्त होतो.

**अस्ति कश्चित् स्वयं नित्यमहंप्रत्ययलम्बनः**
**अवस्थात्रयसाक्षी सन्पञ्चकोशविलक्षणः ।।१२७।।**

नेहमी 'मी मी' अशा प्रत्ययास अवलंबून असणारा असा स्वतः म्हणून कोणी (आत्मा) आहे. तो तीन अवस्थांचा साक्षी आणि पंच कोशाहून वेगळा आहे.

**यो विजानाति सकलं जाग्रत्स्वप्नसुषुप्तिषु**
**बुद्धितद् वृत्तिसद्भावमभावमहमित्ययम् ।।१२८।।**

जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या अवस्थांमध्ये जो सकल जाणतो तसेच बुद्धीच्या आणि तिच्या वृत्तींच्या सत्तेला व अभावाला जो जाणतो तो हा आत्मा 'मी' होय.

**यः पश्चति स्वयं सर्वं यं न पश्चति कश्चन**
**यश्चेतयति बुद्ध्यादिं न तु यं चेतयत्ययम् ।।१२९।।**

जो स्वतः सर्व जाणतो; पण ज्याला कोणी जाणत नाहीं. जो स्वतः बुद्ध्यादिकांना चेतना देतो; पण बुद्ध्यादिक ज्याला चेतना देत नाहींत, तो हा आत्मा होय.

**येन विश्वमिदं व्याप्तं यन्न व्याप्नोति किञ्चन**
**अभारुपमिदं सर्वं यं भान्तमनुभात्ययम् ।।१३०।।**

हे सकल जगत ज्याने व्यापले आहे; पण ज्याला कोणी व्यापीत नाहीं आणि जो

V
**pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files**
**Get yours now!**
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

प्रकाशू लागला म्हणजे आभासरुप हे सर्व प्रकाशते, तो हा आत्मा होय.

**यस्य सन्निधिमात्रेण देहेन्द्रियमनोधियः**
**विषयेषु स्वकीयेषु वर्तन्ते प्रेरिता इव ।।१३१।।**

देह, इंद्रिये, मन आणि बुद्धि ही केवळ ज्याच्या सानिध्यानेच आपापल्या कार्याचे ठायी प्रेरणा केल्यासारखी प्रवृत्त होतात, तो हा आत्मा होय.

**अहङ्कारादिदेहान्ता विषयाश्च सुखादयः**
**वेद्यन्ते घटवद्येन नित्यबोधस्वरुपिणा ।।१३२।।**

सूर्य जसा आपल्या प्रकाशाने घटाला प्रकाशित करतो, त्याप्रमाणे जो नित्यज्ञानस्वरुपी अहंकारापासून ते देहापर्यंत वस्तूंना आणि सुखादिक विषयांना जाणवितो, तो हा आत्मा होय.

**एषोऽन्तरात्मा पुरुषः पुराणो निरन्तराखण्डसुखानुभूतिः**
**सदैकरुपः प्रतिबोधमात्रो येनेषिता वागसवश्चरन्ति ।।१३३।।**

हा अंतर्यामी पुराणपुरुष (आत्मा ) निरंतर अखंड सुखरुप व अनुभवरुप आहे. सदा एकरुप आहे आणि ज्ञानरुप आहे. वाणी आणि इंद्रिये ही या आत्म्याच्या प्रेरणेनेच विषयांचे ठायी प्रवृत्त होत असतात.

**अत्रैव सत्त्वात्मनि धीगुहायामव्याकृताकाश उरुत्प्रकाशः**
**आकाश उच्चै रविवत्प्रकाशते स्वतेजसा विश्वमिदं प्रकाशयन् ।।१३४।।**

सत्वगुणमय अशा या बुद्धिरुप गुहेमध्ये अव्याकृतरुप आकाश आहे. त्या आकाशात आत्मा सूर्याप्रमाणे अतिशय प्रकाशतो आहे. आणि स्वतःच्या तेजाने या सकल जगाला प्रकाशित करीत आहे.

**ज्ञाता मनोऽहंकृतिविक्रियाणां देहेन्द्रियप्राणकृतक्रियाणाम्**
**अयोऽग्निवत्ताननुवर्तमानो न चेष्टते नो विकरोति किञ्चन ।।१३५।।**

मन आणि अहंकार यांच्या विकारांना व देह, इंद्रिये, आणि प्राण यांनी केलेल्या क्रियांना जाणणारा आणि जसा लोखंडासारखा अग्नि होतो, त्याप्रमाणे त्यांना (अहंकारादिकांना) अनुसरणारा आत्मा स्वतः कांहीं क्रिया करीत नाहीं, व कांहीं विकारही पावत नाहीं.

**न जायते नो म्रियते न वर्धते न क्षीयते नो विकरोति नित्यः**
**विलीयमानेऽपि वपुष्यमुष्मिन्न लीयते कुम्भ इवाम्बरं स्वयम् ।।१३६।।**

हा अविनाशी आत्मा उत्पन्न होत नाहीं, मरण पावत नाहीं, वाढत नाहीं, क्षीण होत नाहीं, विकार पावत नाहीं आणि घडा फुटला तरी त्यातले आकाश जसे नाश पावत नाहीं, त्याप्रमाणे हे शरीर लयास गेले तरी तो स्वतः लयास जात नाहीं.

**प्रकृतिविकृतिभिन्नः शुद्धबोधस्वभावः सदसदिदमशेषं भासयन्निर्विशेषः**
**विलसति परमात्मा जाग्रदादिष्ववस्थास्वहमहमिति साक्षात् साक्षिरुपेण बुद्धे :।।१३७।।**

कारण आणि कार्य याहून वेगळा, शुध्द ज्ञान हेच ज्याचे स्वरुप, कार्यकारणरुप सकल जगाला प्रकाशित करणारा, ज्याच्या ठिकाणी कोणताही विशेष (फेरफार) नाहीं, असा परमात्मा जागृतादि अवस्थांचे ठायी 'मी मी' अशा बुद्धीच्या साक्षिरुपाने प्रत्यक्ष प्रकाशमान होत आहे.

V

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**नियमितमनसा त्वं स्वमात्मानमात्मन्ययमहमिति साक्षाद्विद्धि बुद्धिप्रसादात्**
**जनिमरणतरंगापारसंसारसिन्धुं प्रतर भव कृतार्थो ब्रह्मरुपेण संस्थः ।।१३८।।**

हे शिष्या ! वश केलेल्या मनाने आणि बुद्धीच्या निर्मळपणाने तू या आत्म्याला 'हा मी आहे' असे आपल्या ठिकाणी स्पष्टपणे समज; जन्ममरणरुप असंख्य तरंगांचा अपार संसारसागर तरुन जा, आणि ब्रह्मरुपाने राहून कृतार्थ हो.

**अत्रानात्मन्यहमिति मतिर्बन्ध एषोऽस्य पुंसः**
**प्राप्तोऽज्ञानाज्जननमरणक्लेशसम्पातहेतुः**
**येनैवायं वपुरिदमसत्सत्यमिथ्यात्मबुद्ध्या**
**पुष्यत्युक्षत्यवति विषयैस्तन्तुभिः कोशकृद्वत् ।।१३९।।**

अनात्म्याच्या ठिकाणी 'मी' अशी जी बुद्धि, या अज्ञानाने जीवाला बंध प्राप्त झाला आहे. हा बंधच, जन्म आणि मरण यापासून होणारे क्लेशास कारण आहे. या मिथ्या शरीराला 'हे  सत्य आहे' आणि 'हेच मी आहे' अशा समजुतीने जीव त्याचे विषयांच्या योगाने पोषण करतो, त्याची वज राखतो, आणि त्याचे रक्षण करतो, व कोळी जसा आपण रचलेल्या तंतूनीच आपण बांधला जातो. त्याप्रमाणे तो आपल्या हातानेच आपण बांधला जातो.

**अतस्मिंस्तद् बुद्धिः प्रभवति विमूढस्य तमसा**
**विवेकाभावाद्वै स्फुरति भुजगे रज्जुधिषणा**
**ततोऽनर्थव्रातो निपतति समादातुरधिकस्ततो**
**योऽसद्ग्राहः स हि भवति बन्धः शृणु सखे ।।१४०।।**

अंधकाराने घेरलेल्या पुरुषाला विवेक नसल्यामुळे जशी सर्पाच्या ठिकाणी 'ही रज्जु आहे' अशी भ्रांति पडते, तद्वत अज्ञानाने घेरलेल्या जीवाला विवेक नसल्यामुळे अनात्म्याचे ठिकाणी  'हा आत्मा आहे' अशी बुद्धि होते. त्यापासून अनात्म्याचे आत्मस्वरुपाने ग्रहण करणाऱ्यावर मोठाच अनर्थांचा समुदाय येऊन कोसळतो, आणि त्यापासून जो खोटा ग्रह उत्पन्न होतो तोच बंध. तो कसा तो ऐक बाबा.

**अखण्डनित्याद्वयबोधशक्त्या स्फुरन्तमात्मानमनन्तवैभवम्**
**समावृणोत्यावृतिशक्तिरेषा तमोमयी राहुरिवार्कविम्बम् ।।१४१।।**

राहु जसा सूर्यमंडळाला झाकतो, तद्वत अखंड, नित्य आणि अद्वितीय अशा ज्ञानशक्तीने स्फुरण पावणाऱ्या अनंतैश्वर्यसंपन्न आत्म्यालाही ही तमोगुणात्मक आवरणशक्ति झाकते.

**तिरोभूते स्वात्मन्यमलतरतेजोवति पुमाननात्मानं मोहादहमिति शरीरं कलयति**
**ततः कामक्रोधप्रभृतिभिरमुं बन्धनगुणैः परं विक्षेपाख्या रजस उरुशक्तिर्व्यथयति।।१४२।।**

अतिशय शुद्ध ज्याचे तेज असे आत्मस्वरुप झाकले गेले असता जीव मोहाने या अनात्मरुप शरीराला 'मी' असे मानतो नंतर या जीवाला रजोगुणाची विक्षेप नामक प्रबल शक्ति कामक्रोधादिक जी बंधनाची साधने त्यांच्या योगाने फार पीडा करते.

**महामोहग्राहग्रसनगलितात्मावगमनो धियो**
**नानावस्थाः स्वयमभिनयंस्तद्गुणतया**

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**अपारे संसारे विषयविषपूरे जलनिधौ**
**निमज्योन्मज्यायं भ्रमति कुमतिः कुत्सितगतिः।।१४३।।**

महामोहरुपी भूताने पछाडल्यामुळे ज्याला स्वरुपाचे भान उरले नाहीं असा आणि स्वतःला अनात्मरुप मानल्यामुळे बुद्धीच्या अनेक अवस्था स्वतःच्या आहेत असे मानून त्याप्रमाणे वागणारा व म्हणूनच दुःखी होणारा हा दुर्बुद्धि पुरुष विषयरुप विषाने भरलेल्या अपार संसार समुद्रात गटांगळ्या खात फिरत आहे.

**भानुप्रभासंजनिताभ्रपङ्क्तिर्भानुं तिरोधाय विजृम्भते यथा**
**आत्मोदिताहंकृतिरात्मतत्त्वं तथा तिरोधाय विजृम्भते स्वयम् ।।१४४।।**

सूर्याच्या तेजापासून उत्पन्न झालेली मेघांची पंक्ति सूर्याला आच्छादित करुन जशी स्वतः प्रकाशते, त्याप्रमाणे आत्म्यापासून उत्पन्न झालेला अहंकार आत्मतत्त्वाला आच्छादित करुन स्वतः प्रकाशित होतो.

**कवलितदिननाथे दुर्दिने सान्द्रमेघैर्व्यथयति हिमझंझावायुरुग्रो यथैतान्**
**अविरततमसात्मन्यावृते मूढबुद्धिं क्षपयति बहुदुःखैस्तीव्रविक्षेपशक्तिः।।१४५।।**

सूर्य दाट मेघांनी झाकून टाकला आहे, असा दुर्दिन उदयास आला असता थंडगार सोसाट्याचा भयंकर वारा, जसा लोकांना हैराण करतो, त्याप्रमाणे एकसारख्या तमोगुणाने, आत्म्याला झाकून टाकले असता तीव्र विक्षेपशक्ति, मूढबुद्धीच्या पुरुषाला फार दुःखे देऊन हैराण करते.

**एताभ्यामेव शक्तिभ्यां बन्धः पुंसः समागतः**
**याभ्यां विमोहितो देहं मत्वात्मानं भ्रमत्ययम् ।।१४६।।**

आवरणशक्ति आणि विक्षेपशक्ति या दोघींच्या पायीच पुरुषाला बंध प्राप्त झाला आहे, कारण, या दोघींच्या योगाने फार मोहीत झालेला पुरुष दोहाला आत्मा मानीत असतो.

**बीजं संसृतिभूमिजस्य तु तमो देहात्मधीरङ्कुरो**
**रागः पल्लवमम्बु कर्म तु वपुः स्कन्धोऽसवः शाखिकाः**
**अग्राणीन्द्रियसंहतिश्च विषयाः पुष्पाणिः दुःखं फलं**
**नानाकर्मसमुद्भवं बहुविधं भोक्तात्र जीवः खगः ।।१४७।।**

आवरणशक्ति ही संसाररुप वृक्षाचे बीज आहे. देहाला आत्मा मानणे हा त्या वृक्षाचा अंकुर होय. (विषयांची) आवड ही त्याची पालवी होय. कर्म हे त्याला उदक होय. शरीर हे त्याचे खोड होय. प्राण ह्या त्याच्या फांद्या होत. इंद्रियांचा समुदाय ह्या त्याच्या डिऱ्या होत. शब्दादि विषय ही त्यांची फुले होत. अनेक कर्मांपासून उत्पन्न झालेले नानविध दुःख हे त्यांचे फल होय. आणि जीव हा त्या झाडावरचा फळे खाणारा पक्षी होय.

**अज्ञानमूलोऽयमनात्मबन्धो नैसर्गिकोऽनादिरनन्त ईरितः**
**जन्माप्ययव्याधिजरादिदुःखप्रवाहपातं जनयत्यमुष्य।।१४८।।**

ज्याचे मूळ अज्ञान असा अनाम वस्तूंचा बंध स्वाभाविक, अनादि आणि दुरंत असा सांगितला आहे. हा, ह्या जीवाला जन्म, मरण, व्याधि, जरा इत्यादिक दुःखांच्या प्रवाहात पाडीत असतो..

**नास्त्रैर्न शस्त्रैरनिलेन वह्निना छेत्तुं न शक्यो न च कर्मकोटिभिः**

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**विवेकविज्ञानमहासिना विना धातुः प्रसादेन शितेन मञ्जुना।।१४९।।**
हा बंध ईश्वराच्या कृपेने सिद्ध झालेल्या विवेकविज्ञानरुप सुबक व
जबरदस्त खङगावाचून दुसऱ्या अस्त्रांनी, शस्त्रांनी, अग्नीने, वायूने अथवा
कोट्यावधि कर्मांनी तोडण्याजोगा नाहीं.

**श्रुतिप्रमाणैकमतेः स्वधर्म निष्ठा तयैवात्मविशुद्धिरस्य**
**विशुद्धबुद्धेः परमात्मवेदनं तेनैव संसारसमूलनाशः।।१५०।।**
वेदालाच मुख्य प्रमाण मानणाऱ्यांची स्वधर्मावर निष्ठा असते.
स्वधर्मनिष्ठ पुरुषाच्या अंतःकरणाची शुद्धि स्वधर्मनिष्ठेनेच होते.
ज्याचे अंतःकरण चांगले शुद्ध झाले अशा पुरुषाला परमात्म्याचे ज्ञान होते.
परमात्म्याच्या ज्ञानानेच संसाराचा समूळ नाश होतो.

**कोशैरन्नमयाद्यैः पञ्चभिरात्मा न संवृतो भाति**
**निजशक्तिसमुत्पन्नैः शैवालपटलैरिवाम्बु वापीस्थम् ।।१५१।।**
जसे विहिंरीतले पाणी आपोआप उत्पन्न झालेल्या शेवाळाच्या जाळ्यांनी वेढल्यामुळे
लक्षात येत नाहीं, तद्वत आपल्या शक्तीपासून (मायेपासून) उत्पन्न झालेल्या
अन्नमयादिक पाच कोशांच्या योगाने वेढलेला आत्मा लक्षात येत नाहीं.

**तच्छैवालापनये सम्यक् सलिलं प्रतीयते शुद्धम्**
**तृष्णासन्तापहरं सद्यः सौख्यप्रदं परं पुंसः।।१५२।।**
ते शेवाळाचे जाळे दूर केले असता, जसे मनुष्याची तहान आणि ताप दूर करणारे व
तत्काळ उत्तम सौख्य देणारे निर्मळ चांगले पाणी प्रत्यक्ष दिसते,

**पञ्चानामपि कोशानामपवादे विभात्ययं शुद्धः**
**नित्यानन्दैकरसः प्रत्यग्रूपः परः स्वयंज्योतिः ।।१५३।।**
त्याप्रमाणे पाचही कोशांचा अपवाद केला असता शुद्ध, नित्य, आनंदैकस्वरुप,
सर्वोत्कृष्ट आणि स्वयंप्रकाश असा हा प्रत्यगात्मा स्पष्टपणे प्रतीतीस येतो.

**आत्मानात्मविवेकः कर्तव्यो बन्धमुक्तये विदुषा**
**तेनैवानन्दी भवति स्वं विज्ञाय सच्चिदानन्दम् ।।१५४।।**
सूज्ञ पुरुषाने बंधातून सुटका होण्यासाठी आत्मा आणि अनात्मा यांचा विवेचन करावे.
म्हणजे त्या योगानेच या सच्चिदानंद स्वरुपाला जाणून आनंदी होतो.

**मुञ्जादिषीकामिव दृश्यवर्गात्प्रत्यञ्चमात्मानमसङ्गमक्रियम्**
**विविच्य तत्र प्रविलाप्य सर्वं तदात्मना तिष्ठति यः स मुक्तः ।।१५५।।**
जो पुरुष, मुंज (दर्भ) नावाच्या गवतातून जशी बारीक सळई निवडून काढतात,
त्याप्रमाणे दृष्टीला गोचर होणाऱ्या पाच कोशातून असंग आणि अक्रिय अशा प्रत्यगात्म्याचे
विवेचन करुन आणि त्या प्रत्यगात्म्याच्या ठिकाणी सर्वांचा लय करुन
आत्मस्वरुपाने राहतो, तो मुक्त होय.

**देहोऽयमन्नभवनोऽन्नमयस्तु कोशश्चान्नेन जीवति विनश्यति तद्विहीनः**
**त्वक्चर्ममांसरुधिरास्थिपुरीषराशिर्नायं स्वयं भवितुमर्हति नित्यशुद्धः।।१५६।।**
हा देह अन्नापासून झालेला आहे. अन्नाने वाचतो आणि अन्न न मिळाले तर नष्ट
होतो. म्हणून हा (देह) अन्नमय कोश होय. हा (देह) म्हणजे त्वचा, चर्म, मांस, रक्त,

V
**pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files**
**Get yours now!**
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

अस्थि आणि विष्ठा यांची एक रास आहे. म्हणूनच हा स्वतः नित्यशुद्ध आत्मा होण्यास योग्य नाहीं.

**पूर्वं जनेरपि मृतेरपि नायमस्ति जातः क्षणं क्षणगुणोऽनियतस्वभावः**
**नैको जडश्च घटवत्परिदृश्यमानः स्वात्मा कथं भवति भावविकारवेत्ता।।१५७।।**

हा देह जन्माच्या पूर्वी आणि मरणानंतरही नसतो, केवळ वर्तमानकाळीच भासतो. क्षणोक्षणी याचे गुण बदलत असतात, याचा स्वभाव अनिश्चित असतो. याची रुपे अनेक असतात, हा जड आहे, आणि घटादिकांप्रमाणे हा दृष्टीला गोचर होतो. असा हा देह जन्मादिक सर्व विकारांना जाणणारा आत्मा असा संभवेल ? संभवणार नाहीं.

**पाणिपादादिमान्देहो नात्मा व्यङ्गेऽपि जीवनात्**
**तत्तच्छक्तेरनाशाच्च न नियम्यो नियामकः ।।१५८।।**

हात, पाय इत्यादिक अवयव ज्याला आहेत असा देह आत्मा नव्हे, कारण,देह व्यंग झाला तरी आत्मा अखंडीत राहतो, आणि कोणत्याही शक्तीचा नाश होत नाहीं, म्हणून आत्मा देह नव्हे. तर देहाचा नियंता आहे.

**देहतद्धर्मतत्कर्मतदवस्थादिसाक्षिणः**
**स्वत एव स्वतः सिद्धं तद्वैलक्षण्यमात्मनः ।।१५९।।**

आत्मा हा, देहाचा, देहाच्या धर्माचा, देहाच्या कर्माचा आणि देहाच्या अवस्थादिकांचा साक्षी आहे, म्हणून आत्म्याचा देहाहून वेगळेपणा आपोआपच सिद्ध होतो.

**शल्यराशिर्मांसलिप्तो मलपूर्णोऽतिकश्मलः**
**कथं भवेदयं वेत्ता स्वयमेतद्विलक्षणः।।१६०।।**

ज्ञानरहित, अस्थींची रास हे ज्याचे रुप, मांसाने लिंपलेला, मळाने भरलेला आणि अतिशय ओंगळवाणा असा हा देह स्वतः आत्मा कसा होऊ शकेल? कारण, आत्मा ज्ञानरुप आहे, अस्थींची रास हे त्याचे स्वरुप नव्हे, तो मांसाने लिंपलेला नाहीं, मळाने भरलेला नाहीं, आणि ओंगाळवाणा नाहीं.

**त्वङ्मांसमेदोऽस्थिपुरीषराशावहंमतिं मूढजनः करोति**
**विलक्षणं वेत्ति विचारशीलो निजस्वरुपं परमार्थभूतम् ।।१६१।।**

मूढ मनुष्य, त्वचा, मांस, मेद, अस्थि, आणि विष्ठा यांच्या राशिला (देहाला) 'मी मी ' असे मानतो; पण विचारशील मनुष्य देहाहून वेगळे असे आपले सत्यस्वरुप जाणतो.

**देहोऽहमित्येव जडस्य बुद्धिर्देहे च जीवे विदुषस्त्वहंधीः**
**विवेकविज्ञानवतो महात्मनो ब्रह्माहमित्येव मतिः सदात्मनि।।१६२।।**

'मी देह' अशीच मूढ मनुष्याची देहावर अहंबुद्धी असते. 'मी जीव आहे' अशी विद्वानाची जीवावर अहंबुद्धी असते आणि आत्मानात्मविवेचन व अपरोक्ष ज्ञान ज्याच्या अंगी आहे अशा महात्म्याची सत्य आत्म्यास अनुलक्षून ' मी ब्रह्म आहे' अशी मति असते.

**अत्रात्मबुद्धिं त्यज मूढबुद्धे त्वङ्मांसमेदोऽस्थिपुरीषराशौ**
**सर्वात्मनि ब्रह्मणि निर्विकल्पे कुरुष्व शान्तिं परमां भजस्व।।१६३।।**

मूढा ! त्वचा, मांस, मेद, अस्थि, आणि विष्ठा यांची केवळ रास अशा या देहावरची अहंबुद्धि टाकून दे. आणि सर्वांचे पारमार्थिक रुप अशा निर्विकल्प ब्रह्मावर 'मी ब्रह्म आहे' अशी बुद्धि ठेव, आणि अत्यंत शांतिला प्राप्त हो.

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

**देहेन्द्रियादावसति भ्रमोदितां विद्वानहन्तां न जहाति यावत्**
**तावन्न तस्यास्ति विमुक्तिवार्ताप्यस्त्वेष वेदान्तनयान्तदर्शी ।।१६४।।**

देह, इंद्रिये इत्यादिक मिथ्या पदार्थांवर भ्रांतीने उत्पन्न झालेली जी अहंबुद्धि (देह मी आहे इत्यादिक प्रकारची बुद्धि), तिला सूज्ञ मनुष्य जोपर्यंत सोडीत नाहीं, तोपर्यंत तो वेदान्त शास्त्राच्या सिध्दांतात पारंगत का असेना, त्याला मुक्ति होण्याची गोष्ट देखील नको.

**छायाशरीरे प्रतिबिम्बगात्रे यत्स्वप्नदेहे हृदि कल्पिताङ्गे**
**यथात्मबुद्धिस्तव नास्ति काचिज्जीवच्छरीरे च तथैव मास्तु ।।१६५।।**

या देहाच्या छायेवर, याच्या पाण्यात वगैरे पडलेल्या प्रतिबिंबावर, आणि हृदयात ज्याच्या अवयवांची कल्पना केली जाते अशा स्वप्नांतील देहावर तुझी जशी कोणत्याही प्रकारची अहंबुद्धि नाहीं, तद्वत या जीवंत शरीरावरही तुझी अहंबुद्धि नसावी.

**देहात्मधीरेव नृणामसिद्ध्यां जन्मादिदु:खप्रभवस्य बीजम्**
**यतस्ततस्त्वं जहि तां प्रयत्नात्त्यक्ते तु चित्ते न पुनर्भवाशा ।।१६६।।**

ज्यांचे चित्त दूषित आहे अशा मनुष्यांना 'मी देह आहे' असा अभिमानच जन्मादिक दु:खे उत्पन्न होण्यास कारण आहे, ह्याकरितां तू प्रयत्न करुन त्या अभिमानाला सोडून दे. त्याला सोडले असता पुन्हा जन्मास येण्याची आशा राहणार नाहीं.

**कर्मेन्द्रियै: पञ्चभिरञ्चितोऽयं प्राणो भवेत्प्राणमयस्तु कोश:।।**
**येनात्मवानन्नमयोऽन्नपूर्ण: प्रवर्ततेऽसौ सकलक्रियासु ।।१६७।।**

पाच कर्मेंद्रियांनी युक्त जो हा प्राण तोच प्राणमय कोश होय. आत्मा ज्याचा नियन्ता आहे असा हा अन्नाने पूर्ण असलेला अन्नमय कोश या प्राणमय कोशामुळेच सकल क्रियांचे ठायी प्रवृत्त होतो.

**नैवात्मापि प्राणमयो वायुविकारो गन्तागन्ता वायुवदन्तर्बहिरेष:**
**यस्मात्किञ्चित्क्वापि न वेत्तीष्टमनिष्टं स्वं वान्यं वा किञ्चन नित्यं परतन्त्र:।।१६८।।**

प्राणमय कोश पण आत्मा नव्हे. कारण, तो वायूपासून झालेला आहे. वायूप्रमाणे हा आतबाहेर जात येत असतो. कांहीं आवडत्या किंवा नावडत्या वस्तूला अथवा स्वत:ला किंवा दुसऱ्याला कोणत्याहि वेळी व किंचितही जाणत नाहीं. आणि हा सर्वदा परतंत्र आहे.

**ज्ञानेन्द्रियाणि च मनश्च मनोमय: स्यात्कोशो ममाहमिति वस्तुविकल्पहेतु:**
**संज्ञादिभेदकलनाकलितो बलीयांस्तत्पूर्वकोशमभिपूर्य विजृम्भते य: ।।१६९।।**

पाच ज्ञानेंद्रिये आणि मन मिळून मनोमय कोश होतो. हा कोशच, 'मी आणि माझे' अशी कल्पना होण्यास कारण आहे. नामादिक भेदांच्या रचनेने युक्त असा हा बलवान कोश आपल्यापेक्षा पूर्वीच्या कोशाला व्यापून वृद्धि पावत असतो.

**पञ्चेन्द्रियै: पञ्चभिरेव होतृभि: प्रचीयमानो विषयाज्यधारया**
**जाज्वल्यमानो बहुवासनेन्धनैर्मनोमयाग्निर्दहति प्रपञ्चम् ।।१७०।।**

पाच होत्सात्यां (यज्ञातील ऋत्विज) सारख्या पाच इंद्रियांनी विषयरुप घृताच्या धारेने पेटवलेला आणि अनेक वासनारुप काष्ठांनी भडकलेला असा मनोमय कोशरुप अग्नि प्रपंचाला वहातो आहे.

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**न ह्यस्त्यविद्या मनसोऽतिरिक्ता मनो ह्यविद्या भवबन्धहेतुः**
**तस्मिन्विनष्टे सकलं विनष्टं विजृम्भितेऽस्मिन्सकलं विजृम्भते ।।१७१।।**

अविद्या मनाहून वेगळी नाहीं. मन म्हणून जे आहे, तीच संसारबंधनाला कारणीभूत अशी अविद्या होय. ते मन लयास गेले म्हणजे सर्व प्रपंचाचा लय होतो. आणि ते वृद्धिंगत झाले असता सकल प्रपंचाची वृद्धि होते.

**स्वप्नेऽर्थशून्ये सृजति स्वशक्त्या भोक्त्रादिविश्वं मन एव सर्वम्**
**तथैव जाग्रत्यपि नो विशेषस्तत्सर्वमेतन्मनसो विजृम्भणम् ।।१७२।।**

स्वप्नात दुसरे कांहीं नसता मनच भोक्ता, भोग्य इत्यादि सकल जगाला जसे उत्पन्न करते, तसेच जागृति अवस्थेतही ते उत्पन्न करते. स्वप्नात आणि जागृतीत कांहीं फरक नाहीं. तस्मात् हा सर्व प्रपंच म्हणजे मनाचा विलासच आहे.

**सुषुप्तिकाले मनसि प्रलीने नैवास्ति किञ्चित्सकलप्रसिद्धेः**
**अतो मनःकल्पित् एव पुंसः संसार एतस्य न वस्तुतोऽस्ति।।१७३।।**

सुषुप्तीच्या वेळी मनाचा लय झाला असता कांहींही नसते. ही गोष्ट सर्वानुभवसिद्ध आहे, यासाठीच जीवाला जो संसार प्राप्त झालेला आहे तो मनःकल्पित आहे, वास्तविक नाहीं.

**वायुनानीयते मेघः पुनस्तेनैव नीयते**
**मनसा कल्प्यते बन्धो मोक्षस्तेनैव कल्प्यते ।।१७४।।**

जसा वायु मेघाला आणतो आणि पुन्हा तोच घेऊन जातो. तद्वत, मनच बंधाची कल्पना करते, आणि तेच मुक्तिचीही कल्पना करते.

**देहादिसर्वविषये परिकल्प्य रागं बध्नाति तेन पुरुषं पशुवद्गुणेन**
**वैरस्यमत्र विषवत्सु विधाय पश्चादेनं विमोचयति तन्मन एव बन्धात् ।।१७५।।**

आपण जसे दाव्याने जनावराला बांधतो त्याप्रमाणे, मन देहादिक सर्व विषयांवर प्रीती उत्पन्न करुन त्या प्रीतीच्या योगाने जीवाला बंधात घालते; आणि मागून तेच मन विषयाप्रमाणे या देहादिक विषयांवर विसरपणा (वैराग्य) उत्पन्न करुन या जीवाला बंधातून सोडविते.

**तस्मान्मनः कारणमस्य जन्तोर्बन्धस्य मोक्षस्य च वा विधाने**
**बन्धस्य हेतुर्मलिनं रजोगुणैर्मोक्षस्य शुद्धं विरजस्तमस्कम् ।।१७६।।**

तस्मात्; मनच या जीवाला बंधात घालण्यास आणि त्यातून सोडविण्यास कारण आहे. मन जर रजोगुणाने आणि तमोगुणाने मलिन झाले तर ते बंधास कारण आहे. आणि तेच तर रजोगुणाने आणि तमोगुणाने यांनी रहित अर्थात शुद्ध होईल तर ते मोक्षास कारण होते.

**विवेकवैराग्यगुणातिरेकाच्छुद्धत्वमासाद्य मनो विमुक्त्यै**
**भवत्यतो बुद्धिमतो मुमुक्षोस्ताभ्यां दृढाभ्यां भवितव्यमग्रे ।।१७७।।**

विवेक आणि वैराग्य हे दोन गुण वाढल्याने, मन शुद्धपणास प्राप्त होऊन मोक्षास कारण होते. यासाठीच बुद्धिमान मुमुक्षुचे विवेक आणि वैराग्य हे दोन गुण प्रथमच दृढ झाले पाहिजेत.

**मनो नाम महाव्याघ्रो विषयारण्यभूमिषु**

V

**pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files**
**Get yours now!**
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**चरत्यत्र न गच्छन्तु साधवो ये मुमुक्षवः ।।१७८।।**
मन नावाचा मोठा वाघ विषयरुप अरण्यातील भूमीवर फिरत आहे.
यासाठी मुक्तीची इच्छा करणारे जे सत्पुरुष त्यांनी तेथे जाऊ नये.
**मनः प्रसूते विषयानशेषान्स्थूलात्मना सूक्ष्मतया च भोक्तुः**
**शरीरवर्णाश्रमजातिभेदान् गुणक्रियाहेतुफलानि नित्यम् ।।१७९।।**
भोक्त्यासाठी स्थूल आणि सूक्ष्म विषयांना, शरीर, वर्ण, आश्रम आणि जाति यांच्या भेदांना, गुण, क्रिया, कारणे आणि त्यांची फळे यांना मनच सर्वदा उत्पन्न करीत असते.
**असंगचिद्रूपममुं विमोह्य देहेन्द्रियप्राणगुणैर्निबध्य**
**अहंममेति भ्रमयत्यजस्त्रं मनः स्वकृत्येषु फलोपभुक्तिषु ।।१८०।।**
असंग आणि चैतन्यरुप अशा या जीवाला मनच मोहित करुन देह, इंद्रिये आणि प्राण या बंधनांनी बांधून व फलोपभोगरुप आपल्या कृत्यांवर अहंता आणि ममता उत्पन्न करुन नेहमी भ्रमवीत असते.
**अध्यासदोषात्पुरुषस्य संसृतिः अध्यासबन्धस्त्वमुनैव कल्पितः**
**रजस्तमोदोषवतोऽविवेकिनो जन्मादिदुःखस्य निदानमेतत् ।।१८१।।**
अध्यासरुप दोषाने जीवाला संसार प्राप्त होतो आणि अध्यास हे बंधन मनानेच कल्पिलेले आहे. तस्मात रजोगुण आणि तमोगुण हे दोष ज्याच्या अंगी आहेत अशा अविवेकी जीवाला जन्मादिक दुःखांचे कारण मनच आहे.
**अतः प्राहुर्मनोऽविद्यां पण्डितास्तत्त्वदर्शिनः**
**येनैव भ्राम्यते विश्वं वायुनेवाभ्रमण्डलम् ।।१८२।।**
यासाठी तत्तवज्ञानी विद्वान लोक मनालाच अविद्या म्हणतात. वायु जसा मेघमंडळाला फिरवीत असतो त्याप्रमाणे मनच जगाला भ्रमवीत आहे.
**तन्मनःशोधनं कार्यं प्रयत्नेन मुमुक्षुणा**
**विशुद्धे सति चैतस्मिन्मुक्तिं करफलायते ।।१८३।।**
तस्मात्, मुक्त होऊ इच्छिणाऱ्या पुरुषाने प्रयत्न करुन मनाची शुद्धि करावी. हे मन शुद्ध झाले असता मुक्ति हस्तगत होते.
**मोक्षैकसक्त्या विषयेषु रागं निर्मूल्य संन्यस्य च सर्वकर्म**
**सच्छ्रद्धया यः श्रवणादिनिष्ठो रजःस्वभावं स धुनोति बुद्धेः ।।१८४।।**
जो पुरुष एका मोक्षावरच आसक्ति ठेवून विषयांवरची गोडी नाहींशी करुन टाकतो, सर्व कर्मांचा त्याग करतो, आणि चांगल्या श्रद्धेने श्रवण, मनन इत्यादिकांचे ठायी तत्पर होतो, तो पुरुष बुद्धीच्या रजोगुणी स्वभावाला नाहींसा करतो.
**मनोमयो नापि भवेत्परात्मा ह्याद्यन्तवत्त्वात्परिणामिभावात्**
**दुःखात्मकत्वाद्विषयत्वहेतोः द्रष्टा हि दृश्यात्मतया न दृष्टः ।।१८५।।**
हा मनोमय कोशही परमात्मा नव्हे. कारण या कोशाचा आदि आणि अंत आहे; याच्या अवस्था बदलतात; हा दुःखमय आहे; आणि हा दृश्य आहे. आत्मा तर आदी, अंत, परिणाम आणि दुःख यांनी रहित आहे व द्रष्टा आहे. जो द्रष्टा तो दृश्य होऊ शकत नाहीं.

V
pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

**बुद्धिर्बुद्धीन्द्रियैः सार्धं सवृत्तिः कर्तृलक्षणः**
**विज्ञानमयकोशः स्यात्पुंसः संसारकारणम् ।।१८६।।**

ज्ञानेंद्रिये, वृत्ति आणि बुद्धी ही सर्व मिळून कर्तृरुप विज्ञानमय कोश होय. हा जीवाला संसार प्राप्त होण्याचे कारण होय.

**अनुव्रजच्चित्प्रतिबिम्बशक्तिः विज्ञानसंज्ञः प्रकृतेर्विकारः**
**ज्ञानक्रियावानहमित्यजस्त्रं देहेन्द्रियादिष्वभिमन्यते भृशम् ।।१८७।।**

चैतन्याचे प्रतिबिंब ज्याच्या बरोबर येत असते असा हा विज्ञानमय नावाचा प्रकृतीचा विकार (कार्य), देह, इंद्रिये इत्यादिकांचे ठायी विज्ञानरुप क्रिया करणारा 'मी आहे' असा अतिशय अभिमान निरंतर मानीत असतो.

**अनादिकालोऽयमहंस्वभावो जीवः समस्तव्यवहारवोढा**
**करोति कर्माण्यपि पूर्ववासनः पुण्यान्यपुण्यानि च तत्फलानि ।।१८८।।**
**भुङ्क्ते विचित्रास्वपि योनिषु व्रजन्नायाति निर्यात्यध ऊर्ध्वमेषः**
**अस्यैव विज्ञानमयस्य जाग्रत्स्वप्नाद्यवस्था सुखदुःखभोगः।।१८९।।**
**देहादिनिष्ठाश्रमधर्मकर्मगुणाभिमानं सततं ममेति**
**विज्ञानकोशोऽयमतिप्रकाशः प्रकृष्टसान्निध्यवशात्परात्मनः**
**अतो भवत्येष उपाधिरस्य यदात्मधीः संसरति भ्रमेण ।।१९०।।**

'मी मी' असा अभिमान बाळगणे हा ज्याचा स्वभाव, असा हा सकल व्यवहार चालवणारा जो अनादिकाळचा विज्ञानमय कोश त्यालाच जीव म्हणतात. हा पूर्व वासनेच्या योगाने पुण्य कर्मे किंवा पाप कर्मे करीत असतो; नानाप्रकारच्या योनीमध्ये जाऊन त्या कर्माची फळे भोगतो; हा वरच्या लोकी निघून जातो, व खाली येतो; याच विज्ञानमय कोशाला जाग्रत, स्वप्न इत्यादिक अवस्था आहेत. सुखदुःखांचा उपभोग यालाच आहे; आणि देहादिकांस अवलंबून असणारी जी धर्मकर्मे आणि गुण त्यांच्या संबंधाने सतत 'माझे माझे' असा अभिमान हाच धरीत असतो. परमात्म्याच्या अतिशय सानिध्यामुळे हा विज्ञानमय कोश अतिशय प्रकाशयुक्त आहे. म्हणूनच हा परमात्म्याचा उपाधि रुप आहे. या उपाधिवर भ्रांतीने 'मी मी' असा अभिमान बाळगल्यामुळे पुरुष जन्ममरणरुप संसार पावत आहे.

**योऽयं विज्ञानमयः प्राणेषु हृदि स्फुरत्स्वयंज्योतिः**
**कूटस्थः सन्नात्मा कर्ता भोक्ता भवत्युपाधिस्थः ।।१९१।।**

स्वयंप्रकाश आत्मा इंद्रियांचे ठायी सामान्यज्ञानरुपाने स्फुरत असतो, तेव्हां त्याला कूटस्थ म्हणतात आणि तोच उपाधिचे ठायी असतो, तेव्हां त्याला कर्ता आणि भोक्ता म्हणतात.

**स्वयं परिच्छेदमुपेत्य बुद्धेस्तादात्म्यदोषेण परं मृषात्मनः**
**सर्वात्मकः सन्नपि वीक्षते स्वयं स्वतः पृथक्त्वेन मृदो घटानिव ।।१९२।।**

अगदी असत्य जिचे स्वरुप, अशी बुद्धि आणि आपण एकच आहोत, अशी समजुत हाच ज्याचा दोष, त्याच्या योगाने पुरुष स्वतः परिच्छेदास प्राप्त होऊन, आपण सर्वव्यापक असताही, घटांना जसे मृत्तिकेहून वेगळे पहावे, त्याप्रमाणे पदार्थांना आपल्याहून वेगळे पाहतो.

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

**उपाधिसम्बन्धवशात्परात्मा ह्युपाधिधर्मानुनु भाति तद्गुणः**
**अयोविकारानविकारिवन्हिवत् सदैकरुपोऽपि परः स्वभावात् ।।१९३।।**
अग्नि स्वभावतः निर्विकार असताही लोखंडाच्या विकारास अनुसरल्यामुळे
जसा लोखंडाचे गुण त्याच्या अंगी आहेत असा भासतो,
तद्वत, आत्मा स्वभावतः निरंतर एकरुप असताही उपाधिचा संबंध होऊन
त्याच्या धर्मास अनुसरल्यामुळे उपाधिचे गुण त्याच्या अंगी आहेत असा भासतो.

**शिष्य उवाच**

**भ्रमेणाप्यन्यथा वाऽस्तु जीवभावः परात्मनः**
**तदुपाधेरनादित्वान्नानादेर्नाश इष्यते ।।१९४।।**
**अतोऽस्य जीवभावोऽपि नित्यो भवति संसृतिः**
**न निवर्तेत तन्मोक्षः कथं मे श्रीगुरो वद।।१९५।।**
शिष्य म्हणाला- गुरुवर्या ! परमात्म्याला जीवपणा जो आलेला आहे,
तो भ्रांतीने आलेला असो की दुसऱ्या कोणत्याही प्रकारे आलेला असो.
तथापि जीवाची उपाधि अनादि आहे, आणि अनादि वस्तूंचा नाश
कोणालाही संमत नाहीं. म्हणून या जीवाचा जीवपणा नित्य आहे, म्हणूनच
(त्यामुळे आलेला) संसार कधीही नाहींसा होणार नाहीं.
तर मग मोक्ष कसा मिळणार? हे मला कथन करा.

**श्रीगुरुरुवाच**

**सम्यक्पृष्टं त्वया विद्वन्सावधानेन तच्छृणु**
**प्रामाणिकी न भवति भ्रान्त्या मोहितकल्पना ।।१९६।।**
श्रीगुरु म्हणाले - सुज्ञा ! बरे विचारलेस, तर आता सावधपणाने ऐक.
भ्रांतीने मोहित झाल्यानंतरची जी कल्पना, ती प्रमाणसिद्ध (खरी) असत नाहीं.

**भ्रान्तिं विना त्वसङ्गस्य निष्क्रियस्य निराकृतेः**
**न घटेतार्थसम्बन्धो नभसो नीलतादिवत् ।।१९७।।**
आकाशाला निळेपणा वगैरे गुणांचा संबंध, जसा भ्रांती वाचून संभवत नाहीं; तद्वत्
असंग, क्रियारहित आणि निराकार अशा परमात्म्याला उपाधिचा संबंध भ्रांतीवाचून
संभवत नाहीं.

**स्वस्य द्रष्टुर्निर्गुणस्याक्रियस्य प्रत्यग्बोधानन्दरुपस्य बुद्धेः**
**भ्रान्त्या प्राप्तो जीवभावो न सत्यो मोहापाये नास्त्यवस्तुस्वभावात् ।।१९८।।**
द्रष्टा, निर्गुण, क्रियारहित, प्रत्यगबोधरुप आणि आनंदरुप जसा आत्मा आहे. त्याला
बुद्धीशी ऐक्य झाल्याच्या भ्रांतीने जीवपणा प्राप्त झालेला आहे. तो सत्य नाहीं
म्हणून भ्रांति दूर होईल तेव्हां अर्थात् मिथ्या असलेला जीवपणा नाहीं. कारण, भ्रांति
दूर झाली असता स्वतः नाहींसे होणे हा मिथ्या वस्तूचा स्वभावच आहे.

**यावद्भ्रान्तिस्तावदेवास्य सत्ता मिथ्याज्ञानोज्जृम्भितस्य प्रमादात्**
**रज्ज्वां सर्पो भ्रान्तिकालीन एव भ्रान्तेर्नाशे नैव सर्पोऽपि तद्वत् ।।१९९।।**
बेसावधपणामुळे मिथ्याज्ञानाच्या योगाने भासणाऱ्या वस्तूची सत्ता, जोपर्यंत भ्रांति
तोपर्यंतच असते. जितका वेळपर्यंत भ्रांति असते तितका वेळपर्यंतच रज्जूवर सर्पाचे

**pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files**
**Get yours now!**
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

अस्तित्व असते. भ्रांतीचा नाश झाला असता सर्प भासत नाहीं. तद्वत समजावे.

**अनादित्वमविद्यायाः कार्यस्यापि तथेष्यते**
**उत्पन्नायां तु विद्यायामाविद्यकमनाद्यपि ।।२००।।**
**प्रबोधे स्वप्नवत्सर्वं सहमूलं विनश्यति**
**अनाद्यपीदं नो नित्यं प्रागभाव इव स्फुटम् ।।२०१।।**

जशी अविद्या अनादि तसेच तिचे कार्यही अनादी, हे संमत आहे. तथापि जागृति झाली असता स्वप्न जसे नाहींसे होते तद्वत विद्या (ज्ञान) उत्पन्न झाली असता अविद्या आणि तिचे कार्य हे अनादि आहे तरी नित्य नाहीं. जसा घटाचा प्रागभाव, म्हणजे घट उत्पन्न होण्याच्या पूर्वीचा त्याचा अभाव, अनादि म्हणजे ज्याचा आदि ( उत्पत्ति काल) केव्हां हे ठाऊक नाहीं असा आहे; तथापि तो जसा घट उत्पन्न झाल्यावर नाहींसा होतो, तद्वत समजावे.

**अनादेरपि विध्वंसः प्रागभावस्य वीक्षितः**
**यद् बुद्ध्युपाधिसम्बम्धात्परिकल्पितमात्मनि ।।२०२।।**
**जीवत्वं न ततोऽन्यस्तु स्वरुपेण विलक्षणम्**
**सम्बन्धः स्त्वात्मनो बुद्ध्या मिथ्याज्ञानपुरः सरः ।।२०३।।**
**विनिवृत्तिर्भवेत्तस्य सम्यग्ज्ञानेन नान्यथा**
**ब्रह्मात्मैकत्वविज्ञानं सम्यग्ज्ञानं श्रुतेर्मतम् ।।२०४।।**

घटाचा प्रागभाव अनादि असताही त्याचा घटाची उत्पत्ति झाल्यानंतर जसा नाश झाल्याचा आढळतो, तसे अविद्या आणि अविद्येचे कार्य अनादी असताही विद्येची उत्पत्ति झाल्यावर त्याचा नाश होतो. बुद्धिरुप उपाधिच्या संबंधाने आत्म्याच्या ठिकाणी जीवपणा जो कल्पिलेला आहे, त्याचे स्वरुप कल्पनेहून वेगळे कांहींच नाहीं. आत्म्याचा बुद्धीशी संबंध होण्यास कारण मिथ्याज्ञानच आहे, आणि मिथ्याज्ञानाची निवृत्ति यथार्थ ज्ञानानेच होते. दुसऱ्या कोणत्याही रीतीने होत नाहीं. आत्मा आणि ब्रह्म यांचे ऐक्य समजणे हेच यथार्थ ज्ञान आहे आणि ते श्रुतीला संमत आहे.

**तदात्मानात्मनोः सम्यग्विवेकेनैव सिध्यति**
**ततो विवेकः कर्तव्यः प्रत्यगात्मसदात्मनोः ।।२०५।।**

**ते ज्ञान आणि अनात्मा यांच्या चांगल्या विवेचनाने सिद्ध होते. म्हणून प्रत्यगात्मा आणि अनात्मा यांचे विवेचन केलेच पाहिजे.**

**जलं पंकवदत्यन्तं पंकापाये जलं स्फुटम्**
**यथा भाति तथात्मापि दोषाभावे स्फुटप्रभः ।।२०६।।**
**असन्निवृत्तौ तु सदात्मना स्फुटं प्रतीतिरेतस्य भवेत्प्रतीचः**
**ततो निरासः करणीय एवासदात्मनः साध्वहमादिवस्तुनः ।।२०७।।**

अतिशय गढूळ झालेले पाणी कर्दम (चिखल) नाहींसा झाला म्हणजे जसे निवळ दिसते, त्याप्रमाणे अनात्मवस्तूंची निवृत्ति होते तेव्हां प्रत्यगात्म्याची सद्रूपाने स्पष्ट प्रतीति होते. यासाठी अहंकारादिक अनात्मवस्तूंचा प्रत्यगात्म्यापासून चांगला निरास केलाच पाहिजे.

**अतो नायं परात्मा स्याद्विज्ञानमयशब्दभाक्**

**pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files**
**Get yours now!**
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

**विकारित्वाज्जडत्वाच्च परिच्छिन्नत्वहेतुतः**
**दृश्यत्वाद्व्यभिचारित्वान्नानित्यो नित्य इष्यते ||२०८||**

वर सांगितलेल्या कारणास्तव हा विज्ञानमय कोश परमात्मा नव्हे. कारण, विज्ञानमय कोश विकारी आहे, जड आहे, परिच्छिन्न आहे, दृश्य आहे, आणि केव्हां केव्हां भासत असतो, व केव्हां केव्हां भासत नसतो असा आहे म्हणून हा अनित्य विज्ञानमय कोश नित्य परमात्मा होऊ शकत नाही.

**आनन्दप्रतिबिम्बचुम्बिततनुर्वृत्तिस्तमोज्जृम्भिता**
**स्यादानन्दमयः प्रियादिगुणकः स्वेष्टार्थलाभोदयः**
**पुण्यस्यानुभवे विभाति कृतिनामानन्दरुपः स्वयं**
**भूत्वा नन्दति यत्र साधु तनुभृन्मात्रः प्रयत्नं विना ||२०९||**

पुण्यवान लोकांना पुण्याचा अनुभव घेत असता आणि स्वतःची आवडती वस्तु मिळाली असता जी वृत्ति तमोगुणाने व्यापलेली असून प्रिय मोद आणि प्रमोद या गुणांनी युक्त असते तिला आनंदमय कोश म्हणतात. या वृत्तीमध्ये प्राणिमात्र यत्न केल्यावाचून स्वतः आनंदरुप होऊन आनंदाचा अनुभव घेतो.

**आनन्दमयकोशस्य सुषुप्तौ स्फूर्तिरुत्कटा स्वप्नजागरयोरीषदिष्टसंदर्शनादिना ||२१०||**

सुषुप्ति अवस्थेमध्ये आनंदमय कोशाची अतिशय स्फूर्ति होत असते. आणि स्वप्नात व जागृतीमध्ये आवडती वस्तु दृष्टीस पडणे इत्यादि कारणांनी त्याची यत्किंचित स्फूर्ति होत असते.

**नैवायमानन्दमयः परात्मा सोपाधिकत्वात्प्रकृतेर्विकारात्**
**कार्यत्वहेतोः सुकृतक्रियाया विकारसंघातसमाहितत्वात् ||२११||**

हा आनंदमय कोश देखील परमात्मा होऊ शकत नाहीं. कारण, हा उपाधिने युक्त आहे. प्रकृतीपासून झालेला आहे. म्हणूनच कार्यरुप आहे आणि पुण्य कर्माच्या फलांचा जो समुदाय त्याच्या अधीन आहे ( आणि परमात्मा याहून विलक्षण आहे.)

**पञ्चानामपि कोशानां निषेधे युक्तितः श्रुतेः**
**तन्निषेधावधिः साक्षी बोधरुपोऽवशिष्यते ||२१२||**

वेदवचन आणि युक्ति यांच्या योगाने पाचही कोशांचा (वर सांगितल्याप्रमाणे) निषेध केला असता त्या निषेधाच्या अवधिरुपाने बोधरुप साक्षी (आत्मा) अवशेष राहतो.

**योऽयमात्मा स्वयंज्योतिः पञ्चकोशविलक्षणः**
**अवस्थात्रयसाक्षी सन्निर्विकारो निरञ्जनः**
**सदानन्दः स विज्ञेयः स्वात्मत्वेन विपश्चिता ||२१३||**

**शिष्य उवाच**

**मिथ्यात्वेन निषिद्धेषु कोशेष्वेतेषु पञ्चसु**
**सर्वाभावं विना किंचिन्न पश्याम्यत्र हे गुरो**
**विज्ञेयं किमु वस्त्वस्ति स्वात्मनात्र विपश्चिता ||२१४||**

**श्रीगुरुरुवाच**

**सत्यमुक्तं त्वया विद्वन्निपुणोऽसि विचारणे**

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**अहमादिविकारास्ते तदभावोऽयमप्यनु ।।२१५।।**
**सर्वे येनानुभूयन्ते यः स्वयं नानुभूयते**
**तमात्मानं वेदितारं विद्दि बुद्ध्या सुसूक्ष्मया ।।२१६।।**

सद्गुरो ! या पाच कोशांना 'हे मिथ्या आहेत' अशा प्रकारे निषेध केला असता सर्व वस्तूंचा अभावच, येथे माझ्या पाहण्यात येतो, दुसरे कांहींच येत नाहीं तेव्हां आत्मा ज्याला जाणणे आहे अशा पुरुषाने आत्मा म्हणून कोणत्या वस्तूला समजावे?

सद्गुरु म्हणाले - सुज्ञा ! खरे म्हटलेस. तू प्रश्न करण्याच्या कामी निपुण आहेस. अहंकारादिक सर्व विकार (कार्ये) आणि त्यामागून त्यांचा अभाव यांना जो प्रत्यक्षपणे जाणतो; पण ज्याला प्रत्यक्षपणे कोणी जाणत नाहीं त्या जाणत्या वस्तूला तू अतिसूक्ष्म बुद्धीने आत्मा असे जाण.

**तत्साक्षिकं भवेत्तत्तद्यद्यद्येनानुभूयते कस्याप्यननुभूतार्थे साक्षित्वं नोपयुज्यते ।।२१७।।**

ज्या ज्या वस्तूला जो पुरुष प्रत्यक्षपणे जाणतो, तो त्या त्या वस्तूचा साक्षी होय; पण जी वस्तु प्रत्यक्षपणे कोणालाच कळत नाहीं, त्या वस्तूसंबंधाने साक्षीपणा कोणालाही देता येत नाहीं.

**असौ स्वसाक्षिको भावो यतः स्वेनानुभूयते**
**अतः परं स्वयं साक्षात्प्रत्यगात्मा न चेतरः ।।२१८।।**

अहंकारादिकांच्या अभावाचे साक्षी आपण स्वतःच आहोत. कारण, स्वतःच आपण त्यांना जाणत असतो. म्हणूनच सर्वांपेक्षा पलीकडचा आणि सर्वांचा साक्षी असा प्रत्यगात्मा आपणच आहोत. दुसरा कोणीही नाहीं.

**जाग्रत्स्वप्नसुषुप्तिषु स्फुटतरं योऽसौ समुज्जृम्भते**
**प्रत्यग्रूपतया सदाहमहमित्यन्तः स्फुरन्नैकधा**
**नानाकारविकारभागिन इमान् पश्यन्नहंधीमुखान्**
**नित्यानन्दचिदात्मना स्फुरति तं विद्धि स्वमेतं हृदि ।।२१९।।**

प्रत्यग् रुपाने निरंतर 'मी' 'मी' अशा एकाच प्रकारे स्फुरण पावणारा जो हा आत्मा जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या अवस्थांचे ठायी अत्यंत स्पष्टपणे भासमान असतो. आणि नानाप्रकारच्या विकारांना जे प्राप्त होत आहेत, अशा अहंकार बुद्धि इत्यादिकांना पाहत होत्साता जो हृदयामध्ये सच्चिदानंद रुपाने स्फुरण पावत असतो, त्या या आत्म्याला तू जाण.

**घटोदके बिम्बितमर्कबिम्बमालोक्य मूढो रविमेव मन्यते**
**तथा चिदाभासमुपाधिसंस्थं भ्रान्त्याहमित्येव जडोऽभिमन्यते।।२२०।।**
**घटं जलं तद्गतमर्कबिम्बं विहाय सर्वं विनिरीक्ष्यतेऽर्कः**
**तटस्थ एतत्त्रितयावभासकः स्वयंप्रकाशो विदुषा यथा तथा ।।२२१।।**
**देहं धियं चित्प्रतिबिम्बमेतं विसृज्य बुद्धौ निहितं गुहायाम्**
**द्रष्टारमात्मानमखण्डबोधं सर्वप्रकाशं सदसद्विलक्षणम् ।।२२२।।**
**नित्यं विभुं सर्वगतं सुसूक्ष्मं अन्तर्बहिःशून्यमनन्यमात्मनः**
**विज्ञाय सम्यङ्निजरुपमेतत्पुमान्विपाप्मा विरजो विमृत्युः।।२२३।।**
**विशोक आनन्दघनो विपश्चित् स्वयं कुतश्चिन्न बिभेति कश्चित्**

V
**pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files**
**Get yours now!**
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

**नान्योऽस्ति पन्था भवबन्धमुक्तेर्विना स्वतत्त्वावगमं मुमुक्षोः ।।२२४।।**

घडा, पाणी आणि त्यात असलेले सूर्याचे प्रतिबिंब ही सर्व सोडून दिली असता जसा याहून वेगळा, या तिघांना प्रकाशित करणारा आणि स्वयंप्रकाश असा सूर्य जाणत्या मनुष्याच्या पाहण्यात येतो, तद्वत देह, बुद्धि आणि तिच्यात असलेले चैतन्याचे प्रतिबिंब (चिदाभास) यांना सोडून दिले असता द्रष्टा, अखंडबोधरुप सर्वांना प्रकाशित करणारा, कार्य आणि कारण याहून वेगळा, नित्य, व्यापक, सर्वत्र असलेला, अत्यंत सूक्ष्म, आपल्याहून जो भिन्न नाहीं, ज्याच्या आत किंवा बाहेर दुसरी वस्तु नाहीं, असा हा स्वरुपभूत आत्मा उत्तम प्रकारे जाणण्यात येतो, तेव्हां विद्वान पुरुष पापरहित होतो, रजोगुणरहित होतो, मृत्युरहित होतो, शोकरहित होतो, आनन्दाने पूर्ण होतो, आणि स्वतः कोणापासूनही भीत नाहीं. आत्मतत्त्व जाणल्यावाचून मुमुक्षुला संसारबंधनातून सुटण्याला दुसरा मार्ग नाहीं.

**ब्रह्माभिन्नत्वविज्ञानं भवमोक्षस्य कारणम्**
**येनाद्वितीयमानन्दं ब्रह्म सम्पद्यते बुधैः ।।२२५।।**

'मी ब्रह्माहून भिन्न नाहीं' असे जे ब्रह्माशी आपल्या ऐक्याचे अपरोक्ष ज्ञान, ते संसारातून सुटका होण्यास कारण आहे. या ज्ञानाच्या योगाने विद्वान लोक, अद्वितीय आनंदघन जे ब्रह्म त्यास प्राप्त होतात.

**ब्रह्मभूतस्तु संसृत्ये विद्वान्नावर्तते पुनः**
**विज्ञातव्यमतः सम्यग्ब्रह्माभिन्नत्वमात्मनः।।२२६।।**

ब्रह्मस्वरुपी झालेला विद्वान जन्ममरणरुप संसारचक्रावर फिरुन येत नाहीं. यासाठी आत्म्याचे जे ब्रह्माशी ऐक्य ते उत्तम प्रकारे जाणावे.

**सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म विशुद्धं परं स्वतःसिद्धम्**
**नित्यानन्दैकरसं प्रत्यगभिन्नं निरन्तरं जयति ।।२२७।।**

सत्य, ज्ञान, अनंत, कार्यकारणांहून पलीकडचे, स्वतः सिद्ध, नित्य, आनंदैकरस, प्रत्यगात्म्याहून अभिन्न, असे अतिशय शुद्ध ब्रह्म निरंतर उत्कर्ष पावत आहे.

**सदिदं परमाद्वैतं स्वस्मादन्यस्य वस्तुनोऽभावात्**
**न ह्यन्यदस्ति किञ्चित्सम्यक्परमार्थतत्त्वबोधे हि ।।२२८।।**

हे सद्रूप ब्रह्म अगदी द्वैतरहित आहे. कारण, याहुन वेगळी वस्तु नाहीं. म्हणून परमार्थतत्त्वाचा उत्कृष्ट जेव्हां बोध होतो, तेव्हां दुसरी कोणतीही वस्तु रहात नाहीं.

**यदिदं सकलं विश्वं नानारुपं प्रतीतमज्ञानात्**
**तत्सर्वं ब्रह्मैव प्रत्यस्ताशेषभावनादोषम् ।।२२९।।**

हे सर्व जग, जे अज्ञानामुळे अनेक रुपाचे प्रतीतीस येत आहे, त्याच्यावरचे सर्व कल्पनेचे दोष नाहींसे झाले असता ते सर्व जग ब्रह्मच आहे.

**मृत्कार्यभूतोऽपि मृदो न भिन्नः कुम्भोऽस्ति सर्वत्र तु मृत्स्वरुपात्**
**न कुम्भरुपं पृथगस्ति कुम्भः कुतो मृषा कल्पितनाममात्रः ।।२३०।।**

घट मृत्तिकेचे कार्य असूनही तो मृत्तिकेहून वेगळा नाहीं. सर्वत्र मृत्तिकेच्या स्वरुपाहून घटाचे स्वरुप भिन्न नाहीं, तर मग ज्याचे नाव मात्र मिथ्या कल्पिलेले आहे, असा घट मृत्तिकेहून वेगळा कोठून असणार?

V
pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**केनापि मृद्भिन्नतया स्वरुपं घटस्य संदर्शयितुं न शक्यते**
**अतो घटः कल्पित एव मोहान्मृदेव सत्यं परमार्थभूतम् ||२३१||**

कोणीही मनुष्य घटाचे स्वरुप मृत्तिकेहून वेगळे दाखवू शकत नाहीं. यास्तव घट भ्रांतीनेच कल्पिलेला आहे, वास्तविक सत्य तर मृत्तिकाच आहे. तद्वत जगाचे स्वरुप ब्रह्माहून वेगळे कोणीही दाखवू शकत नाहीं. म्हणून जग भ्रांतीने कल्पिलेले आहे, आणि वास्तविक सत्य ब्रह्मच आहे.

**सद्ब्रह्मकार्यं सकलं सदैव तन्मात्रमेतन्न ततोऽन्यदस्ति**
**अस्तीति यो वक्ति न तस्य मोहो विनिर्गतो निद्रितवत्प्रजल्पः||२३२||**

हे सर्व जग सद्रूप ब्रह्माचे कार्य आहे, म्हणून सदैव ब्रह्मस्वरुपच आहे. ब्रह्माहून वेगळे नाहीं. जो मनुष्य 'हे जग ब्रह्माहून वेगळे आहे' असे म्हणतो त्याचा मोह गेला नाहीं, म्हणजे झोपी गेलेल्या मनुष्याप्रमाणे तो बकत आहे असे समजावे.

**ब्रह्मैवेदं विश्वमित्येव वाणी श्रौती ब्रूतेऽथर्वनिष्ठा वरिष्ठा**
**तस्मादेतद्ब्रह्ममात्रं हि विश्वं नाधिष्ठानाद्भिन्नतारोपितस्य||२३३||**

अथर्ववेदातील श्रुतिरुप श्रेष्ठ वाणी 'हे जग ब्रह्मच आहे' असे म्हणत आहे. तस्मात हे जग ब्रह्मच आहे. कल्पित पदार्थ आपल्या अधिष्ठानाहून वेगळा नसतो.

**सत्यं यदि स्याज्जगदेतदात्मनोऽनन्तत्त्वहानिर्निगमाप्रमाणता**
**असत्यवादित्वमपीशितुः स्यान्नैतत्त्रयं साधु हितं महात्मनाम् ||२३४||**

हे जगत स्वतःच्या रुपाने सत्य आहे असे जर मानले तर तत्त्वाची हानि होते, वेदाला अप्रामाणिकपणा येतो, आणि ईश्वराकडे असत्यवादीपणा येतो, या तीनही गोष्टी विद्वानांना इष्ट नाहींत.

**ईश्वरो वस्तुतत्त्वज्ञो न चाहं तेष्ववस्थितः**
**न च मत्स्थानि भूतानीत्येवमेव व्यचीक्लृपत् ||२३५||**

वस्तूचे तत्त्व जाणणाऱ्या ईश्वराने सांगितले आहे की दृश्य पदार्थ कल्पित आहेत यासाठी मी त्यांच्या ठिकाणी राहिलो नाहीं. आणि ते माझ्या ठिकाणी राहिले नाहींत.

**यदि सत्यं भवेद्विश्वं सुषुप्तामुपलभ्यताम्**
**सन्नोपलभ्यते किञ्चिदतोऽसत्स्वप्नवन्मृषा ||२३६||**

जग जर सत्य असते तर ते सुषुप्तीमध्ये दिसले पाहिजे. परंतु त्यावेळी कांहींही प्रतित होत नाहीं, याकरीता ते असत्य आणि स्वप्नवत मिथ्या आहे.

**अतः पृथङ्नास्ति जगत्परात्मनः पृथक्प्रतीतिस्तु मृषा गुणादिवत्**
**आरोपितस्यास्ति किमर्थवत्ताऽधिष्ठानमाभाति तथा भ्रमेण ||२३७||**

यासाठी जग परमात्म्याहून वेगळे नाहीं. वेगळे असे भासते ते रज्जुसर्पादिकांप्रमाणे मिथ्या आहे. कल्पित पदार्थाला काय सत्यता असते ? भ्रांतीने तशा तऱ्हेचे (कल्पित पदार्थासारखे) अधिष्ठानच भासत असते.

**भ्रान्तस्य यद्यद्भ्रमतः प्रतीतं ब्रह्मैव तत्तद्रजतं हि शुक्तिः**
**इदंतया ब्रह्म सदैव रुप्यते त्वारोपितं ब्रह्मणि नाममात्रम् ||२३८||**

भ्रांति पावलेल्या पुरुषाला जे जे कांहीं भासते, ते ते अधिष्ठानच (ब्रह्म) होय. याहून वेगळे नाहीं. जसे शुक्तीवर भासणारे जे रजत (रुपे) ती शुक्तीच होय. शुक्तीहून वेगळे

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

रजत नाहीं. भ्रांति होते तेव्हां 'हे रजत आहे' असे जे वाक्य भ्रांति पावलेल्या पुरुषाच्या तोंडातून निघते, या वाक्यातील 'हे' या अंशाने जसे नेहमी शुक्तीचे निरुपण होत असते, त्याप्रमाणे 'हे' जगत आहे, या वाक्यातही 'हे' या वाक्यांशाने नेहमी ब्रह्माचेच निरुपण होत असते. शुक्तीवर कल्पिलेले रजत असे केवळ नावाचेच असते, तद्वत ब्रह्मावर कल्पिलेले जगत केवळ नावाचेच असते.

**अतः परं ब्रह्म सदद्वितीयं विशुद्धविज्ञानघनं निरञ्जनम्**
**प्रशान्तमाद्यन्तविहिनमक्रियं निरन्तरानन्दरसस्वरुपम् ।।२३९।।**

यासाठी परब्रह्म सत्य आहे, सदैव अद्वितीय आहे, शुद्धज्ञानरुप आहे, निरंजन आहे, अतिशय शांत आहे, आदि आणि अंत आणि अंत यांनी रहित आहे, क्रियारहित आहे, आणि निरंतर व आनंदरसस्वरुप आहे.

**निरस्तमायाकृतसर्वभेदं नित्यं सुखं निष्कलमप्रमेयम्**
**अरुपमव्यक्तमनाख्यमव्ययं ज्योतिः स्वयं किञ्चिदिदं चकास्ति ।।२४०।।**

ते ब्रह्म मायेने कल्पिलेल्या सर्व भेदांनी रहित आहे. नित्य आहे, सुखस्वरुप आहे, अवयवरहित आहे. कोणत्याही प्रमाणाने समजू शकण्याजोगे नाहीं, निराकार आहे, मन, वाणी इत्यादिकांना व्यक्तपणे कळत नाहीं, नाम आणि नाश यांनी रहित आहे हे एक ज्योति स्वतःच प्रकाशमान होत आहे.

**ज्ञातृज्ञेयज्ञानशून्यमनन्तं निर्विकल्पकम्**
**केवलाखण्डचिन्मात्रं परं तत्त्वं विदुर्बुधाः ।।२४१।।**

ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान या संबंधाने रहित, अनंत, निर्विकल्प, केवळ अखंड चैतन्यरुप अशा प्रकारच्या परब्रह्मरुप तत्त्वाला ज्ञानी जाणतात.

**अहेयमनुपादेयं मनोवाचामगोचरम् अप्रमेयमनाद्यन्तं ब्रह्म पूर्णं महन्महः।।२४२।।**

जे टाकता येत नाहीं, घेता येत नाहीं, मन आणि वाणी यांना अगम्य, प्रमाणे जेथे चालत नाहींत, ज्याचा आदि अंत नाहीं, ते ब्रह्म परिपूर्ण व महान तेजोमय आहे.

**तत्त्वंपदाभ्यामभिधीयमानयोर्ब्रह्मात्मनोः शोधितयोर्यदीत्थम्**
**श्रुत्या तयोस्तत्त्वमसीति सम्यग् एकत्वमेव प्रतिपाद्यते मुहुः ।।२४३।।**

अशा प्रकारे ज्याचे विवेचन केले त्या 'तत' पदाचा अर्थ ईश्वर आणि 'त्वं' पदाचा अर्थ जीव. या दोघांच्या 'तत्त्वमसि' (छान्दो.६-८) पूर्ण ऐक्याचे श्रुति वारंवार प्रतिपादन करीत आहे.

**ऐक्यं तयोर्लक्षितयोर्न वाच्ययोर्निगद्यतेऽन्योन्यविरुद्धधर्मिणोः**
**खद्योतभान्वोरिव राजभृत्ययोः कूपोम्बुरोश्योः परमाणुमेर्वोः ।।२४४।।**

ईश्वर आणि जीव यांचे जे ऐक्य श्रुति सांगत आहे, ते लक्ष्यरुपाने आहे; पण वाच्यरुपाने नाहीं. कारण, सूर्य आणि काजवा, राजा आणि चाकर, समुद्र आणि विहिर, तसाच मेरु आणि परमाणु यांच्या परस्पर योग्यतेत जसे महदंतर आहे तद्वत वाच्यार्थरुप ईश्वर आणि जीव यांच्या योग्यतेत महदंतर आहे.

**तयोर्विरोधोऽयमुपाधिकल्पितो न वास्तवः कश्चिदुपाधिरेषः**
**ईशस्य माया महदादिकारणं जीवस्य कार्यं शृणु पञ्चकोशम् ।।२४५।।**

त्यांचे हे महदंतर उपाधिने कल्पिलेले आहे, आणि कोणतीही उपाधि खरी नसते.

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

महदादिकांचे उत्पत्तिस्थान जी माया ही ईश्वराची उपाधि होय. आणि मायेचे कार्यरुप जे पंचकोश, ही जीवाची उपाधि होय. हे श्रवण कर.

**एतावुपाधी परजीवयोस्तयोः सम्यङ्-निरासे न परो न जीवः**
**राज्यं नरेन्द्रस्य भटस्य खेटकस्तयोरपोहे न भटो न राजा ||२४६||**

हे जे जीव आणि ईश्वर यांची उपाधि, ते अगदी काढून टाकले असता ईश्वर नाहीं, आणि जीव नाहीं. ज्याप्रमाणे राज्य ही राजाची उपाधि आणि तरवार ही योद्ध्याची उपाधि या दोन्ही उपाधि नसतात तेव्हा कोणी राजा नाहीं व कोणी योध्दा नाहीं.

**अथात आदेश इति श्रुतिः स्वयं निषेधति ब्रह्मणि कल्पितं द्वयम्**
**श्रुतिप्रमाणानुगृहीतयुक्त्या तयोर्निरासः करणीय एव ||२४७||**

''अथात आदेशो नेति नेति'' (बृह. २-३-६) ही श्रुति ब्रह्माच्या ठिकाणी कल्पिलेल्या द्वैताचा स्वतः निषेध करीत आहे. म्हणून श्रुतिप्रमाणानुकूल युक्तिने वर सांगितलेल्या उपाधींचा त्याग केलाच पाहिजे.

**नेदं नेदं कल्पितत्वान्न सत्यं रज्जुदृष्टव्यालवत्स्वप्नवच्च**
**इत्थं दृश्यं साधुयुक्त्या व्यपोह्य ज्ञेयः पश्चादेकभावस्तयोर्यः||२४८||**

'हे दृश्य ब्रह्म नाहीं, हे दृश्य ब्रह्म नाहीं,' कारण दृश्य हे ब्रह्माचे ठायी कल्पित आहे आणि कल्पित आहे म्हणूनच रज्जूवर भासलेल्या सर्पाप्रमाणे व स्वप्नाप्रमाणे सत्य नाहीं. अशा प्रकारे सुयुक्तीने सर्व दृश्य वस्तूंचा निषेध करुन नंतर ईश्वराचा आणि जीवाचा जो एकभाव आहे, तो जाणावा.

**ततस्तु तौ लक्षणया सुलक्ष्यौ तयोरखण्डैकरसत्वसिद्धये**
**नालं जहत्या न तथाजहत्या किन्तूभयार्थात्मिकयैव भाव्यम् ||२४९||**

जीवात्मा व परमात्मा यांच्या अखण्डएकरसतेच्या सिद्धीसाठी, महावाक्यामध्ये लक्षणा करण्याने त्याचे ज्ञान होते. त्याचे यथार्थ ज्ञान झाले नाही तर जहतीलक्षणेचा व अजहतीलक्षणेचा उपयोग नाहीं.
याकरीता येथे जहत्यजहती (भागत्याग) लक्षणाचा उपयोग केला पाहिजे.

**स देवदत्तोऽयमितीह चैकता विरुद्धर्मांशमपास्य कथ्यते**
**यथा तथा तत्त्वमसीति वाक्ये विरुद्धधर्मानुभयत्र हित्वा ||२५०||**
**संलक्ष्य चिन्मात्रतया सदात्मनोः अखण्डभावः परिचीयते बुधैः**
**एवं महावाक्यशतेन कथ्यते ब्रह्मात्मनोरैक्यमखण्डभावः ||२५१||**

'तो हा देवदत्त आहे' या वाक्यामध्ये 'तो' आणि 'हा' या दोन वाक्यांशांचा त्याग करुन, देवदत्तरुप व्यक्तींचे एकत्व जसे सांगितले जाते. तद्वत 'तत्त्वमसि' या वाक्यामध्ये तत् शब्दाचा वाच्यार्थ ईश्वर याची उपाधि माया आणि त्वपदाचा वाच्यार्थ जीव याची उपाधि अंतःकरण या दोन्ही विरुद्ध अंशांचा त्याग करुन, शुद्ध चैतन्यरुपाने अखंडपणाचा ज्ञानी लोक अनुभव घेतात. अशा प्रकारे शेकडो महावाक्ये भागत्याग लक्षणेने ईश्वर आणि जीव यांचे अखंड ऐक्य सांगत आहेत.

**अस्थूलमित्येतदसन्निरस्य सिद्धं स्वतो व्योमवदप्रतर्क्यम्**
**अतो मृषामात्रमिदं प्रतीतं जहीहि यत्स्वात्मतया गृहीतम्**
**ब्रह्माहमित्येव विशुद्धबुद्ध्या विद्धि स्वमात्मानमखण्डबोधम्||२५२||**

V
**pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files**
**Get yours now!**
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

'अस्थूलमनण्वह्रस्वमदीर्घम्' (बृह.३-८-७) हे श्रुतीचे वचन मिथ्या वस्तूचा निषेध करुन स्वतःसिद्ध, आकाशाप्रमाणे व्यापक आणि तर्कास विषय न होणारे, अशा ब्रह्माचा बोध करीत आहे. यासाठी, ज्यांच्याविषयी 'हा आत्मा आहे' असा तुझा ग्रह झालेला आहे, त्या ह्या मिथ्याभूत दृश्य वस्तूंचा तू त्याग कर, आणि अतिशुद्ध झालेल्या अंतःकरणाने 'मी ब्रह्म आहे' अशाच प्रकारे अखंडबोधरुप आपल्या आत्म्याला जाण.

**मृत्कार्यं सकलं घटादि सततं मृन्मात्रमेवाभित-**
**स्तद्वत्सज्जनितं सदात्मकमिदं सन्मात्रमेवाखिलम्**
**यस्मान्नास्ति सतः परं किमपि तत्सत्यं स आत्मा स्वयं**
**तस्मात्तत्त्वमसि प्रशान्तममलं ब्रह्माद्वयं यत्परम् ||२५३||**

मृत्तिकेचे कार्य म्हणजे मृत्तिकेपासुन झालेले जे घटादिक सर्व पदार्थ ते जसे नेहमी मृत्तिकारुपच असतात, तद्वत सद्रूप ब्रह्मापासून उत्पन्न झालेले हे जगत सद्रुपच आहे. तस्मात जे कांहीं आहे ते सर्व सद्रुप ब्रह्मच आहे. त्या सद्रूप ब्रह्माहून दुसरे कांहीं नाहीं, आणि ते सद्रूप ब्रह्मच स्वतः आत्मा आहे. तस्मात अतिशय शांत, निर्दोष, द्वैतरहित असे जे परब्रह्म ते तू आहेस.

**निद्राकल्पितदेशकालविषयज्ञात्रादि सर्वं यथा**
**मिथ्या तद्वदिहापि जाग्रति जगत्स्वाज्ञानकार्यत्वतः**
**यस्मात्तत्त्वमसि प्रशान्तममलं ब्रह्माद्वयं यत्परम् ||२५४अ||**
**यत्र भ्रान्त्या कल्पितं तद्विवेके तत्तन्मात्रं नैव तस्माद्विभिन्नम्**
**स्वप्ने नष्टे स्वप्नविश्वं विचित्रं स्वस्माद्भिन्नं किन्नु दृष्टं प्रबोधे ||२५४ब||**

झोपेत अज्ञानाने कल्पिलेले देश, काल दृश्य पदार्थ, व त्यांना जाणणारा इत्यादिक सर्व जसे मिथ्या आहे, तद्वत् या जागृति अवस्थेमध्येही हे जगत अज्ञानाचे कार्य असल्यामुळे मिथ्या आहे. अशा रीतीने शरिर, इंद्रिये, प्राण, अहंकार इत्यादिक हे सर्व मिथ्या आहे, त्याहून वेगळा, अतिशांत, निर्दोष, द्वैतरहित, जे परब्रह्म ते तू आहेस.

**जातिनीतिकुलगोत्रदूरगं नामरुपगुणदोषवर्जितम्**
**देशकालविषयातिवर्ति यद् ब्रह्म तत्त्वमसि भावयात्मनि ||२५५|**

जाति, नीति, कुल आणि गोत्र याहून दूर असलेले, नाम, रुप, गुण आणि दोष यांनी रहित, देश, काल आणि विषय यांच्या सीमेबाहेर असलेले असे जे ब्रह्म ते तू आहेस. तस्मात तू या विषयाची भावना आपल्या ठिकाणी कर.

**यत्परं सकलवागगोचरं गोचरं विमलबोधचक्षुषः**
**शुद्धचिद्घनमनादिवस्तु यद् ब्रह्म तत्त्वमसि भावयात्मनि ||२५६||**

जे प्रकृतीहून पलीकडे व वाणीचा अविषय आहे, जे निर्मल ज्ञानरुप नेत्राने जाणले जाते, तसेच शुद्ध, चैतन्यघन अनादि असे जे ब्रह्मरुप वस्तु ते तू आहेस. तस्मात तू या विषयाची आपल्या अंतःकरणात भावना कर.

**षड्-भिरुर्मिभिरयोगि योगिहृद्भावितं न करणैर्विभावितम्**
**बुद्ध्यवेद्यमनवद्यमस्ति यद् ब्रह्म तत्त्वमसि भावयात्मनि ||२५७||**

क्षुधा, तृषा इत्यादिक ज्या सहा उर्मि त्यांचा संबंध जेथे नाहीं, योगिजनांनी जे आपल्या हृदयात चिंतलेले, इंद्रियादिक साधनांनी जे जाणता येत नाहीं,

V
pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

बुद्धीला जे अगम्य, असे जे निर्दोष ब्रह्म ते तू आहेस.
तस्मात तू या विषयाची आपल्या चित्तात भावना कर.

**भ्रान्तिकल्पितजगत्कलाश्रयं स्वाश्रयं च सदसद्विलक्षणम्**
**निष्कलं निरुपमानवध्दि यद् ब्रह्म तत्त्वमसि भावयात्मनि ||२५८||**

भ्रांतीने कल्पिलेले जे अंशमात्र जगत त्याचे जे अधिष्ठान होय, स्वतःच्याच आश्रयाने असलेले अर्थात ज्याला दुसऱ्याचा आश्रय नको, कार्य आणि कारण याहून जे विलक्षण, ज्याला अवयव नाहींत, आणि ज्याला उपमा नाहीं,
असे जे ब्रह्म ते तू आहेस, असे तू चित्तात चिंतन कर.

**जन्मवृद्धिपरिणत्यपक्षय व्याधिनाशनविहीनमव्ययम्**
**विश्वसृष्ट्यवविघातकारणं ब्रह्म तत्त्वमसि भावयात्मनि ||२५९||**

जन्म, वृद्धि, परिणाम, अपक्षय, व्याधि आणि नाश या विकारांनी जे रहित आहे, जे अव्यय आहे, आणि जे जगाची उत्पत्ति, स्थिति व संहार यास कारण आहे, ते ब्रह्म तू आहेस.

**तस्मात तू या विषयाची आपल्या ठिकाणी भावना कर.**

**अस्तभेदमनपास्तलक्षणं निस्तरङ्गजलराशिनिश्चलम्**
**नित्यमुक्तमविभक्तमूर्ति यद् ब्रह्म तत्त्वमसि भावयात्मनि ||२६०||**

जेथे भेद नाहीं, ज्याचे लक्षण नश्वर नाहीं, तरंगरहित समुद्राप्रमाणे जे निश्चल आहे, जे नित्यमुक्त आहे आणि ज्याच्या स्वरुपाचा विभाग होत नाहीं, ते ब्रह्म तू आहेस.
तस्मात तू या विषयाची आपल्या ठिकाणी भावना कर.

**एकमेव सदनेककारणं कारणान्तरनिरास्यकारणम्**
**कार्यकारणविलक्षणं स्वयं ब्रह्म तत्त्वमसि भावयात्मनि ||२६१||**

स्वतः एकटे असून अनेकांचे कारण, दुसरी कारणे दूर करण्यास कारणभूत आणि स्वतः कार्यकारणाहून विलक्षण असे जे ब्रह्म ते तू आहेस.
तस्मात तू या विषयाची आपल्या ठिकाणी भावना कर.

**निर्विकल्पकमनल्पमक्षरं यत्क्षराक्षरविलक्षणं परम्**
**नित्यमव्ययसुखं निरञ्जनं ब्रह्म तत्त्वमसि भावयात्मनि ||२६२||**

विकल्परहित, सर्वापेक्षा मोठे, अविनाशी, जीव आणि ईश्वर याहून विलक्षण, नित्य, अनश्वर, सुखरुप आणि निरंजन असे जे परब्रह्म, ते तू आहेस.
तस्मात तू या विषयाची आपल्या ठिकाणी भावना कर.

**यद्विभाति सदनेकधा भ्रमान्नामरुपगुणविक्रियात्मना**
**हेमवत्स्वयमविक्रियं सदा ब्रह्म तत्त्वमसि भावयात्मनि ||२६३||**

जे सद्रूप ब्रह्म सुवर्णासारखे एक असता नाम, रुप आणि गुण या विकारांच्या रुपाने अनेक प्रकारचे भासते; पण स्वतः सदैव निर्विकार असते. ते ब्रह्म तू आहेस.
तस्मात या विषयाची तू आपल्या ठिकाणी भावना कर.

**यच्चकास्त्यनपरं परात्पर प्रत्यगेकरसमात्मलक्षणम्**
**सत्यचित्सुखमनन्तमव्ययं ब्रह्म तत्त्वमसि भावयात्मनि ||२६४||**

जे प्रकाशमान, प्रत्यग् रुप, एकरस, स्वस्वरुप तसेच सच्चिदानंदरुप,

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

अनंत आणि अव्यय असे आहे; आणि जे स्वतः परात्पर आहे; पण ज्याच्यापलीकडे कोणी नाहीं, असे जे ब्रह्म ते तू आहेस, तस्मात् तू या विषयाची आपल्या ठिकाणी भावना कर.

**उक्तमर्थमिममात्मनि स्वयं भावयेत्प्रथितयुक्तिभिर्धिया**
**संशयादिरहितं कराम्बुवत् तेन तत्त्वनिगमो भविष्यति ।।२६५।।**

आपल्या बुद्धीने, प्रशस्त युक्तीच्या योगाने वर सांगितलेल्या विषयाचे तू स्वतः आपल्या ठिकाणी चांगले मनन कर. म्हणजे तळहातावर असलेल्या पाण्याप्रमाणे तत्त्वज्ञान निःसंशय सुगम होईल.

**सम्बोधमात्रं परिशुद्धतत्त्वं विज्ञाय संघे नृपवच्च सैन्ये**
**तदाश्रयः स्वात्मनि सर्वदा स्थितो विलापय ब्रह्मणि विश्वजातम् ।।२६६।।**

जसा सैन्यात राजा असतो, तद्वत देहादिकांच्या समूहात (ज्ञानस्वरुप आणि अतिशय शुद्धतत्त्वरुप) असलेल्या आत्म्याला जाणून, तू त्याचाच आश्रय कर आणि स्वस्वरुपाचे ठायी सदैव राहिलेला तू, ब्रह्माचे ठायी सकल जगाचा लय कर.

**बुद्धौ गुहायां सदसद्विलक्षणं ब्रह्मास्ति सत्यं परमद्वितीयम्**
**तदात्मना योऽत्र वसेद्गुहायां पुनर्न तस्याङ्गगुहाप्रवेशः ।।२६७।।**

सत्-असताहून विलक्षण, परम अद्वितीय असे जे ब्रह्म, ते बुद्धिरुप गुहेमध्ये विराजमान आहे. जो पुरुष ब्रह्मरुपाने या गुहेमध्ये राहतो, त्याला पुन्हा या शरीररुपी गुहेत प्रवेश करावा लागत नाहीं.

**ज्ञाते वस्तुन्यपि बलवती वासनानादिरेषा**
**कर्ता भोक्ताप्यहमिति दृढा यास्य संसारहेतुः**
**प्रत्यग्दृष्ट्याऽऽत्मनि निवसता सापनेया प्रयत्ना-**
**न्मुक्तिं प्राहुस्तदिह मुनयो वासनातानवं यत् ।।२६८।।**

'मी कर्ता आहे, मी भोक्ता आहे', अशा प्रकारची जी ही अनादि बलवत्तर दृढ वासना,ती या जीवाला संसार प्राप्त होण्यास कारण आहे म्हणून प्रत्यग्दृष्टीच्या योगाने स्वस्वरुपी राहणाऱ्या पुरुषाने ब्रह्मतत्त्व जाणले असताही ती वासना प्रयत्नाने घालवावी. कारण, वासना कृश होत जाणे याला मुनी, मुक्ती म्हणतात.

**अहंममेति यो भावो देहाक्षादावनात्मनि**
**अध्यासोऽयं निरस्तव्यो विदुषा स्वात्मनिष्ठया ।।२६९।।**

देह इंद्रिये इत्यादिक अनात्म वस्तूंचे ठायी जो 'मी आणि माझे' असा भाव याचे नाव अध्यास आहे. हा अध्यास ज्ञानी पुरुषाने स्वस्वरुपी राहून घालवावा.

**ज्ञात्वा स्वं प्रत्यगात्मानं बुद्धितद्वृत्तिसाक्षिणम्**
**सोऽहमित्येव सद्वृत्त्याऽनात्मन्यात्ममतिं जहि ।।२७०।।**

बुद्धि आणि तिच्या वृत्ति यांचा साक्षी, जो स्वरुपभूत प्रत्यगात्मा त्याला जाणून, तोच '(आत्मा) मी आहे.' अशा सद्वृत्तीने तू अनात्म्यावर असलेली आत्मबुद्धी सोडून दे.

**लोकानुवर्तनं त्यक्त्वा त्यक्त्वा देहानुवर्तनम्**
**शास्त्रानुवर्तनं त्यक्त्वा स्वाध्यासापनयं कुरु ।।२७१।।**

लोकास अनुसरणे, देहास अनुसरणे व शास्त्रांस अनुसरणे सोडून देऊन

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

तू स्वतःचा अध्यास दूर कर.

**लोकवासनया जन्तोः शास्त्रवासनयापि च**
**देहवासनया ज्ञानं यथावन्नैव जायते ||२७२||**

लोकवासना, शास्त्रवासना आणि देहवासना या तिन्हीमुळें जीवाला व्हावे तसे आत्मज्ञान होत नाहीं.

**संसारकारागृहमोक्षमिच्छोरयोमयं पादनिबन्धशृंखलम्**
**वदन्ति तज्ज्ञाः पटु वासनात्रयं योऽस्माद्विमुक्तः समुपैति मुक्तिम् ||२७३||**

संसाररुप कारागृहातून सुटका होण्याची इच्छा करणाऱ्या जीवाला, वर सांगितलेल्या तीन प्रबळ वासना, पायांना जखडणाऱ्या लोखंडी बेडीसारख्या आहेत, असे तत्त्वज्ञानी म्हणतात. तस्मात या तीन वासनांपासून जो सुटला, तो मुक्तीस प्राप्त होतो.

**जलादिसंसर्गवशात्प्रभूत दुर्गन्धधूताऽगरुदिव्यवासना**
**संघर्षणेनैव विभाति सम्यग्विधूयमाने सति बाह्यगन्धे ||२७४||**
**अन्तःश्रितानन्तदूरन्तवासना धूलीविलिप्ता परमात्मवासना**
**प्रज्ञातिसंघर्षणतो विशुद्धा प्रतीयते चन्दनगन्धवत्स्फुटा ||२७५||**

जलादिकांच्या संसर्गाने उत्पन्न झालेल्या दुर्गंधाने,दबुन गेलेला मलयागराचा सुवास, अतिशय घासण्याने, वरचा दुर्गंध अगदी नाहींसा झाला म्हणजे जसा स्पष्ट समजण्यात येतो, तद्वत आत असलेल्या अनंत आणि अनिवार्य अशा दुष्टवासनारुप धुळीने अतिशय लिप्त झालेली परमात्म्याची वासना विवेकरुप अतिशय घर्षणाने अतिशय शुद्ध झाली म्हणजे चंदनाच्या सुवासाप्रमाणे स्पष्ट प्रतीतीस येते.

**अनात्मावासनाजालैस्तिरोभूतात्मवासना**
**नित्यात्मनिष्ठया तेषां नाशे भाति स्वयं स्फुटम् ||२७६||**

अनात्म वासनांच्या समूहाने आत्मवासना झाकली गेली आहे. याकरीता निरंतर आत्मनिष्ठेमध्ये स्थित राहण्याने त्या समूहांचे नाश झाला असता स्वतःच स्पष्टपणे प्रकाशित होते.

**यथा यथा प्रत्यगवस्थितं मनः तथा तथा मुञ्चति बाह्यवासनाम्**
**निःशेषमोक्षे सति वासनानां आत्मानुभूतिः प्रतिबन्धशून्या||२७७||**

मन जसे जसे प्रत्यगात्म्याचे ठायी स्थिर होते, तसे तसे ते बाह्य वासनांना सोडते. अशा रीतीने संपूर्ण वासना सुटतात तेव्हां स्वरुपाचा अनुभव प्रतिबंधरहित होतो.

**स्वात्मन्येव सदा स्थित्वा मनो नश्यति योगिनः**
**वासनानां क्षयश्चातः स्वाध्यासापनयं कुरु ||२७८||**

योग्याचे मन निरंतर स्वस्वरुपीच राहून लयास जात असते, आणि (मन स्वस्वरुपी राहिल्यानेच) वासनांचा क्षय होतो. यासाठी तू आपल्या अध्यासाला दूर कर.

**तमो द्वाभ्यां रजः सत्त्वात्सत्त्वं शुद्धेन नश्यति**
**तस्मात्सत्त्वमवष्टभ्य स्वाध्यासापनयं कुरु ||२७९||**

रज आणि सत्त्व या दोन गुणांनी तमोगुणाचा नाश होतो. सत्त्वगुणाने रजोगुणाचा नाश होतो आणि शुद्धसत्त्वगुणाने सत्त्वगुणाचा नाश होतो; तस्मात् शुद्धसत्त्वगुणाचा आश्रय करुन तू आपल्या अध्यासाला दूर कर.

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**प्रारब्धं पुष्यति वपुरिति निश्चित्य निश्चलः**
**धैर्यमालम्ब्य यत्नेन स्वाध्यासापनयं कुरु ।।२८०।।**
प्रारब्ध कर्मच शरीराला पोषीत आहे असा निर्धार करुन स्थिर हो;
आणि धैर्य करुन प्रयत्नाने आपल्या अध्यासाला दूर कर.
**नाहं जीवः परं ब्रह्मेत्यतद्व्यावृत्तिपूर्वकम्**
**वासनावेगतः प्राप्तस्वाध्यासापनयं कुरु ।।२८१।।**
'मी जीव नाहीं. तर परब्रह्म आहे' अशा प्रकारे अनात्म वस्तूंचा निषेध करुन,
वासनेच्या वेगाने प्राप्त झालेला जो आपला अध्यास त्याला तू दूर कर.
**श्रुत्या युक्त्या स्वानुभूत्या ज्ञात्वा सार्वात्म्यमात्मनः**
**क्वचिदाभासतः प्राप्तस्वाध्यासापनयं कुरु ।।२८२।।**
श्रुति, युक्ति आणि स्वतःचा अनुभव यांच्या योगाने आत्मा सर्वरुप आहे असे जाणून,
आपला जो अध्यास क्वचित आभासाने प्राप्त झालेला आहे, त्याला तू दूर कर.
**अनादानविसर्गाभ्यामीषन्नास्ति क्रिया मुनेः**
**तदेकनिष्ठया नित्यं स्वाध्यासापनयं कुरु ।।२८३।।**
आत्मा कांहीं घेत नाहीं, आणि कांहीं टाकत नाहीं, म्हणून त्याच्या अंगी किंचित देखील
क्रिया नाहीं. अशा आत्म्याच्या ठायी एकनिष्ठ होऊन तू आपल्या अध्यासाला दूर कर.
**तत्त्वमस्यादिवाक्योत्थब्रह्मात्मैकत्वबोधतः**
**ब्रह्मण्यात्मत्वदार्ढ्याय स्वाध्यासापनयं कुरु ।।२८४।।**
'तत्त्वमसि' इत्यादिक वेदवाक्यांपासून उत्पन्न झालेला, जो ब्रह्म आणि आत्मा
यांच्या ऐक्याचा बोध, त्याच्या योगाने 'ब्रह्मच आत्मा आहे' हा भाव दृढ
होण्यासाठी तू आपल्या अध्यासाला दूर कर.
**अहंभावस्य देहेऽस्मिन्निःशेषविलयावधि**
**सावधानेन युक्तात्मा स्वाध्यासापनयं कुरु ।।२८५।।**
या देहात जो अहंपणा होत आहे तो पूर्णपणे लय होईपर्यंत
तत्पर होऊन तू सावधपणाने आपल्या अध्यासाला दूर कर.
**प्रतीतिर्जीवजगतोः स्वप्नवद्भाति यावता**
**तावन्निरन्तरं विद्वन्स्वाध्यासापनयं कुरु ।।२८६।।**
सूज्ञा ! जीव आणि जगत् ही स्वप्नवत (मिथ्या) भासू लागेपर्यंत
निरंतर तू आपल्या अध्यासाला दूर कर.
**निद्राया लोकवार्तायाः शब्दादेरपि विस्मृतेः**
**क्वचिन्नावसरं दत्त्वा चिन्तयात्मानमात्मनि ।।२८७।।**
निद्रा, लोकवार्ता, शब्दादिक विषय आणि (स्वरुपाचे) विस्मरण यांना कधीही
सवड न देता तू आपल्या ठिकाणी आत्म्याचे चिंतन कर.
**मातापित्रोर्मलोद्भूतं मलमांसमयं वपुः त्यक्त्वा चाण्डालवद्दूरं ब्रह्मीभूय कृती भव ।।२८८।।**
आईबापांच्या मलापासून उत्पन्न झालेले आणि मलमांसांनी व्यापलेले
अशा या शरीराला चांडालाप्रमाणे दूर सोडून देऊन व ब्रह्मरुप होऊन तू कृतकृत्य हो.

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**घटाकाशं महाकाश इवात्मानं परात्मनि**
**विलाप्याखण्डभावेन तूष्णीं भव सदा मुने ।।२८९।।**

हे मुने ! जसा घटाकाशाचा महाकाशामध्ये लय होतो, त्याप्रमाणे आत्म्याचा (जीवाचा) परमात्म्याचे ठायी लय करुन अखंड स्वरुपास प्राप्त झालेला तू निरंतर मौन धरुन बैस.

**स्वप्रकाशमधिष्ठानं स्वयंभूय सदात्मना**
**ब्रह्माण्डमपि पिण्डाण्डं त्यज्यतां मलभाण्डवत् ।।२९०।।**

तू सद्रूपाने, स्वयंप्रकाश आणि अधिष्ठानरुप ब्रह्म स्वतः होऊन पिंड आणि ब्रह्मांड या दोहोंनाहीं विष्ठेच्या पात्राप्रमाणे टाकून दे.

**चिदात्मनि सदानन्दे देहारुढामहंधियम्**
**निवेश्य लिङ्गमुत्सृज्य केवलो भव सर्वदा ।।२९१।।**

देहावर असलेली अहंबुद्धि, सच्चिदानंदरुप परमात्म्याचे ठायी ठेवून आणि लिंगदेहाचा त्याग करुन तू सदैव केवलस्वरुपाने रहा.

**यत्रैष जगदाभासो दर्पणान्तः पुरं यथा**
**तद्ब्रह्माहमिति ज्ञात्वा कृतकृत्यो भविष्यसि ।।२९२।।**

आरशात जसे नगर दिसते, त्याप्रमाणे ज्याच्या ठिकाणी हा जगाचा आभास मात्र होतो, ते ब्रह्म मी आहे असे जाणून तू कृतकृत्य होशील.

**यत्सत्यभूतं निजरुपमाद्यं चिदद्वयानन्दमरुपमक्रियम्**
**तदेत्य मिथ्यावपुरुत्सृजेत शैलूषवद्वेषमुपात्तमात्मनः ।।२९३।।**

जे आपले स्वरुपभूत ब्रह्म, सत्य, पुरातन, चैतन्यरुप, अद्वितीय, आनंदरुप, निराकार आणि निष्क्रिय आहे, त्या ब्रह्मास प्राप्त होऊन या मिथ्याभूत शरीराला, बहुरुपी आपले घेतलेले सोंग टाकतो त्याप्रमाणे सोडून द्यावे.

**सर्वात्मना दृश्यमिदं मृषैव नैवाहमर्थः क्षणिकत्वदर्शनात्**
**जानाम्यहं सर्वमिति प्रतीतिः कुतोऽहमादेः क्षणिकस्य सिध्येत् ।।२९४।।**

दृश्य वस्तू म्हणून जितकी आहे ती सर्व अगदी खोटी आहे. 'मी' या शब्दाचा खरा अर्थ आत्मा नव्हे. कारण, त्याच्या अंगी क्षणिकपणा दिसत आहे. अहंकारदिक जे क्षणिक पदार्थ आहेत, त्यांच्या अंगी 'मी सर्व जाणतो' अशा प्रकारचा अनुभव कोठून संभवेल?

**अहंपदार्थस्त्वहमादिसाक्षी नित्यं सुषुप्तावपि भावदर्शनात्**
**ब्रूते ह्यजो नित्य इति श्रुतिः स्वयं तत्प्रत्यगात्मा सदसद्विलक्षणः।।२९५।।**
**विकारिणां सर्वविकारवेत्ता नित्याविकारो भवितुं समर्हति**
**मनोरथस्वप्नसुषुप्तिषु स्फुटं पुनः पुनर्दृष्टमसत्त्वमेतयोः ।।२९६।।**

'मी' या पदाचा खरा अर्थ जो आत्मा तो अहंकारादिकांचा साक्षी आहे. कारण, सुषुप्तीमध्ये देखील त्याचे अस्तित्व नेहमी आढळते. 'आत्मा अजन्मा आणि नित्य आहे,' असे श्रुति कंठरवाने म्हणत आहे, विकारी पदार्थांच्या सर्व विकारांना जाणणारा आहे, आणि स्वतः निरंतर निर्विकार आहे. मनोरथ स्वप्न आणि सुषुप्ति यामध्ये कार्याचा व कारणांचा खोटेपणा तर स्पष्टपणे वारंवार आढळात येतो.

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**अतोऽभिमानं त्यज मांसपिण्डे पिण्डाभिमानिन्यपि बुद्धिकल्पिते**
**कालत्रयाबाध्यमखण्डबोधं ज्ञात्वा स्वमात्मानमुपैहि शान्तिम् ||२९७||**

यासाठी, कालत्रयी ज्याचा नाश नाहीं, अशा अखंडबोधरुप आपल्या आत्म्याला जाणून, तू या मांसपिंडरुप देहावरचा आणि या देहाचा अभिमान बाळगणाऱ्या बुद्धिकल्पित अहंकारावरचा अभिमान सोडून दे आणि शांतिप्रत प्राप्त हो.

**त्यजाभिमानं कुलगोत्रनाम रुपाश्रमेष्वार्द्रशवाश्रितेषु**
**लिङ्गस्य धर्मानपि कर्तृतादिंस्त्यक्त्वा भवाखण्डसुखस्वरुपः ||२९८||**

या ओल्या शवाला चिकटून राहिलेला जो कुल, गोत्र, नाम, रुप आणि आश्रम यांच्यावरचा अभिमान आणि लिंगदेहाचे कर्तृत्वादिक धर्म यांना सोडून देऊन तू अखंड सुखरुप हो.

**सन्त्यन्ये प्रतिबन्धाः पुंसः संसारहेतवो दृष्टाः**
**तेषामेवं मूलं प्रथमविकारो भवत्यहंकारः ||२९९||**

पुरुषाला संसार प्राप्त होण्यास कारणभूत असे आढळात आलेले प्रतिबंध एकीकडे राहोत. पण त्या सर्वांचे एकच मूळ कोणते म्हणाल तर पहिलाच विकार अहंकार होय.

**यावत्स्यात्स्वस्य सम्बन्धोऽहंकारेण दुरात्मना**
**तावन्न लेशमात्रापि मुक्तिवार्ता विलक्षणा ||३००||**

जोपर्यंत या दुष्ट अहंकाराशी आपला संबंध आहे तोपर्यंत मुक्तीची गोष्ट लेशमात्र देखील नको. कारण ती गोष्टच वेगळ्या प्रकारची आहे.

**अहंकारग्रहान्मुक्तः स्वरुपमुपपद्यते चन्द्रवद्विमलः पूर्णः सदानन्दः स्वयंप्रभः||३०१||**

पुरुष अहंकाररुप पिशाच्याच्या हातून सुटला म्हणजे चंद्रासारखा निर्मल, पूर्ण, सदानंदरुप आणि स्वयंप्रकाश होऊन स्वरुपास प्राप्त होतो.

**यो वा पुरे सोऽहमिति प्रतीतो बुद्ध्या प्रक्लृप्तस्तमसाऽतिमूढया**
**तस्यैव निःशेषतया विनाशो ब्रह्मात्मभावः प्रतिबन्धशून्यः ||३०२||**

तमोगुणाने अतिशय मूढ झालेल्या बुद्धिने , शरीरावर कल्पिलेला जो अहंकार 'हे शरीर मी आहे' अशा प्रकारे प्रतीतीस येत आहे. त्याचाच पूर्णपणे लय झाला असता ब्रह्मात्मभाव निष्प्रतिबंध होतो.

**ब्रह्मानन्दनिधिर्महाबलवताऽहंकारघोराहिना**
**संवेष्ट्यात्मनि रक्ष्यते गुणमयैश्चण्डेस्त्रिभिर्मस्तकैः**
**विज्ञानाख्यमहासिना श्रुतिमता विच्छिद्य शीर्षत्रयं**
**निर्मूल्याहिमिमं निधिं सुखकरं धीरोऽनुभोक्तुंक्षमः ||३०३||**

सत्त्व, रज आणि तम या तीन प्रचंड फडा ज्याला आहेत असा जबरदस्त आणि भयंकर अहंकार नावाचा सर्प आपल्या शरीराने ब्रह्मानंदरुप निधीला वेढून त्याची राखण करीत आहे. श्रुतीचे ज्याला साहाय्य आहे अशा विज्ञान नावाच्या मोठ्या तरवारीने तीन फडा तोडून अर्थात या सर्पाचे निर्मूलन करुन सुखकर निधीचा उपभोग घेण्यास धीर पुरुषच समर्थ आहे.

**यावद्वा यत्किञ्चिद्विषदोषस्फूर्तिरस्ति चेद्देहे**
**कथमारोग्याय भवेत्तद्वदहन्तापि योगिनो मुक्त्यै ||३०४||**

V
**pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files**
**Get yours now!**
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

जोपर्यंत शरीरात थोडा देखील विषाचा विकार जाणवत असेल, तोपर्यंत आरोग्य कसे होईल. तद्वत जोपर्यंत योग्याच्या अंगी अहंता आहे तोपर्यंत मुक्ति कशी होईल?

**अहमोऽत्यन्तनिवृत्त्या तत्कृतनानाविकल्पसंहृत्या**
**प्रत्यक्तत्त्वविवेकादिदमहमस्मीति विन्दते तत्त्वम् ।।३०५।।**

अहंकाराची अतिशय निवृत्ती, त्याने केलेल्या विकल्पाचा लय आणि प्रत्यगात्म्याचा विवेक, यापासून 'हे (ब्रह्म) मी आहे' अशा प्रकारचे सत्य स्वरुप प्राप्त होते.

**अहंकारे कर्तर्यहमिति मतिं मुञ्च सहसा**
**विकारात्मन्यात्मप्रतिफलजुषि स्वस्थितिमुषि**
**यदध्यासात्प्राप्ता जनिमृतिजरादुःखबहुला**
**प्रतीचश्चिन्मूर्तेस्तव सुखतनोः संसृतिरियम् ।।३०६।।**

आत्म्याचे प्रतिबिंब ज्यात आहे, जो आत्म्याच्या (मूळच्या) स्थितीचा लोप करणारा, विकारी आणि कर्ता अशा अहंकारावरची अहंबुद्धि तू एकदम सोडून दे. कारण, प्रत्यग्रूप, चैतन्यरुप आणि आनंदरुप अशा तुला या अहंकाराच्या अध्यासामुळे जन्म, जरा, मरण आणि दुःख यांनी भरलेला असा संसार प्राप्त झाला आहे.

**सदैकरुपस्य चिदात्मनो विभोरानन्दमूर्तेरनवद्यकीर्तेः**
**नैवान्यथा क्वाप्यविकारिणस्ते विनाहमध्यासममुष्य संसृतिः ।।३०७।।**

सर्वदा एकरुप, चेतन, व्यापक, आनन्दमूर्ति, शुद्धकीर्तीमान आणि निर्विकार अशा तुला या एका अहंकाराच्या अध्यासावाचून दुसऱ्या कोणत्याही प्रकाराने कोठेही संसार नाहीं.

**तस्मादहंकारमिमं स्वशत्रुं भोक्तुर्गले कण्टकवत्प्रतीतम्**
**विच्छिद्य विज्ञानमहासिना स्फुटं भुङ्क्ष्वात्मसाम्राज्यसुखं यथेष्टम् ।।३०८।।**

जेवणाऱ्याच्या घशात जसा काटा असावा, तशा तऱ्हेच्या भासणारा जो हा अहंकाररुप आपला शत्रु त्याला विज्ञानरुप मोठ्या तरवारीने छाटून तू उघडपणे आपल्या साम्राज्यसुखाचा यथेष्ट अनुभव घे.

**ततोऽहमादेर्विनिवर्त्य वृत्तिं संत्यक्तरागः परमार्थलाभात्**
**तूष्णीं समास्स्वात्मसुखानुभूत्या पूर्णात्मना ब्रह्मणि निर्विकल्पः ।।३०९।।**

तस्मात्, परमार्थाचा लाभ झाल्यामुळे ज्याने विषयांवरची आवड सोडून दिली आहे असा तू अहंकारादिकांच्या वृत्तीला लयास नेऊन आणि आत्मसुखाच्या अनुभवाने निर्विकल्प होऊन ब्रह्माचे ठायी पूर्णरुपाने गुपचूप रहा.

**समूलकृत्तोऽपि महानहं पुनः व्युल्लेखितः स्याद्यदि चेतसा क्षणम्**
**संजीव्य विक्षेपशतं करोति नभस्वतः प्रावृषि वारिदो यथा ।।३१०।।**

जबरदस्त अहंकार समूळ कापून टाकला तथापि चित्त जर त्याला पुन्हा क्षणमात्र उकरुन काढील, तर तो पुन्हा जिवंत होऊन पावसाळ्यात वायूने फिरुन आणलेल्या ढगाप्रमाणे शेकडो विक्षेप उत्पन्न करील.

**निगृह्य शत्रोरहमोऽवकाशः क्वचिन्न देयो विषयानुचिन्तया**
**स एव संजीवनहेतुरस्य प्रक्षीणजम्बीरतरोरिवाम्बु ।।३११।।**

अहंकाररुप शत्रूचे निर्मूलन केल्यानंतर फिरुन विषयांच्या चिंतनाने त्याला कधीही सवड देऊ नये कारण ही सवडच, सुकलेल्या लिंबाच्या झाडाला पुन्हा जिवंत करणारे

V
pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

जसे पाणी, त्याप्रमाणे अहंकाराला फिरुन जिवंत करण्यास कारण होते.

**देहात्मना संस्थित एव कामी विलक्षणः कामयिता कथं स्यात्**
**अतोऽर्थसन्धानपरत्वमेव भेदप्रसक्त्या भवबन्धहेतुः ||३१२||**

विषयांची इच्छा करणारा पुरुष देहरुपानेच राहिलेला असतो.
कारण, जर त्या पुरुषाला 'मी देहाहून वेगळा आहे' असे भान असेल तर तो विषयांची इच्छा करणारा कसा होईल? तस्मात् देहरुप झाल्याने जो आत्म्यापासून वेगळेपणा प्राप्त झाला, व त्याच्या योगाने जी विषयाचे अनुसंधान करण्याची तत्परता झाली, तीच संसारबंधनास कारण आहे.

**कार्यप्रवर्धनाद्बीजप्रवृद्धिः परिदृश्यतेकार्यनाशाद्बीजनाशस्तस्मात्कार्यं निरोधयेत् ||३१३||**

बीजाची कार्यै वाढली म्हणजे बीजाची वृद्धि झाल्याचे आढळते,
आणि कार्याचा नाश झाला म्हणजे बीजाचाही नाश झाल्याचे आढळते,
तस्मात कार्य होऊ देण्यासच प्रतिबंध केला पाहिजे.

**वासनावृद्धितः कार्यं कार्यवृद्ध्या च वासना**
**वर्धते सर्वथा पुंसः संसारो न निवर्तते ||३१४||**

वासना वाढल्याने विषय वाढतात, आणि विषय वाढल्याने वासना वाढते
आणि असे झाल्याने पुरुषाचा संसार कोणत्याही प्रकारे बंद पडत नाहीं.

**संसारबन्धविच्छित्त्यै तद् द्वयं प्रदहेद्यतिः**
**वासनावृद्धिरेताभ्यां चिन्तया क्रियया बहिः ||३१५||**
**ताभ्यां प्रवर्धमाना सा सूते संसृतिमात्मनः**
**त्रयाणां च क्षयोपायः सर्वावस्थासु सर्वदा ||३१६||**

संसारबंधनाला तोडण्यासाठी वासना आणि विषय या दोहोंचा संन्याश्याने त्याग केला पाहिजे. मनात चिंतन केल्याने आणि बाहेरच्या क्रिया केल्याने वासना वाढते, आणि वाढत जाणारी वासना संसाराला उत्पन्न करते. म्हणून सर्वकाळ आणि सर्व अवस्थेत चिंतन, क्रिया आणि वासना या तिघांच्या नाशाचा उपयोग केला पाहिजे.

**सर्वत्र सर्वतः सर्वब्रह्ममात्रावलोकनैः सद्भाववासनादार्ढ्यात्तत्त्रयं लयमश्नुते ||३१७||**

सर्व ठिकाणी सर्वदा सर्व वस्तू ब्रह्मच आहेत अशा अवलोकनातून ब्रह्मभावाची वासना दृढ झाल्याने वर सांगितलेल्या तिघांचाही लय होतो.

**क्रियानाशे भवेच्चिन्तानाशोऽस्माद्वासनाक्षयः**
**वासनाप्रक्षयो मोक्षः सा जीवन्मुक्तिरिष्यते ||३१८||**

क्रियेचा नाश झाला म्हणजे चिंतनाचा नाश होतो आणि
चिंतनाचा नाश झाला म्हणजे वासनांचा नाश होतो. वासनांचा अतिशय
नाश होणे याचेच नाव मोक्ष आणि यालाच जीवन्मुक्ति म्हणतात.

**सद्वासनास्फूर्तिविजृम्भणे सति ह्यसौ विलीनाप्यहमादिवासना**
**अतिप्रकृष्टाप्यरुणप्रभायां विलीयते साधु यथा तमिस्रा ||३१९||**

रात्र फार अंधारी असली तरी ती जशी अरुणाच्या कांतीचा उदय झाला असता अगदी लयास जाते. तद्वत अतिशय प्रबल अशी ही अहंकारादिकांची वासना, ब्रह्मभावाचे अतिशय स्फुरण होऊ लागले असता लयास जाते.

V
pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

**तमस्तमःकार्यमनर्थजालं न दृश्यते सत्युदिते दिनेशे**
**तथाऽद्वयानन्दरसानुभूतौ नैवास्ति बन्धो न च दुःखगन्धः ।।३२०।।**
सुर्योदय झाला असता अंधकार आणि अंधकारापासून झालेले अनेक अनर्थ
दृष्टीस पडेनासे होतात. तद्वत अद्वैत आनंदरसाचा अनुभव आला असता
बंध नाहीं, आणि दुःखाचा गंध देखील नाहीं.
**दृश्यं प्रतीतं प्रविलापयन्स्वयं सन्मात्रमानन्दघनं विभावयन्**
**समाहितः सन्बहिरन्तरं वा कालं नयेथाः सति कर्मबन्धे ।।३२१।।**
जर तुला कर्मबंध असेल तर, तू आत बाहेर सावध राहून प्रत्यक्ष दिसणाऱ्या दृश्य
वस्तूंचा लय करीत आणि सच्चिदानंदरुप ब्रह्माची भावना करीत काळ घालीव.
**प्रमादो ब्रह्मनिष्ठायां न कर्तव्यः कदाचन ।**
**प्रमादो मृत्युरित्याह भगवान्ब्रह्मणः सुतः ।।३२२।।**
ब्रह्मनिष्ठेविषयी प्रमाद (गाफलपणा) कधीही करु नये कारण,
'प्रमाद हाच मृत्यु आहे' असे भगवान सनत्कुमार मुनीने म्हटले आहे.
**न प्रमादादनर्थोऽन्यो ज्ञानिनः स्वस्वरुपतः**
**ततो मोहस्ततोऽहंधीस्ततो बन्धस्ततो व्यथा ।।३२३।।**
स्वस्वरुपाविषयी प्रमाद करणे याहून दुसरा ज्ञान्याला मोठा अनर्थ नाहीं.
कारण, प्रमादापासून मोह होतो, मोहापासून अहंकार होतो,
अहंकारापासून बंध होतो, आणि बंधनापासून व्यथा होते.
**विषयाभिमुखं दृष्ट्वा विद्वांसमपि विस्मृतिः**
**विक्षेपयति धीदोषैर्योषा जारमिव प्रियम् ।।३२४।।**
व्यभिचारी स्त्री जशी आपल्या आवडत्या प्रेमी जाराची बुद्धी बिघडवून विक्षिप्त करते,
त्याप्रमाणे विद्वानाला देखील विषयांकडे वळलेला पाहून आत्मविस्मरण
त्याला बुद्धीच्या दोषांनी विक्षिप्त करते.
**यथापकृष्टं शैवालं क्षणमात्रं न तिष्ठति**
**आवृणोति तथा माया प्राज्ञं वापि पराङ्मुखम् ।।३२५।।**
एकीकडे केलेले शेवाळ जसे तथा स्थितीत क्षणभर देखील रहात नाहीं,
तर पुन्हा पाण्याला झाकून टाकते, तद्वत माया असत्य जाणली
तथापि बहिर्मुख झालेल्या विद्वानाला क्षणात घेरते.
**लक्ष्यच्युतं चेद्यदि चित्तमीषद् बहिर्मुखं सन्निपतेत्ततस्ततः**
**प्रमादतः प्रच्युतकेलिकन्दुकः सोपानङ्क्तौ पतितो यथा तथा ।।३२६।।**
ज्ञान्याचे चित्त जर लक्ष्यावरुन घसरुन किंचित बहिर्मुख झाले तर,
गैरसावधपणामुळे सुटून गेलेला खेळायचा चेंडू जसा पायऱ्यांवरुन आदळत
खाली पडतो, तद्वत ते चित्त इकडे तिकडे आदळत खाली पडते.
**विषयेष्वाविशच्चेतः संकल्पयति तद्गुणान्**
**सम्यक्संकल्पनात्कामः कामात्पुंसः प्रवर्तनम् ।।३२७।।**
विषयांचे ठायी प्रवेश करणारे चित्त, विषयांच्या ठिकाणी गुणांची कल्पना करते,
कल्पनेपासून काम उत्पन्न होतो, आणि कामामुळे पुरुषाची

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

(विषयांचे ठायी) प्रवृत्ति होते.

**अतः प्रमादान्न परोऽस्ति मृत्युः विवेकिनो ब्रह्मविदः समाधौ**
**समाहितः सिद्धिमुपैति सम्यक् समाहितात्मा भव सावधानः ||३२८||**

यासाठी विचारशील ब्रह्मवेत्त्याला समाधिच्या समयी प्रमादाहून वेगळा मृत्युच नाहीं. ब्रह्माचे ठायी चित्ताची एकाग्रता ठेव, आणि विषयांच्या संबंधाने सावध रहा.

**ततः स्वरुपविभ्रंशो विभ्रष्टस्तु पतत्यधः**
**पतितस्य विना नाशं पुनर्नारोह ईक्ष्यते ||३२९||**

प्रमाद केल्याने स्वरुपापासून भ्रंश होतो, आणि भ्रष्ट झालेला पुरुष अधःपात पावतो, जो अधःपात पावला तो नाशच पावतो; पण पुन्हा वर चढू शकत नाहीं.

**संकल्पं वर्जयेत्तस्मात्ससर्वानर्थस्य कारणम्**
**जीवतो यस्य कैवल्यं विदेहे स च केवलः**
**यत्किञ्चित् पश्यतो भेदं भयं ब्रूते यजुःश्रुतिः ||३३०||**

तस्मात सर्व अनर्थाचे मूळ जो संकल्प तो सोडून दिला पाहिजे. ज्याला जीवन्मुक्ति प्राप्त होते त्याला विदेहमुक्तिही प्राप्त होते. जो पुरुष किंचित भेददृष्टी राखतो, त्याला भय प्राप्त होते असे यजुर्वेद म्हणतो.

**यदा कदा वापि विपश्चिदेष ब्रह्मण्यनन्तेऽप्यणुमात्रभेदम्**
**पश्यत्यथामुष्य भयं तदैव यद्वीक्षितं भिन्नतया प्रमादात् ||३३१||**

जो विद्वान पुरुष कोणत्याही समयी परिपूर्ण ब्रह्माचे ठायी अणुमात्र भेद पाहतो, त्याला त्याच वेळी भय उत्पन्न होते. कारण, प्रमादापासून झालेल्या भेददृष्टीने अवलोकन केले.

**श्रुतिस्मृतिन्यायशतैर्निषिद्धे दृश्येऽत्र यः स्वात्ममतिं करोति**
**उपैति दुःखोपरि दुःखजातं निषिद्धकर्ता स मलिम्लुचो यथा ||३३२||**

शेकडो श्रुति, शेकडो स्मृति आणि शेकडो न्याय यांच्या योगाने मिथ्या ठरवून टाकलेल्या दृश्य वस्तूवर जो पुरुष अहंबुद्धि करतो तो निंद्य कर्म करणाऱ्या मलिन पुरुषाप्रमाणे दुःखावर दुःखेच पावत असतो.

**सत्याभिसंधानरतो विमुक्तो महत्त्वमात्मीयमुपैति नित्यम्**
**मिथ्याभिसन्धानरतस्तु नश्येद् दृष्टं तदेतद्यदचौरचौरयोः ||३३३||**

ज्याप्रमाणे सावकार सत्यास अनुसरल्यामुळे मोकळा राहून निरंतर आपला मोठेपणा संपादित असतो, आणि चोरी करणारा मनुष्य खोटेपणास अनुसरल्यामुळे बंधनात पडून मरणसमान दुःख भोगतो, तद्वत पुरुष सत्य ब्रह्माचे अनुसंधान केल्याने मुक्त होऊन स्वतःच्या अविचल मोठेपणास पावतो, आणि देहादिक असत्य वस्तूंचे अनुसंधान केल्याने संसारात भ्रमत असतो.

**यतिरसदनुसन्धिं बन्धहेतुं विहाय स्वयमयमहमस्मीत्यात्मदृष्ट्यैव तिष्ठेत्**
**सुखयति ननु निष्ठा ब्रह्मणि स्वानुभूत्या हरति परमविद्याकार्यदुःखं प्रतीतम् ||३३४||**

मुमुक्षु पुरुषाने बंधास कारण जे मिथ्यावस्तूचे अनुसंधान ते सोडून देऊन 'मी स्वतः ब्रह्म आहे' अशी स्वस्वरुपावर दृष्टी ठेवूनच रहावे. ब्रह्मनिष्ठा स्वस्वरुपाच्या अनुभवाने सुख देते आणि जे अविद्येपासून झालेले दुःख त्याला अगदी लयास नेते.

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

**बाह्यानुसन्धिः परिवर्धयेत्फलं दुर्वासनामेव ततस्ततोऽधिकाम्**
**ज्ञात्वा विवेकैः परिहृत्य बाह्यं स्वात्मानुसन्धिं विदधीत नित्यम् ।।३३५।।**
विषयादिक बाह्य वस्तूंचे अनुसंधान दुष्टवासनारुप फलालाच उत्तरोत्तर अधिक वाढवीत असते. यासाठी विवेकाने समजून व बाह्य वस्तूंचा परिहार करुन नित्य स्वरुपानुसंधान करीत असावे.

**बाह्ये निरुद्धे मनसः प्रसन्नता मनःप्रसादे परमात्मदर्शनम्**
**तस्मिन्सुदृष्टे भवबन्धनाशो बहिर्निरोधः पदवी विमुक्तेः ।।३३६।।**
बाह्य विषयांचा निरोध केल्याने मन प्रसन्न होते. मन प्रसन्न झाल्याने परमात्म्याचे ज्ञान होते. परमात्म्याचे उत्तम ज्ञान झाले असता भवबंधाचा नाश होतो. तस्मात् बाह्य विषयांचा निरोध करणे हा मुक्तीचा मार्ग होय.

**कः पण्डितः सन्सदसद्विवेकी श्रुतिप्रमाणः परमार्थदर्शी**
**जानन्हि कुर्यादसतोऽवलम्बं स्वपातहेतोः शिशुवन्मुमुक्षुः ।।३३७।।**
कोणता मुक्त होऊ इच्छिणारा सुज्ञ पुरुष, स्वतः समजूतदार, सदसद्विवेकी, वेदाला प्रमाणभूत मानणारा आणि परमार्थ जाणणारा असा असून बालकाप्रमाणे आपल्या पतनास कारण अशा मिथ्या वस्तूचे अवलंबन करील?

**देहादिसंसक्तिमतो न मुक्तिः मुक्तस्य देहाद्यभिमत्यभावः**
**सुप्तस्य नो जागरणं न जाग्रतः स्वप्नस्तयोर्भिन्नगुणाश्रयत्वात् ।।३३८।।**
जशी झोपी गेलेल्या पुरुषाला (झोपेत असता) जागृति नाहीं आणि जागा असणाऱ्याला (जागेपणात) झोप नाहीं. त्याप्रमाणे देहादिकांवर आसक्ति ठेवणाराला मुक्ति होत नसते आणि मुक्त झालेल्याची देहादिकांवर आसक्ति नसते.

**अन्तर्बहिः स्वं स्थिरजङ्गमेषु ज्ञात्वाऽऽत्मनाधारतया विलोक्य**
**त्यक्ताखिलोपाधिरखण्डरुपः पूर्णात्मना यः स्थित एष मुक्तः ।।३३९।।**
आपणच आधारभूत असल्याने स्थावरजंगमात्मक वस्तूचे ठायी आत बाहेर स्वस्वरुपच आहे असे समजून व त्याप्रमाणे दृष्टि ठेवून जो सकल उपाधींचा त्याग करतो, आणि आपल्या पूर्ण स्वरुपाने अखंडरुप होऊन राहतो, तो मुक्त होय

**सर्वात्मना बन्धविमुक्तिहेतुः सर्वात्मभावान्न परोऽस्ति कश्चित्**
**दृश्याग्रहे सत्युपपद्यतेऽसौ सर्वात्मभावोऽस्य सदात्मनिष्ठया ।।३४०।।**
सर्वथा बंधनातून सुटण्याला उपाय, सर्वात्मकपणावाचून दुसरा नाहीं आणि हा सर्वात्मकपणा दृश्य वस्तूंचे ग्रहण बंद पडून, निरंतर स्वस्वरुपी निष्ठा ठेवल्याने ज्ञान्याला सर्वात्मकभाव प्राप्त होत असतो.

**दृश्यस्याग्रहणं कथं नु घटते देहात्मना तिष्ठतो**
**बाह्यार्थानुभवप्रसक्तमनसस्तत्तत्क्रियां कुर्वतः**
**संन्यस्ताखिल धर्मकर्म विषयैर्नित्यात्मनिष्ठापरैः**
**तत्त्वज्ञैः करणीयमात्मनि सदानन्देच्छुभिर्यत्नतः ।।३४१।।**
पुरुष जोपर्यंत देहरुपाने राहिला आहे, बाह्य विषयांचा अनुभव घेण्याकडे जोपर्यंत त्याचे मन गुंतले आहे, ती ती क्रिया जोपर्यंत तो (अभिमानाने) करीत आहे, तोपर्यंत दृश्य वस्तूंचे ग्रहण न होणे कसे घडेल? यासाठी निरंतर आनंदस्वरुप होऊ इच्छिणाऱ्यां

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

तत्त्वज्ञान्यांनी सकल धर्मकर्मांचा आणि विषयांचा त्याग करुन आणि नित्य आत्म्याचे ठायी निष्ठा ठेऊन दृश्य वस्तूंचे ग्रहण न होईल असे केले पाहिजे.

**सर्वात्मसिद्धये भिक्षोः कृतश्रवणकर्मणः**
**समाधिं विदधात्येषा शान्तो दान्त इति श्रुतिः ||३४२||**

ज्याने वेदान्तशास्त्राचे श्रवण केले अशा संन्याशाला सर्वात्मकपणाची सिद्धि होण्यासाठी 'शान्तो दान्तः' ही श्रुती समाधि करावी म्हणून सांगत आहे.

**आरुढशक्तेरहमो विनाशः कर्तुन्न शक्य सहसापि पण्डितैः**
**ये निर्विकल्पाख्यसमाधिनिश्चलाः तानन्तराऽनन्तभवा हि वासनाः ||३४३||**

जे लोक निर्विकल्पनामक समाधिमध्ये निश्चल झाले असतील त्यावाचून इतर पंडितांच्यानेही बलवत्तर अहंकाराचा नाश एकाएकी करवणार नाहीं. कारण, वासना अनंत जन्मांच्या चिकटलेल्या आहेत.

**अहंबुद्ध्यैव मोहिन्या योजयित्वाऽऽवृतेर्बलात्**
**विक्षेपशक्तिः पुरुषं विक्षेपयति तद्गुणैः ||३४४||**

विक्षेपशक्ति, आवरणशक्तीच्या बळाने मोहित करणाऱ्या अहंबुद्धीशी पुरुषाला जोडून तिच्या गुणांनी त्याला विक्षिप्त करते.

**विक्षेपशक्तिविजयो विषमो विधातुं निःशेषमावरणशक्तिनिवृत्त्यभावे**
**दृग्दृश्ययोः स्फुटपयोजलवद्विभागे नश्येत्तदावरणमात्मनि च स्वभावात्**
**निःसंशयेन भवति प्रतिबन्धशून्यो विक्षेपणं न हि तदा यदि चेन्मृषार्थे ||३४५||**

जोपर्यंत आवरण शक्ति निःषेश गेली नाहीं तोपर्यंत विक्षेपशक्तीला जिंकणे कठीण आहे. ज्ञान आणि ज्ञेय यांचे दूध आणि पाणी याप्रमाणे जेव्हां स्पष्ट पृथक्करण होईल, तेव्हां आत्म्यावरची आवरण शक्ति आपोआप नाहींशी होईल.

**सम्यग्विवेकः स्फुटबोधजन्यो विभज्य दृग्दृश्यपदार्थतत्त्वम्**
**छिनत्ति मायाकृतमोहबन्धं यस्माद्विमुक्तस्तु पुनर्न संसृतिः ||३४६||**

मिथ्या वस्तूचे ठायी विक्षेप न होईल तर कोणताही प्रतिबंध न येता निःसंशय बोध होतो. स्पष्ट बोधापासून झालेला उत्तम विवेक ज्ञान आणि ज्ञेय या दोन वस्तूंच्या तत्वाचे पृथक्करण करुन मायेने केलेल्या मोहरुप बंधनाला तोडून टाकतो. मोहबंधनातून जो सुटला त्याला पुन्हा संसार प्राप्त होत नाहीं.

**परावरैकत्वविवेकवन्हिः दहत्यविद्यागहनं ह्यशेषम्**
**किं स्यात्पुनः संसरणस्य बीजं अद्वैतभावं समुपेयुषोऽस्य ||३४७||**

'जीव आणि ब्रह्म हे एक आहेत' असे जे जीवब्रह्माचे ऐक्यज्ञान तोच अग्नि, चट साऱ्या अविद्यारुप अरण्याला जाळून टाकतो. अद्वैतभाव ज्याला प्राप्त झाला त्याला पुन्हा संसार प्राप्त होण्याचे कारण ते कोणते असणार?

**आवरणस्य निवृत्तिर्भवति हि सम्यक्पदार्थदर्शनतः**
**मिथ्याज्ञान विनाशस्तद्विक्षेपजनित दुःखनिवृत्तिः ||३४८||**

वस्तूच्या स्वरुपाचे यथार्थ ज्ञान झाले असता, आवरणाची निवृत्ति, मिथ्याज्ञानाचा नाश आणि विक्षेपापासून झालेल्या दुःखाची निवृत्ति या तीन गोष्टी होत असतात.

**एकत्रितयं दृष्टं सम्यग्रज्जुस्वरुपविज्ञानात्**

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**तस्माद्वस्तुसतत्त्वं ज्ञातव्यं बन्धमुक्तये विदुषा ||३४९||**

रज्जुच्या स्वरुपाचे यथार्थ ज्ञान झाल्याने आवरणाची निवृत्ति, मिथ्याज्ञानाचा नाश आणि विक्षेपापासून झालेल्या दुःखाची निवृत्ति या तीन गोष्टी झालेल्या आढळात येतात. तस्मात बंधनातून सुटका होण्यासाठी सुज्ञ पुरुषाने ब्रह्मरुप वस्तूचे यथार्थस्वरुप जाणले पाहिजे.

**अयोऽग्नियोगादिव सत्समन्वयान् मात्रादिरुपेण विजृम्भते धीः**
**तत्कार्यमेतद्द्वितयं यतो मृषा दृष्टं भ्रमस्वप्नमनोरथेषु ||३५०||**

अग्नीचा संबंध झाल्यामुळे लोखंड जसे दाहक आहे असे प्रतीतीस येते, तद्वत सद्रूप ब्रह्माचा योग असल्यामुळे बुद्धी प्रमातादिरुपाने प्रतितीस येते. त्या बुद्धीचे जे हे द्वैतरुप कार्य ते मिथ्या आहे. याचे मिथ्यात्व भ्रम, स्वप्न आणि मनोरथ यांचे ठायी सर्वांच्या अनुभवास येते.

**ततो विकाराः प्रकृतेरहंमुखा देहावसाना विषयाश्च सर्वे**
**क्षणेऽन्यथाभावितया ह्यमीषामसत्त्वमात्मा तु कदापि नान्यथा ||३५१||**

तस्मात अहंकारापासून ते देहापर्यंत असलेले सर्व मायेचे विकार (कार्ये) आणि सर्व विषय मिथ्या आहेत आणि आत्मा तसा नसल्यामुळे सत्य आहे.

**नित्याद्वयाखण्डचिदेकरुपो बुद्ध्यादिसाक्षी सदसद्विलक्षणः**
**अहंपदप्रत्ययलक्षितार्थः प्रत्यक् सदानन्दघनः परात्मा ||३५२||**

अहं (मी) पदाच्या प्रतीतीपासून लक्षित होणारा पदार्थ जो परमात्मा तो नित्य आहे, अद्वैत आहे, अखंड आहे, केवळ चैतन्यस्वरुप आहे, बुद्ध्यादिकांचा साक्षी आहे, कार्य आणि कारण याहून वेगळा आहे, प्रत्यक् आहे आणि सदा आनंदरुप आहे.

**इत्थं विपश्चित्सदसद्विभज्य निश्चित्य तत्त्वं निजबोधदृष्ट्या**
**ज्ञात्वा स्वमात्मानमखण्डबोधं तेभ्यो विमुक्तः स्वयमेव शाम्यति ||३५३||**

विद्वान पुरुष वर सांगितल्याप्रमाणे सदसद्वस्तूंचा विभाग करुन आपल्या ज्ञानदृष्टीने तत्त्वाचा निश्चय करुन अखंड बोधरुप आत्म्याला जाणून आणि मिथ्या पदार्थांपासून मुक्त होऊन आपोआपच शांत होतो.

**अज्ञान हृदयग्रन्थेर्निःशेष विलयस्तदा**
**समाधिनाऽविकल्पेन यदाऽद्वैतात्मदर्शनम् ||३५४||**

निर्विकल्प समाधिच्या योगाने जेव्हां अद्वैत आत्म्याचे ज्ञान होते, तेव्हां हृदयातील अज्ञानरुप ग्रंथीचा अगदी लय होतो.

**त्वमहमिदमितीयं कल्पना बुद्धिदोषात् प्रभवति परमात्मन्यद्वये निर्विशेषे**
**प्रविलसति समाधावस्य सर्वो विकल्पो विलयनमुपगच्छेद्वस्तुतत्त्वावधृत्या ||३५५||**

अद्वैत आणि निर्विशेष अशा परमात्म्याचे ठायी बुद्धीच्या दोषाने 'तू, मी आणि हे' अशा प्रकारची कल्पना उत्पन्न होते. जेव्हां समाधि उदयास येते, तेव्हां आत्मरुप वस्तूच्या सत्य स्वरुपाचा निश्चय झाल्यामुळे सर्व कल्पना लयास जाते.

**शान्तो दान्तः परमुपरतः क्षान्तियुक्तः समाधिं**
**कुर्वन्नित्यं कलयति यतिः स्वस्य सर्वात्मभावम्**
**तेनाविद्यातिमिरजनितान्साधु दग्धा विकल्पान्**

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**ब्रह्माकृत्या निवसति सुखं निष्क्रियो निर्विकल्पः ।।३५६।।**

शांत, जितेंद्रिय, अतिशय उपरत पावलेला, क्षमाशील, नित्य समाधि करणारा, असा संन्याशी आपल्या स्वरुपाच्या सर्वव्यापकपणाचा (ब्रह्मत्वाचा) अनुभव घेतो आणि या अनुभवाच्या योगाने अविद्यारुपी अंधकारापासून झालेल्या कल्पनांना अगदी जाळून टाकून व स्वतः क्रियारहित व कल्पनारहित होऊन ब्रह्मस्वरुपाने सुखानेच राहतो.

**समाहिता ये प्रविलाप्य बाह्यं श्रोत्रादि चेतः स्वमहं चिदात्मनि**
**त एव मुक्ता भवपाशबन्धैः नान्ये तु पारोक्ष्यकथाभिधायिनः ।।३५७।।**

आपली श्रोत्रादिक इंद्रिये, चित्त आणि अहंकार या बाह्य (मिथ्या) वस्तूंचा चिदात्म्याचे ठायी लय करुन जे स्वरुपैकनिष्ठ झाले, तेच संसारपाशाच्या बंधनातून मुक्त झाले असे समजावे. पण अनुभवावाचून कोरड्या गोष्टी सांगणारे जे इतर लोक आहेत ते मुक्त असे समजू नये.

**उपाधिभेदात्स्वयमेव भिद्यते चोपाध्यपोहे स्वयमेव केवलः**
**तस्मादुपाधेर्विलयाय विद्वान् वसेत्सदाऽकल्पसमाधिनिष्ठया ।।३५८।।**

उपाधि भिन्न भिन्न असल्यामुळे आत्मा आपोआपच भिन्नभिन्न रुपाचा भासू लागतो आणि उपाधि दूर झाली असता तो आपोआपच एकटा राहतो.

**तस्मात उपाधिचा लय होण्यासाठी सुज्ञ पुरुषाने**
**निर्विकल्प समाधिचे ठायी तत्परता राखून असावे.**

**सति सक्तो नरो याति सद्भावं ह्येकनिष्ठया**
**कीटको भ्रमरं ध्यायन् भ्रमरत्वाय कल्पते ।।३५९।।**

भ्रमराचे ध्यान करणारा किडा जसा स्वतः भ्रमरपणाला पावतो, तद्वत एकनिष्ठपणाने सद्रूप ब्रह्माचे ध्यान करु लागलेला पुरुष ब्रह्मभावास प्राप्त होतो.

**क्रियान्तरासक्तिमपास्य कीटको ध्यायन्नलित्वं ह्यलिभावमृच्छति**
**तथैव योगी परमात्मतत्त्वं ध्यात्वा समायाति तदेकनिष्ठया ।।३६०।।**

दुसरी क्रिया करण्याकडे गुंतण्याचे सोडून देऊन केवळ भ्रमराच्या रुपाचे ध्यान करणारा किडा जसा भ्रमरपणाला प्राप्त होतो, तद्वत् एकनिष्ठपणाने परमात्मतत्त्वाचे चिंतन करणारा योगी परमात्मरुपास पावतो.

**अतीव सूक्ष्मं परमात्मतत्त्वं न स्थूलदृष्ट्या प्रतिपत्तुमर्हति**
**समाधिनात्यन्तसुसूक्ष्मवृत्या ज्ञातव्यमार्यैरतिशुद्धबुद्धिभिः ।।३६१।।**

अतिशय सूक्ष्म असलेले परमात्म्याचे तत्त्व स्थूल दृष्टीने जाणता यायचे नाहीं. यासाठी अतिशय निर्मळ ज्यांची बुद्धि अशा सत्पुरुषांनी समाधि करुन अतिशय सूक्ष्म वृत्तीच्या योगाने ते तत्त्व जाणावे.

**यथा सुवर्णं पुटपाकशोधितं त्यक्त्वा मलं स्वात्मगुणं समृच्छति**
**तथा मनः सत्त्वरजस्तमोमलं ध्यानेन सन्त्यज्य समेति तत्त्वम् ।।३६२।।**

उत्तम रीतीने ताव देऊन शुद्ध केलेले सोने ज्याप्रमाणे मळ टाकून आपल्या अंगच्या गुणास प्राप्त होते, तद्वत आत्मचिंतनाने शुद्ध झालेले मन सत्त्व, रज आणि तम या त्रिगुणात्मक मळाचा त्याग करुन तत्त्वास प्राप्त होते.

**निरन्तराभ्यासवशात्तदित्थं पक्वं मनो ब्रह्मणि लीयते यदा**

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

**तदा समाधिः सविकल्पवर्जितः स्वतोऽद्वयानन्दरसानुभावकः ।।३६३।।**

ते मन वर सांगितल्याप्रमाणे निरंतर अभ्यास केल्याने पक्व होऊन जेव्हां ब्रह्माचे ठायी लय पावते, तेव्हां ते अद्वैत आनंदरसाचा अनुभव आणून देणाऱ्या निर्विकल्प समाधिस आपोआपच प्राप्त होते.

**समाधिनाऽनेन समस्तवासना ग्रन्थेर्विनाशोऽखिलकर्मनाशः**
**अन्तर्बहिः सर्वत एव सर्वदा स्वरुपविस्फूर्तिरयत्नतः स्यात् ।।३६४।।**

या समाधिच्या योगाने समस्त वासनारुप ग्रंथींचा नाश होतो, संपूर्ण कर्मांचा नाश होतो आणि यत्नावाचून आत, बाहेर, सर्व ठिकाणी आणि सर्व काली स्वरुपाचे स्फुरण होत असते.

**श्रुतेः शतगुणं विद्यान्मननं मननादपि**
**निदिध्यासं लक्षगुणमनन्तं निर्विकल्पकम् ।।३६५।।**

श्रवणापेक्षा मनन करण्यात शंभरपट लाभ आहे, मननापेक्षा निदिध्यास करण्यात लक्षपट लाभ आहे आणि निदिध्यासापेक्षा निर्विकल्प समाधि संपादण्यात अनंतपट लाभ आहे.

**निर्विकल्पकसमाधिना स्फुटं ब्रह्मतत्त्वमवगम्यते ध्रुवम्**
**नान्यथा चलतया मनोगतेः प्रत्ययान्तरविमिश्रितं भवेत् ।।३६६।।**

निर्विकल्प समाधिच्या योगाने ब्रह्मतत्त्वाचे अपरोक्ष ज्ञान खचित होते. पण मनाची वृत्ति चंचल असल्यामुळे दुसऱ्या कोणत्याहि प्रकारे ते होत नाही आणि होईलच तर ते दृश्य पदार्थांच्या ज्ञानाने मिश्र होईल.

**अतः समाधत्स्व यतेन्द्रियः सन् निरन्तरं शान्तमनाः प्रतीचि**
**विध्वंसय ध्वान्तमनाद्यविद्यया कृतं सदेकत्वविलोकनेन ।।३६७।।**

यासाठी तू शांत मनाचा आणि जितेंद्रिय होऊन प्रत्यगात्म्याचे ठायी निरंतर निर्विकल्प समाधि कर आणि आत्मस्वरुपाचे ऐक्य अवलोकन करुन अनादि अविद्येने उत्पन्न केलेल्या अज्ञानाचा नाश कर.

**योगस्य प्रथमद्वारं वाङ्निरोधोऽपरिग्रहः**
**निराशा च निरीहा च नित्यमेकान्तशीलता ।।३६८।।**

वाणीचा निरोध, परिग्रहाचा (परिवाराचा) त्याग, आशारहितपणा, क्रियारहितपणा आणि नित्य एकांत स्थली वास करण्याचा स्वभाव, हे सर्व उपाय म्हणजे योगाचे एक प्रथम द्वारच आहे.

**एकान्तस्थितिरिन्द्रियोपरमणे हेतुर्दमश्चेतसः**
**संरोधे करणं शमेन विलयं यायादहंवासना**
**तेनानन्दरसानुभूतिरचला ब्राह्मी सदा योगिनः**
**तस्माच्चित्तनिरोध एव सततं कार्यं प्रयत्नो मुनेः ।।३६९।।**

एकांती वास केल्याने इंद्रियांना उपरति होते, इंद्रियांना उपरति झाल्याने चित्ताचा संरोध (शम) होतो, चित्ताचा निरोध झाल्याने अहंकाराची वासना लयास जाते आणि अहंकाराची वासना लयास गेल्याने योग्याला निरंतर ब्रह्म संबंधी अविचल आनंदरसाचा अनुभव येतो. तस्मात योग्याने प्रयत्नाने चित्ताचा निरोधच निरंतर केला पाहिजे.

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

**वाचं नियच्छात्मनि तं नियच्छ बुद्धौ धियं यच्छ च बुद्धिसाक्षिणि**
**तं चापि पूर्णात्मनि निर्विकल्पे विलाप्य शान्तिं परमां भजस्व ||३७०||**

वाणीचा मनात, मनाचा बुद्धीत, बुद्धी चा बुद्धीच्या साक्षीत आणि साक्षीचा निर्विकल्प व परिपूर्ण अशा आत्मस्वरुपी लय करुन तू परम शांतिचा अनुभव घे.

**देहप्राणेन्द्रियमनोबुद्ध्यादिभिरुपाधिभिः**
**यैर्यैर्वृत्तेःसमायोगस्तत्तद्भावोऽस्य योगिनः ||३७१||**

देह, प्राण, इंद्रिये, मन, बुद्धि इत्यादिक उपाधिपैकी ज्या ज्या उपाधिचा या योग्याच्या वृत्तीचा समागम होतो, त्या त्या उपाधिशी योग्याची तन्मयता होते.

**तन्निवृत्त्या मुनेः सम्यक् सर्वोपरमणं सुखम्**
**संदृश्यते सदानन्दरसानुभवविप्लवः ||३७२||**

त्या उपाधींची निवृत्ति झाल्याने, योग्याला (सर्व उपाधींचा अतिशय उपरम हेच ज्याचे लक्षण असे) स्वरुपसुख प्राप्त होते. आणि तो निरंतर आनंदरसाचा अनुभव घेण्यात निमग्न होतो.

**अन्तस्त्यागो बहिस्त्यागो विरक्तस्यैव युज्यते**
**त्यजत्यन्तर्बहिःसङ्गं विरक्तस्तु मुमुक्षया ||३७३||**

विरक्त पुरुषाच्यानेच आतल्या आणि बाहेरच्या विषयांचा परित्याग करवेल. विरक्त पुरुष जो हा त्याग करतो, तो मुक्तिच्या इच्छेनेच होय.

**बहिस्तु विषयैः सङ्गं तथान्तरहमादिभिः**
**विरक्त एव शक्नोति त्यक्तुं ब्रह्मणि निष्ठितः ||३७४||**

ब्रह्माचे ठायी ज्याची निष्ठा, असा विरक्तपुरुषच बाहेरच्या विषयबंधनाला आणि आतल्या अहंकारादिकांच्या बंधनाला सोडू शकतो.

**वैराग्यबोधौ पुरुषस्य पक्षिवत् पक्षौ विजानीहि विचक्षण त्वम्**
**विमुक्तिसौधाग्रलताधिरोहणं ताभ्यां विना नान्यतरेण सिध्यति ||३७५||**

विचक्षणा ! पक्ष्याचे जसे पंख तसे वैराग्य आणि बोध हे पुरुषाचे पंख होत, असे जाण. कारण मुक्ति हीच उंच राजवाड्याच्या गच्चीवर असलेली लता होय; तिच्यावर चढणे या दोन पंखावाचून इतर उपायाने साधायाचे नाहीं.

**अत्यन्तवैराग्यवतः समाधिः समाहितस्यैव दृढप्रबोधः**
**प्रबुद्धतत्त्वस्य हि बन्धमुक्तिः मुक्तात्मनो नित्यसुखानुभूतिः ||३७६||**

जो अतिशय वैराग्यसंपन्न असेल त्यालाच समाधि प्राप्त होते, ज्याला समाधि प्राप्त झाली त्यालाच दृढ होतो, ज्याला दृढ बोध प्राप्त झाला त्याचीच भवबंधनातून सुटका होते आणि ज्याची भवबंधनातून सुटका झाली त्यालाच भवबंधनातून सुटका होते आणि भवबंधनातून सुटका झाली त्यालाच नित्य सुखाचा अनुभव मिळतो.

**वैराग्यान्न परं सुखस्य जनकं पश्यामि वश्यात्मनः**
**तच्चेच्छुद्धतरात्मबोधसहितं स्वाराज्यसाम्राज्यधुक्**
**एतद्द्वारमजस्रमुक्तियुवतेर्यस्मातत्त्वमस्मात्परं**
**सर्वत्रास्पृहया सदात्मनि सदा प्रज्ञां कुरु श्रेयसे ||३७७||**

V

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

स्वतःचे अंतःकरण ज्याने वश केले अशा पुरुषाला वैराग्याहून वेगळे कांहींही सुखदायक आढळत नाहीं, ते वैराग्य जर अत्यंत शुद्ध अशा आत्मज्ञानाने युक्त असेल तर आत्मनंदरुप साम्राज्य देते. मुक्तिरुप स्त्री मिळण्याचे नेहमीचे हेच द्वार आहे. असे ज्यापेक्षा आहे, त्या पेक्षा तू इतःपर परम कल्याणासाठी सर्व अनात्म वस्तूंविषयी निःस्पृह होऊन निरंतर सद्रूप आत्म्याचे ठायी निष्ठा राख.

**आशां छिन्द्धि विषोपमेषु विषयेष्वेषैव मृत्योः कृति**
**स्त्यक्त्वा जातिकुलाश्रमेष्वभिमतिं मुञ्चातिदूरात्क्रियाः**
**देहादावसति त्यजात्मधिषणां प्रज्ञां कुरुष्वात्मनि**
**त्वं द्रष्टास्यमनोऽसि निर्द्वयपरं ब्रह्मासि यद्वस्तुतः ।।३७८।।**

विषासारख्या विषयांची आशा तोडून टाक. कारण ही आशा म्हणजे एक मृत्यूची करणी आहे, जाति,कुल आणि आश्रम यावरचा अभिमान सोडून देऊन कर्मांना अतिशय दुरुनच सोडून दे. देहादिक अनात्म वस्तूंवरची आत्मबुद्धि सोडून दे आणि आत्म्याचे ठायी निष्ठा राख. कारण, तू द्रष्टा (साक्षी ) आहेस, मनरहित आहेस आणि वास्तविक जे द्वैतरहित परब्रह्म तेच तू आहेस.

**लक्ष्ये ब्रह्मणि मानसं दृढतरं संस्थाप्य बाह्येन्द्रियं**
**स्वस्थाने विनिवेश्य निश्चलतनुश्चोपेक्ष्य देहस्थितिम्**
**ब्रह्मात्मैक्यमुपेत्य तन्मयतया चाखण्डवृत्त्याऽनिशं**
**ब्रह्मानन्दरसं पिबात्मनि मुदा शून्यैः किमन्यैर्भृशम् ।।३७९।।**

स्थिर ज्याचे शरीर असा तू मनाला ब्रह्मरुप लक्ष्याचे ठायी अतिशय स्थिर ठेव. बाह्य इंद्रियांना आपापल्या गोलकाचे ठायी ठेव. देहाच्या चरितार्थाकडे दुर्लक्ष कर, आणि स्वतःचे ब्रह्माशी ऐक्य पाव. नंतर तन्मय होत्साता, अखंडवृत्तीने प्रेमपूर्वक आपल्या ठिकाणी, निरंतर ब्रह्मानंदरसाचा आस्वाद घे. अतिशय शून्य अशा इतर वस्तूंच्या योगाने तुला काय लाभ होणार आहे?

**अनात्मचिन्तनं त्यक्त्वा कश्मलं दुःखकारणम्**
**चिन्तयात्मानमानन्दरुपं यन्मुक्तिकारणम् ।।३८०।।**

मोहक आणि दुःखास कारण अशा अनात्मवस्तूच्या चिंतनाला सोडून देऊन जे मुक्तिचे कारण अशा आनंदरुप आत्म्याचे तू चिंतन कर.

**एष स्वयंज्योतिरशेषसाक्षी विज्ञानकोशो विलसत्यजस्त्रम्**
**लक्ष्यं विधायैनमसद्विलक्षणमखण्डवृत्त्याऽऽत्मतयाऽनुभावय ।।३८१।।**

स्वंयप्रकाश आणि सर्वांचा साक्षी असा आत्मा विज्ञान कोशाचे ठायी (बुद्धीचे ठायी ) निरंतर प्रकाशित होत आहे. यासाठी असत पदार्थाहून भिन्न अर्थात सद्रूप अशा या आत्म्याला लक्षात आणून अखंड वृत्तीने 'हे माझे स्वरुप आहे' अशी भावना कर.

**एतमच्छीन्नया वृत्त्या प्रत्ययान्तरशून्यया**
**उल्लेखयन्विजानीयात्स्वस्वरुपतया स्फुटम् ।।३८२।।**

अनात्म वस्तूची ज्यात प्रतीति नाहीं अशा अविछिन्न वृत्तीने चिंतन करणारा पुरुष या आत्म्याला 'हे माझे स्वरुप आहे' असे स्पष्टपणे जाणतो.

**अत्रात्मत्वं दृढीकुर्वन्नहमादिषु संत्यजन्**

**pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files**
**Get yours now!**
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**उदासीनतया तेषु तिष्ठेत्स्फुटघटादिवत् ।।३८३।।**

पूर्वोक्त स्वरुपी आत्मबुद्धीला दृढ करणारा आणि अहंकारादिकांवरच्या आत्मबुद्धीचा त्याग करणारा अशा मुमुक्षुने उघडपणे प्रतीतीस येणाऱ्या घटादिक पदार्थांवर (आत्मबुद्धि नसून) जसा उदासीनपणा असतो, तद्वत भासमान अहंकारादिकांचे ठायी (आत्मबुद्धि न करता) उदासीनपणाने रहावे.

**विशुद्धमन्तःकरणं स्वरुपे निवेश्य साक्षिण्यवबोधमात्रे**
**शनैः शनैर्निश्चलतामुपानयन् पूर्णं स्वमेवानुविलोकयेत्ततः ।।३८४।।**

शुद्ध झालेल्या अंतःकरणाला स्वरुपभूत आणि ज्ञानमात्र अशा साक्षीचे ठायी लीन करुन हळू हळू त्याला निश्चल करणारा पुरुष शेवटी परिपूर्ण असा स्वस्वरुपालाच अवलोकन करतो.

**देहेन्द्रियप्राणमनोऽहमादिभिः स्वाज्ञानक्लृप्तैरखिलैरुपाधिभिः**
**विमुक्तमात्मानमखण्डरुपं पूर्णं महाकाशमिवावलोकयेत् ।।३८५।।**

देह, इंद्रिये, प्राण, मन, अहंकार इत्यादि ज्या सर्व उपाधि आपल्या अज्ञानाने कल्पिलेल्या आहेत, त्यापासून मुक्त अशा आत्म्याला महाकाशाप्रमाणे अखंडरुप परिपूर्ण समजावे.

**घटकलशकुसूलसूचिमुख्यैः गगनमुपाधिशतैर्विमुक्तमेकम्**
**भवति न विविधं तथैव शुद्धं परमहमादिविमुक्तमेकमेव ।।३८६।।**

घट, कलश, कणिंग (धान्याचा कोठा), सुई इत्यादिक शेकडो उपाधि सोडली असता आकाश जसे एकच राहते, पण अनेक प्रकारचे राहत नाहीं. तद्वत् अहंकारादिक उपाधि सोडली असता परम शुद्ध ब्रह्म एकच राहते;

**ब्रह्मादिस्तम्बपर्तन्ता मृषामात्रा उपाधयः**
**ततः पूर्णं स्वमात्मानं पश्येदेकात्मना स्थितम् ।।३८७।।**

ब्रह्मदेवापासून ते स्तंबापर्यंत असलेली सर्व उपाधि निवळ असत्य आहेत. यासाठी आपला आत्मा परिपूर्ण आणि एकरुपाने राहिलेला आहे असे जाणावे.

**यत्र भ्रान्त्या कल्पितं तद्विवेके तत्तन्मात्रं नैव तस्माद्विभिन्नम्**
**भ्रान्तेर्नाशे भाति दृष्टाहितत्त्वं रज्जुस्तद्वद्विश्वमात्मस्वरुपम् ।।३८८।।**

जी वस्तु ज्या वस्तूवर भ्रांतीने कल्पिलेली असते ती (भ्रांतीने कल्पिलेली) वस्तु विचारांती तद्रूपच (ज्या वस्तूवर भ्रांति घडते त्या रुपाचीच) असते. त्याहून (जेथे भ्रांति घडली त्या वस्तूहून ) भिन्न नसते. भ्रांती नाहिशी झाली असता (रज्जूवर भ्रांतीने) पाहिलेल्या सर्पाचे सत्यस्वरुप जी रज्जू ती स्पष्ट दिसू लागते. तद्वत ब्रह्माचे ठायी भ्रांतिने पाहिलेले जगत भ्रांति नाहींशी झाली असता ब्रह्मरुपच आहे.

**स्वयं ब्रह्मा स्वयं विष्णुः स्वयमिन्द्रः स्वयं शिवः**
**स्वयं विश्वमिदं सर्वं स्वस्मादन्यन्न किञ्चन ।।३८९।।**

ब्रह्मा, विष्णु, इंद्र, शिव आणि हे सर्व जगत स्वतः आत्माच आहे. आत्म्याहून वेगळे कांहीं नाहीं.

**अन्तः स्वयं चापि बहिः स्वयं च स्वयं पुरस्तात् स्वयमेव पश्चात्**
**स्वयं ह्यावाच्यां स्वयमप्युदीच्यां तथोपरिष्टात्स्वयमप्यधस्तात् ।।३९०।।**

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

आत, बाहेर, पूर्वेस, पश्चिमेस, दक्षिणेस, उत्तरेस, वर आणि खाली स्वतः आत्माच आहे.

**तरङ्गफेनभ्रमबुद्बुदादि सर्वं स्वरुपेण जलं यथा तथा**
**चिदेव देहाद्यहमन्तमेतत् सर्वं चिदेवैकरसं विशुद्धम् ||३९१||**

लाटा, फेस, भोवरे, बुडबुडे हे सर्व वास्तविकपणे जसे उदकच आहे, तद्वत देहापासून ते अहंकारापर्यंत हे सर्व एकरस आणि परमशुद्ध असे चैतन्यच आहे.

**सदेवेदं सर्वं जगदवगतं वाङ्मनसयोः**
**सतोऽन्यन्नास्त्येव प्रकृतिपरसीम्नि स्थितवतः**
**पृथक् किं मृत्स्नायाः कलशघटकुम्भाद्यवगतं**
**वदत्येष भ्रान्तस्त्वमहमिति मायामदिरया ||३९२||**

वाणी आणि मन यांना कळणारे हे सर्व जगत् सद्रूपच आहे. प्रकृतीच्या पलीकडे असणाऱ्या सद्रूप ब्रह्माहून हे भिन्न नाहींच. घट, कलश, कुंभ इत्यादिक जे (मातीचे) पदार्थ पाहण्यात येतात, ते काय मृत्तिकेहून भिन्न असतात ? (जो पुरुष जगाला ब्रह्माहून वेगळे म्हणत असेल ) तो पुरुष 'तू आणि मी' अशा प्रकारच्या मायारुप मदिरेने धुंद झालेला आहे असे समजावे.

**क्रियासमभिहारेण यत्र नान्यदिति श्रुतिः**
**ब्रवीति द्वैतराहित्यं मिथ्याध्यासनिवृत्तये ||३९३||**

खोटा अध्यास दूर करण्यासाठी 'यत्र नान्यत' ही श्रुति वारंवार ब्रह्माचे ठायी अद्वैतत्त्व सांगत आहे.

**आकाशवन्निर्मलनिर्विकल्पं निःसीमनिःस्पन्दननिर्विकारम्**
**अन्तर्बहिःशून्यमनन्यमद्वयं स्वयं परं ब्रह्म किमस्ति बोध्यम् ||३९४||**

आकाशासारखे निर्मल, विकल्परहित, निःसीम, निश्चल, निर्विकार, ज्याच्या आत बाहेर दुसरी वस्तु नाहीं, आणि अद्वितीय अशा एका स्वरुपभूत परब्रह्माहून वेगळे दुसरे काय जाणायचे आहे?

**वक्तव्यं किमु विद्यतेऽत्र बहुधा ब्रह्मैव जीवः स्वयं**
**ब्रह्मैतज्जगदाततं नु सकलं ब्रह्माद्वितीयं श्रुतिः**
**ब्रह्मैवाहमिति प्रबुद्धमतयः संत्यक्तबाह्याः स्फुटं**
**ब्रह्मीभूय वसन्ति सन्ततचिदानन्दात्मनैतद्ध्रुवम् ||३९५||**

याविषयी अधिक काय सांगावे? जीव स्वतः ब्रह्म आहे,
आणि हे सगळे विस्तीर्ण जगतही ब्रह्मच आहे. कारण, 'ब्रह्म अद्वितीय आहे'
असे श्रुति म्हणते. मीच ब्रह्म आहे' असे निश्चित समजलेले आणि
पदार्थांचा त्याग करणारे पुरुष स्पष्टपणे ब्रह्मरुप होऊन
निरंतर सच्चिदानन्द रुपाने राहतात, हे खचित.

**जहि मलमयकोशेऽहंधियोत्थापिताशां प्रसभमनिलकल्पे लिङ्गदेहेऽपि पश्चात्**
**निगमगदितकीर्तिं नित्यमानन्दमूर्तिं स्वयमिति परिचीय ब्रह्मरुपेण तिष्ठ ||३९६||**

या घामट स्थूल देहावर अहंबुद्धीने उत्पन्न केलेल्या आशेला नाहींशी कर, आणि नंतर वायूसारख्या लिंगदेहावर अहंबुद्धीने उत्पन्न केलेल्या आशेलाही बलात्काराने नाहीशी कर. असे केल्यावर, वेदांनी ज्याची कीर्ति गायिली आहे, आणि जे नित्य व आनंदरुप

V
pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

आहे, अशा प्रकारचे परब्रह्म मीच स्वतः आहे असे पक्के समजून तू ब्रह्मरुपाने रहा.

**शवाकारं यावद्भजति मनुजस्तावदशुचिः**
**परेभ्यः स्यात्क्लेशो जननमरणव्याधिनिलयः**
**यदात्मानं शुद्धं कलयति शिवाकारमचलम्**
**तदा तेभ्यो मुक्तो भवति हि तदाह श्रुतिरपि ।।३९७।।**

मनुष्य जो पर्यंत या शवासारख्या स्थूल शरीरावर अहंबुद्धि ठेवीत आहे तोपर्यंत तो अपवित्र असतो, तोपर्यंत त्याला दुसऱ्या पासून उपद्रव होतो आणि तोपर्यंत तो जन्म, जरा आणि मरण यांचे वसतिस्थान असतो. तोच मनुष्य जेव्हां शुद्ध, अविचल आणि कल्याणरुप आत्म्याला जाणतो, त्यावेळी तो वर सांगितलेल्या उपद्रवादिकांपासून मुक्त होतो. असे श्रुतिही सांगत आहे.

**स्वात्मन्यारोपिताशेषाभासवस्तुनिरासतः स्वयमेव परं ब्रह्म पूर्णमद्वयमक्रियम् ।।३९८।।**

स्वस्वरुपी कल्पिलेल्या संपूर्ण आभासिक वस्तूंचा निरास केला असता पुरुष पूर्ण अद्वय आणि अक्रिय अशा प्रकारचे परब्रह्म स्वतः होतो.

**समाहितायां सति चित्तवृत्तौ परात्मनि ब्रह्माणि निर्विकल्पे**
**न दृश्यते कश्चिदयं विकल्पः प्रजल्पमात्रः परिशिष्यते यतः ।।३९९।।**

निर्विकल्प आणि परमात्मारुप ब्रह्माचे ठायी चित्तवृत्ति समाधान पावली असता हा कोणताही संसाररुप विकल्प भासत नाहीं. तर केवळ तोंडच्या गोष्टी मात्र राहतात.

**असत्कल्पो विकल्पोऽयं विश्वमित्येकवस्तुनि**
**निर्विकारे निराकारे निर्विशेषे भिदा कुतः ।।४००।।**

हा जगद्रूप विकल्प मिथ्या आहे; कारण निर्विकार, निराकार आणि निर्विषेश अशा एक ब्रह्मरुप वस्तूचे ठायी भेद कोठून येणार?

**द्रष्टुदर्शनदृश्यादिभावशून्यैकवस्तुनि निर्विकारे निराकारे निर्विशेषे भिदा कुतः ।।४०१।।**

निर्विकार, निराकार व निर्विशेष, आणि द्रष्टा दर्शन, दृश्य इत्यादिक धर्मानी रहित अशा एक वस्तूचे ठायी भेद कोठून येणार?

**कल्पार्णव इवात्यन्तपरिपूर्णैकवस्तुनि**
**निर्विकारे निराकारे निर्विशेषे भिदा कुतः ।।४०२।।**

निर्विकार, निराकार, निर्विशेष आणि प्रलयकालच्या समुद्राप्रमाणे अतिशय परिपूर्ण अशा एक वस्तूचे ठायी भेद कोठून येणार?

**तेजसीव तमो यत्र प्रलीनं भ्रान्तिकारणम्**
**अद्वितीये परे तत्त्वे निर्विशेषे भिदा कुतः ।।४०३।।**

प्रकाशात जसा अंधकाराचा लय होतो, तद्वत ज्या वस्तुत भ्रांतीच्या कारणाचा लय होतो, अशा अद्वितीय आणि निर्विशेष परमतत्त्वाचे ठायी भेद कोठून येणार?

**एकात्मके परे तत्त्वे भेदवार्ता कथं वसेत्**
**सुषुप्तौ सुखमात्रायां भेदः केनावलोकितः ।।४०४।।**

एकरुप परमतत्त्वाचे ठायी भेदाची गोष्ट कशी राहणार? केवळ सुखरुप अशा सुषुप्ति अवस्थेमध्ये भेद कोणी पाहिला आहे?

**न ह्यस्ति विश्वं परतत्त्वबोधात् सदात्मनि ब्रह्माणि निर्विकल्पे**

V
pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

**कालत्रये नाप्यहिरीक्षितो गुणे न ह्यम्बुबिन्दुर्मृगतृष्णिकायाम् ||४०५||**

यथार्थ स्वरुपाचा बोध झाल्यावर निर्विकल्प आणि सद्रूप ब्रह्माचे ठायी जगत नाहींच. यथार्थ स्वरुपाचा बोध झाला असता रज्जूवर सर्प किंवा मृगजलावर नदीच्या पाण्याचा थेंब देखील कालत्रयी दिसत नाहीं.

**मायामात्रमिदं द्वैतमद्वैतं परमार्थतः**
**इति ब्रूते श्रुतिः साक्षात्सुषुप्तावनुभूयते ||४०६||**

'हे द्वैत म्हणजे केवळ माया आहे. आणि सत्य पाहू अद्वैत आहे' असे श्रुति म्हणते, आणि या गोष्टीचा सुषुप्तीमध्ये प्रत्यक्ष अनुभवही येतो.

**अनन्यत्वमधिष्ठानादारोप्यस्य निरीक्षितम्**
**पण्डितै रज्जुसर्पादौ विकल्पो भ्रान्तिजीवनः ||४०७||**

'कल्पित पदार्थ अधिष्ठानाहून वेगळा नसतो' हा प्रकार पंडितांनी रज्जुसर्पादिक दृष्टांताचे ठायी पाहिला आहे. तस्मात भेद जो दिसतो, त्याचे कारण भ्रांतिच होय.

**चित्तमूलो विकल्पोऽयं चित्ताभावे न कश्चन**
**अतश्चित्तं समाधेहि प्रत्यग्रूपे परात्मनि ||४०८||**

या संसाररुप विकल्पाचे मूळ चित्त आहे. चित्त नसेल तर कांहीं विकल्प नाहीं. यासाठी प्रत्यग्रूप परमात्म्याचे ठायी चित्ताचा लय कर.

**किमपि सततबोधं केवलानन्दरुपं निरुपममतिवेलं नित्यमुक्तं निरीहम्**
**निरवधिगगनाभं निष्कलं निर्विकल्पं हृदि कलयति विद्वान् ब्रह्म पूर्णं समाधौ ||४०९||**

नित्य ज्ञानरुप, केवळ आनंदरुप, उपमारहित, नित्यमुक्त, क्रियारहित, सीमारहित, आकाशासारखे ( व्यापक), अवयवरहित, विकल्परहित अशा कोणत्या तरी पूर्ण ब्रह्माचा विद्वान पुरुष, समाधिमध्ये आपल्या हृदयाचे ठायी दृढ अनुभव घेत असतो.

**प्रकृतिविकृतिशून्यं भावनातीतभावं समरसमसमानं मानसम्बन्धदूरम्**
**निगमवचनसिद्धं नित्यमस्मत्प्रसिद्धं हृदि कलयति विद्वान् ब्रह्म पूर्णं समाधौ ||४१०||**

प्रकृति आणि विकृति यांनी रहित, मनाला चिंतन करता येणार नाहीं अशा स्वरुपाचे, एकरसरुप, अभिमानाच्या संबंधापासून दूर असलेले वेदवचनावरुन सिद्ध, नित्य, 'मी' या शब्दाने प्रसिद्ध आणि ज्याची तुलना करण्यासारखी वस्तु नाहीं, अशा पूर्ण ब्रह्माचा विद्वान, समाधिमध्ये आपल्या हृदयाचे ठायी अनुभव घेत असतो.

**अजरममरमस्ताभाववस्तुस्वरुपं स्तिमितसलिलराशिप्रख्यमाख्याविहीनम्**
**शमितगुणविकारं शाश्वतं शान्तमेकं हृदि कलयति विद्वान् ब्रह्म पूर्णं समाधौ ||४११||**

जरारहित, मरणरहित, नित्यवस्तुरुप, शांतसमुद्रासारखे (निश्चल), नामरहित, नित्य, शांत आणि जेथे गुणांचे विकार शांत झाले आहेत अशा एका पूर्ण ब्रह्माचा, विद्वान, समाधिमध्ये आपल्या हृदयाचे ठायी अनुभव घेत असतो.

**समाहितान्तःकरणः स्वरुपे विलोकयात्मानमखण्डवैभवम्**
**विच्छिन्ध्दि बन्धं भवगन्धगन्धितं यत्नेन पुंस्त्वं सफलीकुरुष्व ||४१२||**

तू आपल्या स्वरुपी एकाग्र चित्त करुन अखंड ज्याचे वैभव अशा आत्म्याचे अवलोकन कर, संसाराच्या गंधाने दुर्गंधी झालेल्या बंधाला प्रयत्नाने सोडून दे, आणि आपल्या पुरुषजन्माला सफल कर.

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**सर्वोपाधिविनिर्मुक्तं सच्चिदानन्दमद्वयम्**
**भावयात्मानमात्मस्थं न भूयः कल्पसेऽध्वने ||४१३||**

सर्व उपाधींनी वर्जित, सच्चिदानंदरुप, अद्वितीय अशा अंतःकरणात असलेल्या आत्म्याचे चिंतन कर म्हणजे पुन्हा संसाराच्या फेऱ्यात पडणार नाहींस.

**छायेव पुंसः परिदृश्यमान्माभासरुपेण फलानुभूत्या**
**शरीरमाराच्छववन्निरस्तं पुनर्न संधत्त इदं महात्मा ||४१४||**

आभासरुपाने फलाचा उपभोग घेते म्हणून पुरुषाच्या छायेसारखे दिसणारे आणि विवेकाने शवासारखे दूर टाकलेले अशा शरीराकडे सत्पुरुष पुन्हा लक्ष देत नाहीं.

**सततविमलबोधानन्दरुपं समेत्य त्यज जडमलरुपोपाधिमेतं सुदूरे**
**अथ पुनरपि नैष स्मर्यतां वान्तवस्तु स्मरणविषयभूतं कल्पते कुत्सनाय ||४१५||**

निरंतर शुद्ध ज्ञानरुप आणि आनंदरुप अशा परमात्म्याला प्राप्त होऊन या जड आणि मलरुप उपाधिला (देहाला ) अतिशय दूर सोडून दे. पुढे फिरुन या उपाधिचे स्मरण देखील करु नको. कारण ओकून टाकलेला पदार्थ स्मरणात आला तरी तो किळस उत्पन्न होण्यास कारण होतो.

**समूलमेतत्परिदाह्य वह्नौ सदात्मनि ब्रह्मणि निर्विकल्पे**
**ततः स्वयं नित्यविशुद्ध बोधानन्दात्मना तिष्ठति विद्वरिष्ठः ||४१६||**

सत्तामात्र आणि निर्विकल्प अशा ब्रह्मरुप अग्नीचे ठायी या समूळ उपाधिचे दहन करुन नंतर उत्कृष्ठ विद्वान पुरुष, स्वतः नित्य शुद्धज्ञानरुप आणि आनंदरुप आत्मस्वरुपाने राहतो.

**प्रारब्धसूत्रग्रथितं शरीरं प्रयातु वा तिष्ठतु गोरिव स्रक्**
**न तत्पुनः पश्यति तत्त्ववेत्ताऽऽनन्दात्मनि ब्रह्मणि लीनवृत्तिः ||४१७||**

प्रारब्धरुप सूत्रात गुंतलेले शरीर जावो, की राहो पण आनंदरुप ब्रह्माचे ठायी ज्याची वृत्ति लीन झाली असा तत्त्वज्ञानी पुन्हा शरीराकडे, गाईच्या रक्ताकडे जसे कोणी पहात नाहीं, त्याप्रमाणे पहात नाहीं.

**अखण्डानन्दमात्मानं विज्ञाय स्वस्वरुपतः**
**किमिच्छन् कस्य वा हेतोर्देहं पुष्णाति तत्त्ववित् ||४१८||**

अखंड आणि आनंदरुप आत्म्याला स्वतःचे स्वरुप जाणल्यानंतर, तत्त्वज्ञानी कशाच्या इच्छेने आणि कोणत्या प्रयोजनासाठी देहाचे पोषण करील?

**संसिद्धस्य फलं त्वेतज्जीवन्मुक्तस्य योगिनः**
**बहिरन्तः सदानन्दरसास्वादनमात्मनि ||४१९||**

उत्तम रीतीने सिद्ध झालेल्या जीवन्मुक्त योग्याला आपल्या ठिकाणी आत आणि बाहेर निरंतर स्वरुपानंदरसाचा आस्वाद मिळणे हे उत्तम फळ होय.

**वैराग्यस्य फलं बोधो बोधस्योपरतिः  फलम्**
**स्वानन्दानुभवाच्छान्तिरेषैवोपरतेः फलम् ||४२०||**

वैराग्याचे फल बोध, बोधाचे फल उपरति आणि स्वरुपानंदाच्या अनुभवाने शांति प्राप्त होणे हे उपरतीचे फल होय.

**यद्युत्तरोत्तराभावः पूर्वपूर्वन्तु निष्फलम्**

V
pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**निवृत्तिः परमा तृप्तिरानन्दोऽनुपमः स्वतः ।।४२१।।**
**दृष्टदुःखेष्वनुद्वेगो विद्यायाः प्रस्तुतं फलम्**
**यत्कृतं भ्रान्तिवेलायां नाना कर्म जुगुप्सितम्**
**पश्चान्नरो विवेकेन तत्कथं कर्तुमर्हति ।।४२२।।**

जर शांति प्राप्त न होईल तर उपरति व्यर्थ होय, उपरति प्राप्त न होईल तर बोध व्यर्थ होय. निवृत्ति, परम तृप्ति, ज्याला उपमा देता येणार नाहीं असा स्वरुपभूत आनंद आणि अनुभवास येणाऱ्या सांसरीक दुःखांपासून उद्विग्न वृत्ति न होणे हे ब्रह्मविद्येचे फल होय. भ्रांतीच्या समयी मनुष्याने जे नानाप्रकारचे निंद्य कर्म केले असेल ते कृत्य, विचाराने भ्रांति दूर झाल्यावर तो कसे करील? नाहींच करणार.

**विद्याफलं स्यादसतो निवृत्तिः प्रवृत्तिरज्ञानफलं तदीक्षितम्**
**तज्ज्ञाज्ञयोर्यन्मृगतृष्णिकादौ नोचेद्विदां दृष्यफलं किमस्मात् ।।४२३।।**

जाणता मनुष्य मृगजलासारख्या मिथ्या वस्तूकडे फलोद्देशाने धावत जात नाहीं. आणि अज्ञ मनुष्य तिकडे फलोद्देशाने धावत जातो. या दृष्टांतावरुन हे निश्चित झाले की, मिथ्या वस्तूकडे प्रवृत्ति न होणे हे ब्रह्मविद्येचे फल होय आणि तिकडे प्रवृत्ति होणे हे अज्ञानाचे फल होय. असे नसेल तर, ब्रह्मज्ञान्याला ब्रह्मज्ञानापासून कोणते दृष्ट फल मिळते असे म्हणावे?

**अज्ञानहृदयग्रन्थेर्विनाशो यद्यशेषतः**
**अनिच्छोर्विषयः किं नु प्रवृत्तेः कारणं स्वतः ।।४२४।।**

हृदयातील अज्ञानरुप ग्रंथीचा जर अगदी नाश होईल, तर इच्छा न करणाऱ्या पुरुषाची, स्वतः संसारीक विषय आपल्याकडे प्रवृत्ति करुन घेईल काय?

वासनानुदयो भोग्ये वैरागस्य तदावधिः
**अहंभावोदयाभावो बोधस्य परमावधिः**
**लीनवृत्तैरनुत्पत्तिर्मर्यादोपरतेस्तु सा ।।४२५।।**

भोग्य विषयावर वासनेचा उदय न होणे हा वैराग्याचा परम अवधि होय. अहंपणाचा उदय न होणे हा बोधाचा परम अवधि होय, आणि लीन झालेली वृत्ति पुन्हा उदयास न येणे हा उपरतीचा परम अवधि होय.

**ब्रह्माकारतया सदा स्थिततया निर्मुक्तबाह्यार्थधी-**
**रन्यावेदितभोग्यभोगकलनो निद्रालुवद्बालवत्**
**स्वप्नालोकितलोकवज्जगदिदं पश्चन्क्वचिल्लब्धधी-**
**रास्ते कश्चिदनन्तपुण्यफलभुग्धन्यः स मान्यो भुवि ।।४२६।।**

निरंतर ब्रह्मरुपाने राहिल्यामुळे ज्याची बाह्य विषयांवरची बुद्धि झोपी गेलेल्या मनुष्याप्रमाणे लयास गेली आहे; दुसऱ्यांनी दिलेल्या भोग्य पदार्थांचा उपभोग जो अज्ञान पोराप्रमाणे घेतो, आणि स्वप्नात पाहिलेल्या लोकांप्रमाणे या जगाला एखाद्या वेळी पाहतो, असा आपल्या अनंत पुण्याचे फल भोगणारा स्थितप्रज्ञ योगी पृथ्वीतलावर धन्य आणि मान्य होय.

**स्थितप्रज्ञो यतिरयं यः सदानन्दमश्नुते**
**ब्रह्मण्येव विलीनात्मा निर्विकारो विनिष्क्रियः ।।४२७।।**

**pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files**
**Get yours now!**
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

जो यति, निर्विकार, क्रियारहित आणि ब्रह्माचे ठायीच ज्याचे चित्त लीन असा असून ब्रह्मानंदाचा आस्वाद घेत असतो, तो स्थितप्रज्ञ समजावा.

ब्रह्मात्मनोः शोधितयोरेकभावावगाहिनी
**निर्विकल्पा च चिन्मात्रा वृत्तिः प्रज्ञेति कथ्यते**
**सुस्थिताऽसौ भवेद्यस्य स्थितप्रज्ञः स उच्यते ।।४२८।।**

शोधीत म्हणजे उपाधिरहीत केलेले जे ईश्वर आणि जीव त्यांचे (ब्रह्मरुपाने) ऐक्य समजणारी, विकल्परहीत आणि ब्रह्माकार जी वृत्ती तिला प्रज्ञा म्हणतात. ही प्रज्ञा ज्याची उत्तम प्रकारे स्थिर झाली, त्याला स्थितप्रज्ञ म्हणतात.

**यस्य स्थिता भवेत्प्रज्ञा यस्यानन्दो निरन्तरः**
**प्रपञ्चो विस्मृतप्रायः स जीवन्मुक्त इष्यते ।।४२९।।**

ज्याची प्रज्ञा स्थिर झाली असेल त्याला निरंतर आनंद मिळत असतो, आणि जो प्रपंचाला बहुतेक विसरला त्याला जीवन्मुक्त म्हणतात.

**लीनधीरपि जागर्ति जाग्रद्धर्मविवर्जितः**
**बोधो निर्वासनो यस्य स जीवन्मुक्त इष्यते ।।४३०।।**

बुद्धि लीन झाली असताही जो जागतो, जागृत असताही ज्याच्या अंगी जागृति अवस्थेचे धर्म नसतात, आणि ज्याचा बोध वासनारहित असतो, त्याला जीवन्मुक्त म्हणतात.

**शान्तसंसारकलनः कलावानपि निष्कलः**
**यस्य चित्तं विनिश्चिन्तं स जीवन्मुक्त इष्यते ।।४३१।।**

ज्याचे संसाराकडचे अनुसंधान लयास गेले असेल, जो कलावान असताही कलाहीनासारखा असेल आणि ज्याचे चित्त चिंतारहित असेल, त्याला जीवन्मुक्त म्हणतात.

**वर्तमानेऽपि देहेऽस्मिञ्छायावदनुवर्तिनि**
**अहन्ताममताऽभावो जीवन्मुक्तस्य लक्षणम् ।।४३२।।**

छायेप्रमाणे मागे लागलेल्या या विद्यमान देहावरही अहंता व ममता नसणे हे जीवन्मुक्ताचे लक्षण होय.

**अतीताननुसन्धानं भविष्यदविचारणम्**
**औदासीन्यमपि प्राप्तं जीवनमुक्तस्य लक्षणम् ।।४३३।।**

झालेल्या गोष्टीकडे लक्ष्य न देणे, होणाऱ्या गोष्टीचा विचार न करणे आणि चालू गोष्टी विषयी उदासीनपना असणे हे जीवन्मुक्ताचे लक्षण होय.

**गुणदोषविशिष्टेऽस्मिन्स्वभावेन विलक्षणे**
**सर्वत्र समदर्शित्वं जीवनमुक्तस्य लक्षणम् ।।४३४।।**

गुणदोषांनी भरलेला म्हणून स्वभावतः विलक्षण अशा या प्रपंचात सर्वत्र समान दृष्टि असणे हे जीवन्मुक्ताचे लक्षण होय.

**इष्टानिष्टार्थसम्प्राप्तौ समदर्शितयाऽऽत्मनि**
**उभयत्राविकारित्वं जीवन्मुक्तस्य लक्षणम् ।।४३५।।**

आवडत्या किंवा नावडत्या वस्तु प्राप्त झाल्या असता समदृष्टि असल्यामुळे दोन्ही ठिकाणी निर्विकार चित्त ठेवणे हे जीवन्मुक्ताचे लक्षण होय.

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**ब्रह्मानन्दरसास्वादासक्तचित्ततया यतेः**
**अन्तर्बहिरविज्ञानं जीवन्मुक्तस्य लक्षणम् ।।४३६।।**

ब्रह्मानंदरसाचा आस्वाद घेण्याकडे चित्त गुंतल्यामुळे आतल्या किंवा बाहेरल्या गोष्टीकडे अनुसंधान नसणे हे जीवन्मुक्त संन्याश्याचे लक्षण होय.

**देहेन्द्रियादौ कर्तव्ये ममाहंभाववर्जितः**
**औदासीन्येन यस्तिष्ठेत्स जीवन्मुक्तलक्षणः ।।४३७।।**

देह, इंद्रिये इत्यादिकांवर अथवा दुसऱ्या कोणत्याही कर्तव्य गोष्टीवर अहंता व ममता न ठेवता जो सर्वदा तिऱ्हाइतपणाने राहत असेल तो जीवन्मुक्त होय.

**विज्ञात आत्मनो यस्य ब्रह्मभावः श्रुतेर्बलात्**
**भवबन्धविनिर्मुक्तः स जीवन्मुक्तलक्षणः ।।४३८।।**

वेदवचनाच्या सामर्थ्याने ज्याला आपला ब्रह्मपणा चांगला कळला, आणि जो भवबंधनातून सुटला, तो जीवन्मुक्त होय.

**देहेन्द्रियेष्वहंभाव इदंभावस्तदन्यके**
**यस्य नो भवतः क्वापि स जीवन्मुक्त इष्यते ।।४३९।।**

देह आणि इंद्रिये यांच्यावर अहंता आणि याहून इतर ठिकाणी इदंता (हे सत्य आहे अशी बुद्धि) या दोन्ही कधीही ज्याच्या अंगी नसतात, तो जीवन्मुक्त होय.

**न प्रत्यग्ब्रह्मणोर्भेदं कदापि ब्रह्मसर्गयोः**
**प्रज्ञया यो विजानिति स जीवन्मुक्तलक्षणः ।।४४०।।**

जो पुरुष स्वतःच्या बुद्धीने जीव आणि ब्रह्म यामध्ये अथवा ब्रह्म आणि जगत यामध्ये कधीही भेद मानीत नाहीं, तो जीवन्मुक्त होय.

**साधुभिः पूज्यमानेऽस्मिन्पीड्यमानेऽपि दुर्जनैः**
**समभावो भवेद्यस्य स जीवन्मुक्तलक्षणः ।।४४१।।**

सज्जनांनी पूजा केली असता किंवा दुर्जनांनी पीडा दिली असता ज्याचा दोहोंवर समभाव राहील, तो जीवन्मुक्त होय.

**यत्र प्रविष्टा विषयाः परेरिता नदीप्रवाहा इव वारिराशौ**
**लिनन्ति सन्मात्रतया न विक्रियां उत्पादयन्त्येष यतिर्विमुक्तः ।।४४२।।**

समुद्रात नद्यांचे प्रवाह जसे तदाकार होऊन लीन होतात, तद्वत दुसऱ्यांनी पुढे आणलेले विषय ज्याच्या ठिकाणी प्रविष्ट झाले असता ब्रह्मरुप होऊन लय पावतात; पण कोणत्याही विकाराला उत्पन्न करीत नाहींत, तो जीवन्मुक्त होय.

**विज्ञातब्रह्मतत्त्वस्य यथापूर्वं न संसृतिः**
**अस्ति चेन्न स विज्ञातब्रह्मभावो बहिर्मुखः ।।४४३।।**

ज्याने ब्रह्मतत्त्व जाणले, त्याला पूर्ववत संसार राहायाचा नाहीं, आणि जर पूर्ववत राहील तर त्याला ब्रह्मतत्त्व कळले नाहीं, व तो बहिर्मुख आहे असे समजावे.

**प्राचीनवासनावेगादसौ संसरतीति चेत्**
**न सदेकत्वविज्ञानान्मन्दि भवति वासना ।।४४४।।**

'पूर्ववासनेच्या वेगाने जीवन्मुक्त देखील जन्ममरणरुप संसाराला पावेल' अशी शंका ठेवू नये. कारण, जीव आणि ब्रह्म यांचे ऐक्य अनुभवास आले म्हणजे वासना मंद पडते.

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**अत्यन्तकामुकस्यापि वृत्तिः कुण्ठति मातरि**
**तथैव ब्रह्मणि ज्ञाते पूर्णानन्दे मनीषिणः ||४४५||**
**निदिध्यासनशीलस्य बाह्यप्रत्यय ईक्ष्यते**
**ब्रवीति श्रुतिरेतस्य प्रारब्धं फलदर्शनात् ||४४६||**

पुरुष अतिशय विषयी का असेना; पण त्याची कामवासनात्मक वृत्ति जशी आपल्या मातेचे ठायी कुंठित होते, तद्वत पूर्ण आनंदरुप ब्रह्म जाणून निदिध्यास करणाऱ्या मननशील संन्याश्याची वृत्तिही विषयांचे ठायी कुंठित होते. जीवन्मुक्ताला जी कांहीं बाह्य प्रतीति होते, ते जीवन्मुक्ताचे प्रारब्ध समजावे. कारण, बाह्यप्रतीति हे प्रारब्धाचे फल दृष्टीस पडते, असे श्रुति म्हणते.

**सुखाद्यनुभवो यावत्तावत्प्रारब्धमिष्यते**
**फलोदयः क्रियापूर्वो निष्क्रियो न हि कुत्रचित् ||४४७||**

जोपर्यंत सुखादिकांचा अनुभव येतो, तोपर्यंत प्रारब्ध आहे असे मानावे लागते. कारण, फलाचा उदय कर्मापासूनच व्हावयाचा. कर्मावाचून कधीही होत नाहीं.

**अहं ब्रह्मेति विज्ञानात्कल्पकोटिशतार्जितम्**
**सञ्चितं विलयं याति प्रबोधात्स्वप्नकर्मवत् ||४४८||**

जागृति अवस्था प्राप्त झाली असता जसा स्वप्नातील जसा कर्माचा लय होतो, तद्वत 'मी ब्रह्म आहे' अशा प्रकारचे अपरोक्ष ज्ञान प्राप्त झाले असता शेकडो कोटिकल्पामध्ये उपार्जित केलेले संचित कर्म लयास जाते.

**यत्कृतं स्वप्नवेलायां पुण्यं वा पापमुल्बणम्**
**सुप्तोत्थितस्य किन्तत्स्यात्स्वर्गाय नरकाय वा ||४४९||**

स्वप्नाच्या वेळी जे कांहीं उत्कट पुण्य किंवा पाप केले असेल, ते जागृत पुरुषाला स्वर्ग किंवा नरक देऊ शकेल काय? नाहींच शकणार.

**स्वमसङ्गमुदासीनं परिज्ञाय नभो यथा**
**न श्लिष्यति च यक्किञ्चित्कदाचिद्भाविकर्मभिः ||४५०||**

आपल्या स्वरुपाला आकाशाप्रमाणे असंग आणि उदासीन जाणल्यावर पुरुष भावी कर्मांच्या योगाने कधीही किंचित देखील लिप्त होत नाहीं.

**न नभो घटयोगेन सुरागन्धेन लिप्यते**
**तथात्मोपाधियोगेन तद्धर्मैर्नैव लिप्यते ||४५१||**

आकाशाला घटाचा संबंध असताही जसा घटातील मद्याचा दुर्गंध चिकटत नाहीं, तद्वत आत्म्याला उपाधिचा संबंध असताही उपाधिचे धर्म चिकटत नाहींत.

**ज्ञानोदयात्पुरारब्धं कर्मज्ञानान्न नश्यति**
**अदत्वा स्वफलं लक्ष्यमुद्दिश्योत्सृष्टबाणवत् ||४५२||**

एखाद्या लक्षाला उद्देशून सोडलेला बाण ज्याप्रमाणे आपले फल (लक्ष्यला वेधणे) दिल्यावाचून पडत नाहीं, तद्वत ज्ञानाचा उदय होण्याच्या पूर्वीचे प्रारब्ध कर्म आपले फल दिल्यावाचून केवळ ज्ञानाने नष्ट होत नाहीं.

**व्याघ्रबुद्ध्या विनिर्मुक्तो बाणः पश्चात्तु गोमतौ**
**न तिष्ठति छिनत्त्येव लक्ष्यं वेगेन निर्भरम् ||४५३||**

V
pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

गाईला वाघ समजून सोडलेला बाण, मागाहून ही गाय आहे असे (सोडणाराला) समजले तरी थांबत नाहीं. तर वेगाने लक्ष्याला कापूनच टाकतो.

**प्रारब्धं बलवत्तरं खलु विदां भोगेन तस्य क्षयः**
**सम्यग्ज्ञानहुताशनेन विलयः प्राक्संचितागामिनाम्**
**ब्रह्मात्मैक्यमवेक्ष्य तन्मयतया ये सर्वदा संस्थिताः**
**तेषां तत्त्रितयं नहि क्वचिदपि ब्रह्मैव ते निर्गुणम् ।।४५४।।**

तद्वत ज्ञान्यांचे देखील प्रारब्ध बलवत्तर असते. त्याचा भोगण्यानेच क्षय होतो आणि पूर्वसंचित कर्माचा व भावी कर्मांचा अपरोक्ष ज्ञानरुप अग्नीनेच नाश होतो. जे पुरुष ब्रह्म आणि जीव यांचे ऐक्य जाणून सर्वदा ब्रह्ममयच होऊन राहिले असतील, त्यांना प्रारब्ध, संचित व भावी ही तिन्ही कर्मे कधीही नाहींत. कारण, ते निर्गुणब्रह्मच होत.

**उपाधितादात्म्यविहीनकेवल ब्रह्मात्मनैवात्मनि तिष्ठतो मुनेः**
**प्रारब्धसद्‌भावकथा न युक्ता स्वप्नार्थसंबन्धकथेव जाग्रतः ।।४५५।।**

उपाधिच्या अध्यासाने रहित अशा केवळ ब्रह्मरुपानेच स्वस्वरुपी राहणाऱ्या मुनीला प्रारब्ध असते हे म्हणणे युक्त नाहीं. कारण जागृत पुरुषाला स्वप्नातील गोष्टींचा संबंध जसा संभवत नाहीं, तद्वत हे संभवत नाहीं.

**न हि प्रबुद्धः प्रतिभासदेहे देहोपयोगिन्यपि च प्रपञ्चे**
**करोत्यहन्तां ममतानिदन्तां किन्तु स्वयं तिष्ठति जागरेण ।।४५६।।**

जागा झालेला मनुष्य स्वप्नांतील देहावर किंवा देहाच्या उपयोगी पडलेल्या वस्तूवर अहंता, ममता किंवा इदंता ठेवीत नाहीं तर स्वतः जागृतपणानेच व्यवहार करतो.

**न तस्य मिथ्यार्थसमर्थनेच्छा न संग्रहस्तज्जगतोऽपि दृष्टः**
**तत्रानुवृत्तिर्यदि चेन्मृषार्थे न निद्रया मुक्त इतीष्यते ध्रुवम् ।।४५७।।**

जागृत झालेल्या मनुष्याला स्वप्नातील मिथ्यापदार्थ सिद्ध करण्याची इच्छा दिसत नाहीं, व स्वप्नातील जगाचा त्याने संग्रह केलेलाही दिसत नाहीं.
जर जागृतीमध्येही स्वप्नसंबंधी मिथ्या पदार्थांची अनुवृत्ति असेल तर त्या मनुष्याला झोपेने सोडले नाहीं असे खचित समजावे.

**तद्वत्परे ब्रह्मणि वर्तमानः सदात्मना तिष्ठति नान्यदीक्षते**
**स्मृतिर्यथा स्वप्नविलोकितार्थे तथा विदः प्राशनमोचनादौ ।।४५८।।**

वर सांगितलेल्या जागृत मनुष्याप्रमाणे परब्रह्माचे ठायी राहिलेला पुरुष सद्रूपानेच राहतो पण ब्रह्मावाचून दुसरे कांहींही पाहत नाहीं. जसे जागृत मनुष्याला स्वप्नात पाहिलेल्या पदार्थांचे स्मरण रहाते, तद्वत सद्रूपाने राहणाऱ्यालाही भोजन आणि मलोत्सर्ग इत्यादिक कार्याविषयीचे स्मरण राहते.

**कर्मणा निर्मितो देहः प्रारब्धं तस्य कल्प्यताम्**
**नानादेरात्मनो युक्तं नैवात्मा कर्मनिर्मितः ।।४५९।।**

देह कर्माने निर्माण केला आहे म्हणून प्रारब्ध देहाचे आहे अशी खुशाल कल्पना करावी; पण अनादि असल्यामुळे जी कर्माने निर्माण केलेला नव्हे, अशा आत्म्याला प्रारब्ध असल्याची कल्पना करणे युक्त नाहीं.

**अजो नित्यः शाश्वत इति ब्रूते श्रुतिरमोघवाक्**

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**तदात्मना तिष्ठतोऽस्य कुतः प्रारब्धकल्पना ||४६०||**

वायफळ न बोलणारी श्रुति 'आत्मा जन्मरहित, नित्य आणि शाश्वत आहे' असे म्हणत आहे. त्या आत्मरुपाने राहणाऱ्या जीवन्मुक्ताला प्रारब्ध अशी कल्पना तरी कशी संभवेल?

**प्रारब्धं सिध्यति तदा यदा देहात्मना स्थितिः**
**देहात्मभावो नैवेष्टः प्रारब्धं त्यज्यतामतः ||४६१||**

देहरुपाने स्थित असेल तर प्रारब्ध सिद्ध होईल. पण मुनीची देहरुपाने स्थिति असेल असे मुळीच संमत नाहीं. यासाठी प्रारब्धाला सोडून द्यावे.

**शरीरस्यापि प्रारब्धकल्पना भ्रान्तिरेव हि**
**अध्यस्तस्य कुतः सत्त्वमसत्यस्य कुतो जनिः**
**अजातस्य कुतो नाशः प्रारब्धमसतः कुतः ||४६२||**
**ज्ञानेनाज्ञानकार्यस्य समूलस्य लयो यदि**
**तिष्ठत्ययं कथं देह इति शङ्कावतो जडान् ||४६३||**
**समाधातुं बाह्यदृष्ट्या प्रारब्धं वदति श्रुतिः**
**न तु देहादिसत्यत्वबोधनाय विपश्चिताम् ||४६४||**

शरीराला प्रारब्ध आहे अशी कल्पना करणे ही देखील भ्रांतीच आहे. कारण, अध्यस्त (कल्पित) पदार्थांच्या अंगी खरेपणा कोठून असणार? जो पदार्थ खरा नाहीं तो जन्मास कोठून येणार जो जन्मास आला नाहीं त्याला मरण कोठून येणार? आणि ज्याला जन्ममरण नाहीं अशा केवळ कल्पित पदार्थाला प्रारब्ध आहे असे कसे संभवणार! तस्मात ज्ञानाने अज्ञानाच्या समूळ कार्याचा लय झाला असता हा देह कसा राहतो अशी शंका घेणाऱ्या मूढ लोकांचे समाधान करण्यासाठी प्रारब्ध असते असे श्रुति बाह्य दृष्टीने सांगत आहे.
पण विद्वानांना 'देहादिक सत्य आहेत' असा बोध करण्यासाठी सांगत नाहीं.

**परिपूर्णमनाद्यन्तमप्रमेयमविक्रियम्**
**एकमेवाद्वयं ब्रह्म नेह नानास्ति किञ्चन ||४६५||**

परिपूर्ण, अनादि, अनंत, प्रमाणाने जाणण्याला कठीण आणि विकाररहित अशा प्रकारचे ब्रह्म एकच आणि अद्वितीय आहे. येथे (ब्रह्माचे ठायी) वेगळे वेगळे कांहींच नाहीं.

**सद्घनं चिद्घनं नित्यमानन्दघनमक्रियम्**
**एकमेवाद्वयं ब्रह्म नेह नानास्ति किञ्चन ||४६६||**

सच्चिदानंदरुप, नित्य आणि क्रियारहित, अशा प्रकारचे ब्रह्म एकच आणि अद्वितीय आहे. येथे वेगळे वेगळे कांहींच नाहीं.

**प्रत्यगेकरसं पूर्णमनन्तं सर्वतोमुखम्**
**एकमेवाद्वयं ब्रह्म नेह नानास्ति किञ्चन ||४६७||**

प्रत्यग्रूप, एकरस, अनंत आणि व्यापक अशा प्रकारचे ब्रह्म एकच अद्वितीय आहे. येथे वेगळे वेगळे कांहींच नाहीं.

**अहेयमनुपादेयमनादेयमनाश्रयम्**
**एकमेवाद्वयं ब्रह्म नेह नानास्ति किञ्चन ||४६८||**

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

जे त्याज्य नाहीं, ग्राह्य नाहीं, इंद्रियास विषय होत नाहीं,
आणि ज्याला आश्रयाची अपेक्षा नाहीं, अशा प्रकारचे ब्रह्म एकच
आणि अद्वितीय आहे. येथे वेगळे वेगळे कांहींच नाहीं.

**निर्गुणं निष्कलं सूक्ष्मं निर्विकल्पं निरञ्जनम्**
**एकमेवाद्वयं ब्रह्म नेह नानास्ति किञ्चन ।।४६९।।**

निर्गुण, अवयवरहित, सूक्ष्म, निर्विकल्प आणि निरंजन अशा प्रकारचे
ब्रह्म एकच आणि अद्वितीय आहे. येथे वेगळे वेगळे कांहींच नाहीं.

**अनिरुप्य स्वरुपं यन्मनोवाचामगोचरम्**
**एकमेवाद्वयं ब्रह्म नेह नानास्ति किञ्चन ।।४७०।।**

मन अथवा वाणी यांना अगोचर असल्यामुळे ज्याच्या स्वरुपाचे निरुपण होऊ शकत
नाहीं, अशा प्रकारचे ब्रह्म एकच आणि अद्वितीय आहे येथे वेगळे वेगळे कांहींच नाहीं.

**सत्समृद्धं स्वतःसिद्धं शुद्धं बुद्धमनीदृशम्**
**एकमेवाद्वयं ब्रह्म नेह नानास्ति किञ्चन ।।४७१।।**

सत्य, परिपूर्ण, स्वतःसिद्ध, शुद्ध, ज्ञानरुप आणि ज्याची कोणाशी तुलना करता येत
नाहीं, अशा प्रकारचे ब्रह्म एकच आणि अद्वितीय आहे येथे वेगळे वेगळे कांहींच नाहीं.

**निरस्तरागा विनिरस्तभोगाः शान्ताः सुदान्ता यतयो महान्तः**
**विज्ञाय तत्त्वं परमेतदन्ते प्राप्ताः परां निर्वृतिमात्मयोगात् ।।४७२।।**

राग आणि भोग यांचा त्याग करणारे, शांत आणि जितेंद्रिय अशा प्रकारचे मोठमोठे
संन्यासी परम तत्वाला जाणून अज्ञानाचा नाश झाला असता
स्वस्वरुपाच्या चिंतनाने परम सुखाप्रत प्राप्त झाले.

**भवानपीदं परतत्त्वमात्मनः स्वरुपमानन्दघनं विचार्य**
**विधूय मोहं स्वमनः प्रकल्पितं मुक्तः कृतार्थो भवतु प्रबुद्धः ।।४७३।।**

तूही या परमतत्त्वरुप आणि आनंदघन स्वस्वरुपाचे चिंतन करुन आणि
आपल्या मनाने कल्पिलेल्या दूर करुन मुक्त, कृतार्थ आणि प्रबुद्ध हो.

**समाधिना साधुविनिश्चलात्मना पश्यात्मतत्त्वं स्फुटबोधचक्षुषा**
**निःसंशयं सम्यगवेक्षितश्चे- च्छ्रुतः पदार्थो न पुनर्विकल्प्यते ।।४७४।।**

समाधिपासून उत्कृष्ट स्थिर झालेल्या बुद्धीने, स्पष्ट बोधरुप नेत्राच्या योगाने,
तू आत्मतत्वाचे अवलोकन कर. ऐकलेला पदार्थ जर चांगला निःसंशयपणे
अवलोकनात आला तर त्या विषयी पुन्हा विकल्प उत्पन्न होत नाहीं.

**स्वस्याविद्याबन्धसम्बन्धमोक्षा- त्सत्यज्ञानानन्दरुपात्मलब्धौ**
**शास्त्रं युक्तिर्देशिकोक्तिः प्रमाणं चान्तःसिद्धा स्वानुभूतिः प्रमाणम् ।।४७५।।**

आपली अविद्यारुप बंधनाच्या संबंधातून सुटका झाली असता सत्य, ज्ञानरुप
आणि आनंदरुप अशा आत्म्याची प्राप्ति होते. याविषयी शास्त्र, युक्ति, गुरुवाक्य
आणि आत सिद्ध असलेला स्वतःचा अनुभव ही प्रमाणे आहेत.

**बन्धो मोक्षश्च तृप्तिश्च चिन्ताऽऽरोग्यक्षुधादयः**
**स्वेनैव वेद्या यज्ज्ञानं परेषामानुमानिकम् ।।४७६।।**

बंध, मोक्ष, तृप्ति, चिंता, आरोग्य, क्षुधा इत्यादिक वस्तु स्वतःच आपल्या आपण

**pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files**
**Get yours now!**
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

जाणल्या पाहिजेत. दुसऱ्यांना जे त्यांचे ज्ञान होते ते केवळ अनुमानानेच कळावयाचे.

**तटस्थिता बोधयन्ति गुरवः श्रुतयो यथा प्रज्ञयैव तरेद्विद्वानीश्वरानुगृहीतया ||४७७||**

श्रुतीप्रमाणे गुरुही तिऱ्हाइत राहून बोध करीत असतात, तस्मात्, ईश्वराचा अनुग्रह जिच्यावर आहे अशा बुद्धीच्या योगानेच विद्वानाला तरले पाहिजे.

**स्वानुभूत्या स्वयं ज्ञात्वा स्वमात्मानमखण्डितम्**
**संसिद्धः सम्मुखं तिष्ठेन्निर्विकल्पात्मनाऽऽत्मनि ||४७८||**

स्वतःच्या अनुभवाने स्वतःच आपल्या अखंडित स्वरुपाला जाणून चांगला सिद्ध झालेला पुरुष निर्विकल्प रुपाने आपल्या ठिकाणीच राहो.

**वेदान्तसिद्धान्तनिरुक्तिरेषा ब्रह्मैव जीवः सकलं जगच्च**
**अखण्डरुपस्थितिरेव मोक्षो ब्रह्माद्वितीये श्रुतयः प्रमाणम् ||४७९||**

जीव आणि सकल जगत ब्रह्मरुपच आहे आणि अखंड रुपाने राहणे हाच मोक्ष होय. हेच काय ते वेदान्ताला सिद्धांताचे व्याख्यान आहे. ब्रह्म अद्वितीय आहे अशाविषयी श्रुति प्रमाण आहे.

**इति गुरुवचनाच्छ्रुतिप्रमाणात् परमवगम्य सतत्त्वमात्मयुक्त्या**
**प्रशमितकरणः समाहितात्मा क्वचिदचलाकृतिरात्मनिष्ठतोऽभूत् ||४८०||**

अशा प्रकारचे गुरुचे वचन श्रुतिरुप प्रमाण आणि स्वतःची युक्ति यांच्या योगाने परमतत्त्वाला जाणून ज्याची इंद्रिये शांत झाली, आणि मन एकाग्र झाले, असा शिष्य एका ठिकाणी निश्चल राहून समाधिनिष्ठ झाला.

**किञ्चित्कालं समाधाय परे ब्रह्मणि मानसम्**
**उत्थाय परमानन्दादिदं वचनमब्रवीत् ||४८१||**

कांहीं काळ लोटेपर्यंत परब्रह्माचे ठायी एकाग्र चित्त ठेवून नंतर त्या परमानंदरुप समाधितून उठून तो शिष्य पुढील वचन म्हणाला.

**बुद्धिर्विनष्टा गलिता प्रवृत्तिः ब्रह्मात्मनोरेकतयाऽधिगत्या**
**इदं न जानेऽप्यनिदं न जाने किं वा कियद्वा सुखमस्त्यपारम् ||४८२||**

जीव आणि ब्रह्म यांच्या ऐक्याचा अनुभव आल्यामुळे बुद्धि लयास गेली, प्रवृत्ति नाहींशी झाली, मी दृश्य पदार्थ जाणत नाहीं, अदृश्य पदार्थही जाणत नाहीं, व ज्याचा अंत नाहीं अशा प्रकारचे ते सुख कसले व किती हेही जाणत नाहीं.

**वाचा वक्तुमशक्यमेव मनसा मन्तुं न वा शक्यते**
**स्वानन्दामृतपूरपूरितपरब्रह्माम्बुधेर्वैभवम्**
**अम्भोराशिविशीर्णवार्षिकशिलाभावं भजन्मे मनो**
**यस्यांशांशलवे विलीनमधुनाऽऽनन्दात्मना निर्वृतम् ||४८३||**

स्वरुपानंदरुप अमृताच्या पूराने भरलेल्या परब्रह्मरुप समुद्राचा महिमा वाणीने बोलण्यास किंवा मनाने मनन करण्यास शक्य नाहीं. माझे मन समुद्रात पडलेल्या पावसातील गारांप्रमाणे ह्या महिम्याच्या अतिसूक्ष्म अशामध्ये लीन होऊन आनंदरुपाने सुखात राहिले आहे.

**क्व गतं केन वा नीतं कुत्र लीनमिदं जगत्**
**अधुनैव मया दृष्टं नास्ति किं महदद्भुतम् ||४८४||**

V
**pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files**
**Get yours now!**
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

हे जगत् कोठे गेले, कोणी नेले, अथवा कोठे लीन झाले ?
मी आताच या जगाला पाहिले होते, हे मोठे नवल नाहीं काय?

**किं हेयं किमुपादेयं किमन्यत्किं विलक्षणम्**
**अखण्डानन्दपीयूषपूर्णे ब्रह्ममहार्णवे ||४८५||**

अखंड आनंदरुप अमृताने भरलेल्या ब्रह्मरुप महासागरात काय घ्यावे? काय टाकावे?
कोणती वस्तु भिन्न आणि कोणते विलक्षण? (तेथे असा कांहींच प्रकार नाहीं )

**न किञ्चिदत्र पश्यामि न शृणोमि न वेद्म्यहम्**
**स्वात्मनैव सदानन्दरुपेणास्मि विलक्षणः ||४८६||**

या स्थितीत मी कांहीं पाहत नाहीं, ऐकत नाहीं, व जाणतही नाहीं, तर
सदानंदरुप स्वतःचे स्वरुप असल्यामुळे मी सर्वांहून वेगळा आहे.

**नमो नमस्ते गुरवे महात्मने विमुक्तसङ्गाय सदुत्तमाय**
**नित्याद्वयानन्दरसस्वरुपिणे भूम्ने सदाऽपारदयाम्बुधाम्ने ||४८७||**

मोठ्या मनाचे, संगरहित, सत्पुरुषात अग्रगण्य, नित्य आणि अद्वितीय अशा प्रकारचा
आनंदरस हेच ज्याचे स्वरुप, व्यापक आणि अपार दयेचे समुद्रच, अशा प्रकारचे जे
आपण सद्गुरु, त्यांना निरंतर नमस्कार असो.

**यत्कटाक्षशशिसान्द्रचन्द्रिका- पातधूतभवतापजश्रमः**
**प्राप्तवानहमखण्डवैभवा- नन्दमात्मपदमक्षयं क्षणात् ||४८८||**

ज्या सद्गुरुच्या कटाक्षरुपी चंद्राचे दाट किरण पडल्यामुळे मी संसारतापापासून
झालेल्या दगदगीतून मुक्त झालो, आणि अखंड ज्याचे वैभव अशा आनंदरुप अक्षय
आत्मपदाला क्षणमात्रात प्राप्त झालो. त्या आपणाला नमस्कार असो.

**धन्योऽहं कृतकृत्योऽहं विमुक्तोऽहं भवग्रहात्**
**नित्यानन्दस्वरुपोऽहं पूर्णोऽहं त्वदनुग्रहात् ||४८९||**

मी आपल्या अनुग्रहाने धन्य झालो, कृतकृत्य झालो, संसाराच्या तडाक्यातून सुटलो,
नित्य आनंदरुप झालो आणि परिपूर्ण झालो.

**असङ्गोऽहमनङ्गोऽहमलिङ्गोऽहमभङ्गुरः**
**प्रशान्तोऽहमनन्तोऽहममलोऽहं चिरन्तनः ||४९०||**

मी असंग आहे, अवयवरहित आहे, लिंगशरीररहित आहे, अविनाशी आहे,
शांत आहे, अनंत आहे, निर्मल आहे आणि सनातन आहे.

**अकर्ताहमभोक्ताहमविकारोऽहमक्रियः**
**शुद्धबोधस्वरुपोऽहं केवलोऽहं सदाशिवः ||४९१||**

मी अकर्ता आहे, अभोक्ता आहे, निर्विकार आहे, क्रियारहित आहे, शुद्धबोध रुप आहे,
केवळ आहे आणि निरंतर मंगलरुप आहे.

**द्रष्टुः श्रोतुर्वक्तुः कर्तुर्भोक्तुर्विभिन्न एवाहम्**
**नित्यनिरन्तरनिष्क्रियनिःसीमासङ्गपूर्णबोधात्मा ||४९२||**

पाहणारा, ऐकणारा, बोलणारा करणारा आणि भोगणारा याहून
मी अगदी वेगळा आहे, आणि नित्य, निरंतर, क्रियारहित सीमारहित
संगरहित आणि पूर्ण बोधरुप आहे.

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**नाहमिदं नाहमदोऽप्युभयोरवभासकं परं शुद्धम्**
**बाह्याभ्यन्तरशून्यं पूर्णं ब्रह्माद्वितीयमेवाहम् ।।४९३।।**
मी द्रष्टा नाहीं, आणि दृश्यही नाहीं, तर या दोघांना प्रकाशित करणारा, पर, शुद्ध अंतर्बाह्यप्रदेशरहित, पूर्ण आणि अद्वितीय ब्रह्मरुप आहे.

**निरुपममनादितत्त्वं त्वमहमिदमद इति कल्पनादूरम्**
**नित्यानन्दैकरसं सत्यं ब्रह्माद्वितीयमेवाहम् ।।४९४।।**
उपमारहित, अनादि, तत्त्वरुप, 'तू, मी हे आणि ते' या कल्पनेच्या पलीकडचे, नित्य, आनंदैकरस, सत्य अशा प्रकारचे जे अद्वितीय ब्रह्म तेच मी आहे.

**नारायणोऽहं नरकान्तकोऽहं पुरान्तकोऽहं पुरुषोऽहमीशः**
**अखण्डबोधोऽहमशेषसाक्षी निरीश्वरोहं निरहं च निर्ममः ।।४९५।।**
नरकासुराचे मर्दन करणारा नारायण मी आहे. त्रिपुरासुराचे मर्दन करणारा शंकर मी आहे, आणि अखंड बोधरुप, सर्वांचा साक्षी ज्याला कोणी नियंता नाहीं आणि अहंता व ममता यांनी रहित असा मी आहे.

**सर्वेषु भूतेष्वहमेव संस्थितो ज्ञानात्मनाऽन्तर्बहिराश्रयः सन्**
**भोक्ता च भोग्यं स्वयमेव सर्वं यद्यत्पृथग्दृष्टमिदन्तया पुरा ।।४९६।।**
आत बाहेर सर्वांना आश्रयभूत असा सर्व भूतांमध्ये ज्ञानरुपाने राहिलो आहे. भोक्ता भोग्य आणि प्रथम जे जे कांहीं 'हे आहे' अशा प्रकारे पाहण्यात येत होते, ते सर्व मी स्वतःच आहे.

**मय्यखण्डसुखाम्भोधौ बहुधा विश्ववीचयः**
**उत्पद्यन्ते विलीयन्ते मायामारुतविभ्रमात् ।।४९७।।**
अखंडसुखाचा समुद्र अशा मजवर मायारुप वायूच्या विलासाने अनेक प्रकारच्या जगद्रूप लहरी उठतात, आणि लयास जातात.

**स्थुलादिभावा मयि कल्पिता भ्रमा- दारोपितानुस्फुरणेन लोकैः**
**काले यथा कल्पकवत्सराय- णर्त्वा दयो निष्कलनिर्विकल्पे ।।४९८।।**
काल हा अंश व भेद यांनी रहित असूनही लोकांनी कल्प, वर्ष, अयन, ऋतु इत्यादिक त्याचे अंश जसे कल्पिले आहेत, तद्वत अंशरहित आणि भेदरहित अशा मजवर भासणारे स्थूलपणा, कृशता इत्यादिक धर्म, लोकांनी भ्रांतीने कल्पिलेले आहेत.

**आरोपितं नाश्रयदूषकं भवेत् कदापि मूढैरतिदोषदूषितैः**
**नार्द्रिकरोत्यूषरभूमिभागं मरीचिकावारि महाप्रवाहः ।।४९९।।**
अतिशय दोषांनी युक्त अशा मूढ जनांनी कल्पिलेला पदार्थ आपल्या अधिष्ठानाला दूषित करणारा असा कधीही असत नाहीं, मृगजलाचा मोठाही प्रवाह उखर भूमीच्या भागाला भिजवीत नाहीं.

**आकाशवल्लेपविदूरगोऽहं आदित्यवद्भास्यविलक्षणोऽहम्**
**अहार्यवन्नित्यविनिश्चलोऽहं अम्भोधिवत्पारविवर्जितोऽहम् ।।५००।।**
मी आकाशाप्रमाणे निरंतर स्थिर आहे, सूर्याप्रमाणे प्रकाश्य वस्तूहुन वेगळा आहे, पर्वताप्रमाणे निरंतर स्थिर आहे आणि समुद्राप्रमाणे अपरंपार आहे.

**न मे देहेन सम्बन्धो मेघेनेव विहायसः**

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

**अतः कुतो मे तद्धर्मा जाग्रत्स्वप्नसुषुप्तयः ||५०१||**

आकाशाचा जसा ढगांशी संबंध नाहीं, तद्वत माझा देहाशी संबंध नाहीं.
म्हणूनच जागृति, स्वप्न, सुषुप्ति या देहधर्मांशी माझा संबंध कोठून असणार?

**उपाधिरायाति स एव गच्छति स एव कर्माणि करोति भुङ्क्ते**
**स एव जीर्यन् म्रियते सदाहं कुलाद्रिवन्निश्चल एव संस्थितः ||५०२||**

उपाधि म्हणून जी आहे तीच येते, तीच जाते, तोच कर्मे करतो,
तोच त्यांची फळे भोगतो आणि तोच जीर्ण झाला म्हणजे मरण पावतो.
मी कुलपर्वताप्रमाणे निरंतर निश्चल राहिलो आहे.

**न मे प्रवृत्तिर्न च मे निवृत्तिः सदैकरुपस्य निरंशकस्य**
**एकात्मको यो निविडो निरन्तरो व्योमेव पूर्णः स कथं नु चेष्यते ||५०३||**

सदा एकरुप आणि अंशरहित अशा माझ्या अंगी प्रवृत्ति नाहीं आणि निवृत्तिही नाहीं.
जो एकरुप, निबिड, अंतरहित, आणि आकाशासारखा परिपूर्ण तो कसा कांहीं व्यापार करील?

**पुण्यानि पापनि निरिन्द्रियस्य निश्चेतसो निर्विकृतेर्निराकृतेः**
**कुतो ममाखण्डसुखानुभूतेः ब्रूते ह्यनन्वागतमित्यपि श्रुतिः ||५०४||**

इंद्रियरहित, चित्तरहित, निर्विकार, निराकार आणि अखंडसुखानुभवरुप अशा मला पापपुण्य कोठून असणार? ''अनन्वागतं पुण्येनानन्वागतं पापेन'' ही श्रुति देखील हेच सांगत आहे.

**छायया स्पृष्टमुष्णं वा शीतं वा सुष्ठु दुःष्ठु वा**
**न स्पृशत्येव यत्किञ्चित्पुरुषं तद्विलक्षणम् ||५०५||**

छायेने स्पर्श केलेली शीत, उष्ण, बरी किंवा वाईट वस्तु तिच्याहून
वेगळा असणाऱ्या पुरुषाला यत्किंचितही स्पर्श करीत नाहीं.

**न साक्षिणं साक्ष्यधर्माः संस्पृशन्ति विलक्षणम्**
**अविकारमुदासीनं गृहधर्माः प्रदीपवत् ||५०६||**

किंवा जसे घराचे धर्म दिव्याला स्पर्श करीत नाहींत, तद्वत साक्ष पदार्थांचे धर्म साक्षी पुरुषाला स्पर्श करीत नाहींत, कारण, तो विकाररहित, उदासीन आणि साक्ष पदार्थांहून अगदी वेगळा आहे.

**रवेर्यथा कर्मणि साक्षिभावो वह्नेर्यथा दाहनियामकत्वम्**
**रज्जोर्यथाऽऽरोपितवस्तुसङ्गः तथैव कूटस्थचिदात्मनो मे ||५०७||**

कूटस्थ आणि चैतन्यरुप असा माझा साक्षीपणा, सूर्याचा जसा सर्व कर्मात साक्षीपणा तसा आहे माझा नियामकपणा, अग्नीचा जसा दाह करण्यात नियामकपणा तद्वत आहे, आणि माझा आरोपित वस्तूंशी संबंध, रज्जूचा जसा आरोपित रज्जुशी संबंध तद्वत आहे.

**कर्तापि वा कारयितापि नाहं भोक्तापि वा भोजयितापि नाहम्**
**द्रष्टापि वा दर्शयितापि नाहं सोऽहं स्वयंज्योतिरनीदृगात्मा ||५०८||**

मी कर्ता किंवा करविता नाहीं. मी भोगणारा किंवा भोगविणारा नाहीं.
मी पाहणारा किंवा दाखवणारा नाहीं. तर मी स्वयंप्रकाश आणि अनिर्वचनीय आहे.

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

**चलत्युपाधौ प्रतिबिम्बलौल्य- मौपाधिकं मूढधियो नयन्ति**
**स्वबिम्बभूतं रविवद्विनिष्क्रियं कर्तास्मि भोक्तास्मि हतोऽस्मि हेति ||५०९||**
ज्यांच्या बुद्धीला मोह झालेला, असे लोक उपाधिचे चलनवलन झाले असता
त्या उपाधिच्या संबंधाने प्रतिबिंबाच्या अंगी आलेल्या चलनवलनाला मी कर्ता आहे,
मी भोक्ता आहे, हाय हाय माझा अमक्याने नाश केला अशा प्रकारे,
बिंबभूत जे सूर्यासारखे क्रियारहित आहे, त्याचे ठिकाणी मानतात.
**जले वापि स्थले वापि लुठत्वेष जडात्मकः**
**नाहं विलिप्ये तद्धर्मैर्घटधर्मैर्नभो यथा ||५१०||**
हा जडपदार्थमय देह उदकात किंवा भूमीवर खुशाल लोळो ! जसे आकाश
घटाच्या धर्मांनी लिप्त होत नाहीं, तद्वत मी या देहाच्या धर्मांनी लिप्त होत नाहीं.
**कर्तृत्वभोक्तृत्वखलत्वमत्तता- जडत्वबद्धत्वविमुक्ततादयः**
**बुद्धेर्विकल्पा न तु सन्ति वस्तुतः स्वस्मिन्परे ब्रह्मणि केवलेऽद्वये ||५११||**
कर्तृत्व, भोक्तृत्व, दुष्टत्व, उन्मत्तत्व, जाड्य, बद्धत्व आणि मुक्तत्व
इत्यादि विकल्प बुद्धीचे आहेत. म्हणूनच केवल आणि अद्वितीय अशा
स्वरुपभूत परब्रह्माचे ठायी हे विकल्प वस्तुतः मुळीच नाहींत.
**सन्तु विकाराः प्रकृतेर्दशधा शतधा सहस्रधा वापि**
**किं मेऽसङ्गचितस्तैर्न घनः क्वचिदम्बरं स्पृशति ||५१२||**
प्रकृतीचे विकार दहा असोत, शेकडो असोत, किंवा हजारो असोत, असंग आणि
चैतन्यरुप मला त्या योगाने काय होणार? कारण ढग कधीही आकाशाला स्पर्श करु
शकत नाहींत, तद्वत मलाही ते स्पर्श करु शकत नाहींत.
**अव्यक्तादिस्थूलपर्यन्तमेतत् विश्वं यत्राभासमात्रं प्रतीतम्**
**व्योमप्रख्यं सूक्ष्ममाद्यन्तहीनं ब्रह्माद्वैतं यत्तदेवाहमस्मि ||५१३||**
आकाशासारखे सूक्ष्म, आदि आणि अंत यांनी रहित, असे अव्यक्तापासून
ते स्थूल पदार्थांपर्यंत सकल जगत जेथे केवळ आभासमात्र दिसते,
असे जे अद्वितीय ब्रह्म तेच मी आहे.
**सर्वाधारं सर्ववस्तुप्रकाशं सर्वाकारं सर्वगं सर्वशून्यम्**
**नित्यं शुद्धं निश्चलं निर्विकल्पं ब्रह्माद्वैतं यत्तदेवाहमस्मि ||५१४||**
सर्वांचा आधार, सर्व वस्तूंना प्रकाशित करणारे, सर्वमय, सर्वगत, सर्व वस्तूंनी
रहित, नित्य शुद्ध, निश्चल आणि निर्विकल्प असे अद्वितीय ब्रह्म तेच मी आहे.
**यत्प्रत्यस्ताशेषमायाविशेषं प्रत्यग्रूपं प्रत्ययागम्यमानम्**
**सत्यज्ञानानन्तमानन्दरुपं ब्रह्माद्वैतं यत्तदेवाहमस्मि ||५१५||**
प्रत्यग्रूप, इंद्रियांच्या योगाने जाणण्यास अशक्य, सच्चिदानंदरुप, अनंत आणि जेथे
मायेचा कोणत्याही प्रकारचा संबंध नाहीं, असे जे अद्वितीय ब्रह्म, तेच मी आहे.
**निष्क्रियोऽस्म्यविकारोऽस्मि निष्कलोऽस्मि निराकृतिः**
**निर्विकल्पोऽस्मि नित्योऽस्मि निरालम्बोऽस्मि निर्द्वयः ||५१६||**
मी क्रियारहित, विकाररहित, अवयवरहित, आकाररहित, विकल्परहित,
अवलंबनरहित, द्वैतरहित आणि नित्य असा आहे.

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

**सर्वात्मकोऽहं सर्वोऽहं सर्वातीतोऽहमद्वयः**
**केवलाखण्डबोधोऽहमानन्दोऽहं निरन्तरः ।।५१७।।**

मी सर्वात्मक आहे, सर्वरुप आहे, सर्वां पलीकडचा आहे, अद्वितीय आहे,
केवळ अखंड बोधरुप आहे, आणि निरंतर आनंदरुप आहे.

**स्वाराज्यसाम्राज्यविभूतिरेषा भवत्कृपाश्रीम हिमप्रसादात्**
**प्राप्ता मया श्रीगुरवे महात्मने नमो नमस्तेऽस्तु पुनर्नमोऽस्तु ।।५१८।।**

ज्या आपल्या कृपेच्या (उत्तम महात्म्याच्या ) प्रसादाने मला हे ब्रह्मानंदरुप साम्राज्याचे ऐश्वर्य प्राप्त झाले. त्या महासमर्थ सद्गुरुरुप आपणाला माझा वारंवार नमस्कार असो.

**महास्वप्ने मायाकृतजनिजरामृत्युगहने**
**भ्रमन्तं क्लिश्यन्तं बहुलतरतापैरनुदिनम्**
**अहंकारव्याघ्रव्यथितमिममत्यन्तकृपया**
**प्रबोध्य प्रस्वापात्परमवितवान्मामसि गुरो ।।५१९।।**

गुरुराज, मोठ्या स्वप्नात असलेला, मायेने प्रकट केलेल्या जन्मजरामरणरुप बिकट अरण्यामध्ये भ्रमण करणारा, प्रतिदिवशी अतिशय तापांनी क्लेश पावणारा आणि अहंकाररुप वाघापासून अतिशय उपद्रव पावलेला अशा या मला अतिशय दयेने आपण निद्रेतून जागृत करुन चांगले बचावले.

**नमस्तस्मै सदैकस्मै कस्मैचिन्महसे नमः**
**यदेतद्विश्वरुपेण राजते गुरुराज ते ।।५२०।।**

गुरुराज ! वाणी व मनाला अगोचर, निरंतर एक रुपाने राहणारे आणि जे जगद्रूपाने भासत आहे, अशा त्या आपल्या ज्योतिःस्वरुपाला वारंवार नमस्कार असो.

**इति नतमवलोक्य शिष्यवर्यं समधिगतात्मसुखं प्रबुद्धतत्त्वम्**
**प्रमुदितहृदयं स देशिकेन्द्रः पुनरिदमाह वचः परं महात्मा ।।५२१।।**

याप्रमाणे ज्याला तत्त्व समजले आणि आत्मसुखाचा लाभ झाला, अशा त्या उत्कृष्ट शिष्याला, नम्र झालेला पाहुन हृदयात हर्ष पावलेले ते महासमर्थ गुरुराज पुन्हा पुढे सांगितल्याप्रमाणे उत्तम वचन बोलले.

**ब्रह्मप्रत्ययसन्ततिर्जगदतो ब्रह्मैव तत्सर्वतः**
**पश्याध्यात्मदृशा प्रशान्तमनसा सर्वास्ववस्थास्वपि**
**रुपादन्यदवेक्षितं किमभितश्चक्षुष्मतां दृश्यते**
**तद्वद्ब्रह्मविदः सतः किमपरं बुद्धेर्विहारास्पदम् ।।५२२।।**

हे जगत, ब्रह्माच्या प्रतीतीचा प्रवाह आहे, यासाठी अतिशय शांत मनाने ज्ञानदृष्टीच्या योगाने सर्व ठिकाणी आणि सर्व अवस्थांमध्ये ब्रह्मच आहे, दुसरे कांहीं नाहीं, असे तू पहात जा. जसे डोळस पुरुषाच्या चारी बाजूस जे पाहण्यात येते ते रुपावाचून दुसरे कांहीं नसते, तद्वत ब्रह्मवेत्त्याला बुद्धीच्या विहाराचे स्थान ब्रह्मावाचून दुसरे कांहीं नाहीं.

**कस्तां परानन्दरसानुभूति- मुत्सृज्य शून्येषु रमेत विद्वान्**
**चन्द्रे महाह्लादिनि दीप्यमाने चित्रेन्दुमालोकयितुं क इच्छेत् ।।५२३।।**

कोण विद्वान् पुरुष या परमानंदाचा अनुभव घेण्याचे सोडून

V
**pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files**
**Get yours now!**
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

शून्य वस्तूंचे ठायी रत होईल? अतिशय आल्हाद देणारा चंद्र प्रकाशमान असता चित्रातील चंद्राला कोण पाहू इच्छिल?

**असत्पदार्थानुभवेन किञ्चिन् न ह्यस्ति तृप्तिर्न च दुखःहानिः**
**तदद्वयानन्दरसानुभूत्या तृप्तः सुखं तिष्ठ सदात्मनिष्ठया ।।५२४।।**

मिथ्या पदार्थांच्या अनुभवापासून किंचित देखील तृप्ति किंवा दुःखाची हानी होत नाहीं. यासाठी तू अद्वितीय आनंदरसाच्या अनुभवाने तृप्त होऊन आत्मनिष्ठेच्या योगाने निरंतर सुखाने रहा.

**स्वमेव सर्वथा पश्यन्मन्यमानः स्वमद्वयम्**
**स्वानन्दमनुभुञ्जानः कालं नय महामते ।।५२५।।**

महाबुद्धिमतां ! तू सर्व प्रकारे स्वतःलाच पहात, स्वतःलाच अद्वितीय मानीत आणि स्वानंदाचा अनुभव करत कालपेक्ष कर.

**अखण्डबोधात्मनि निर्विकल्पे विकल्पनं व्योम्नि पुरप्रकल्पनम्**
**तदद्वयानन्दमयात्मना सदा शान्तिं परामेत्य भजस्व मौनम् ।।५२६।।**

अखंडबोधरुप आणि निर्विकल्प अशा आत्म्याचे ठायी विकल्प (भेद) मानणे हे आकाशात नगराची कल्पना करण्यासारखे आहे. यासाठी तू निरंतर आनंदमयरुपाने परम शांतिरुप पावून मौन धर.

**तूष्णीमवस्था परमोपशान्तिः बुद्धेरसत्कल्पविकल्पहेतोः**
**ब्रह्मात्मनो ब्रह्मविदो महात्मनो यत्राद्वयानन्दसुखं निरन्तरम् ।।५२७।।**

मिथ्या पदार्थांच्या संकल्पविकल्पाला कारणभूत बुद्धीची परम शांति होणे याचे नाव मौन. हे मौन प्राप्त झाले असता ब्रह्माला ब्रह्मरुपाने जाणणाऱ्या महात्म्याला अद्वितीय आनंदसंबंधी सुख निरंतर मिळत असते.

**नास्ति निर्वासनान्मौनात्परं सुखकृदुत्तमम्**
**विज्ञातात्मस्वरुपस्य स्वानन्दरसपायिनः ।।५२८।।**

ज्याने आत्मस्वरुप जाणले, आणि जो स्वानंदरसाचे पान करु लागला अशा पुरुषाला वासनारहित मौनाहून वेगळे उत्तम सुखकर नाहीं.

**गच्छंस्तिष्ठन्नुपविशञ्छयानो वाऽन्यथापि वा**
**यथेच्छया वसेद्विद्वानात्मारामः सदा मुनिः ।।५२९।।**

आत्माराम आणि निरंतर मौन राखणारा विद्वान, आपल्या इच्छेस येईल त्याप्रमाणे राहतो, चालतो, उभा राहतो, बसतो, निद्रा घेतो आणि दुयऱ्या क्रियाही करतो.

**न देशकालासनदिग्यमादि- लक्ष्याद्यपेक्षाऽप्रतिबद्धवृत्तेः**
**संसिद्धतत्त्वस्य महात्मनोऽस्ति स्ववेदने का नियमाद्यवस्था ।।५३०।।**

प्रतिबंधरहित ज्याची वृत्ति आणि ज्याने तत्त्व उत्तम प्रकारे जाणले, अशा महात्म्याला देश, काल, आसन, दिशा, यम, नियम इत्यादिक साधनांची अपेक्षा नाहीं. स्वस्वरुप जाणण्याला नियमादिकांची काय जरुर आहे?

**घटोऽयमिति विज्ञातुं नियमः कोऽन्ववेक्षते**
**विना प्रमाणसुष्ठुत्वं यस्मिन्सति पदार्थधीः ।।५३१।।**
**अयमात्मा नित्यसिद्धः प्रमाणे सति भासते**

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

**न देशं नापि कालं न शुद्धिं वाप्यपेक्षते ।।५३२।।**

'हा घट आहे' असे जाणण्याला जशी नेत्रांच्या निर्मळपणावाचून दुसऱ्या कोणत्याही नियमाची अपेक्षा नाहीं, तसेच आत्म्याला जाणण्याला एक बुद्धीच्या शुद्धपणावाचून देश, काल, शरीरशुद्ध इत्यादिकांची बिलकुल अपेक्षा नाहीं. बुद्धि शुद्ध असेल तर हा नित्यशुद्ध आत्मा आपोआपच प्रकाशमान होतो.

**देवदत्तोऽहमोत्येतद्विज्ञानं निरपेक्षकम्**
**तद्वद्ब्रह्मविदोऽप्यस्य ब्रह्माहमिति वेदनम् ।।५३३।।**

'मी देवदत्त आहे' हे जाणण्याला जशी दुसऱ्या कोणाची अपेक्षा नाहीं, तद्वत 'मी ब्रह्म आहे' असे ब्रह्मवेत्त्याला जाणण्यालाही दुसऱ्या कोणाची अपेक्षा नाहीं.

**भानुनेव जगत्सर्वं भासते यस्य तेजसा**
**अनात्मकमसत्तुच्छं किं नु तस्यावभासकम् ।।५३४।।**

सूर्यासारख्या ज्याच्या तेजाने हे सर्व जग प्रकाशमान होते, त्या वस्तूला प्रकाशित करणारा पदार्थ जड, मिथ्या आणि तुच्छ असेल काय?

**वेदशास्त्रपुराणानि भूतानि सकलान्यपि**
**येनार्थवन्ति तं किन्नु विज्ञातारं प्रकाशयेत् ।।५३५।।**

वेद, शास्त्रे, पुराणे आणि सर्व पदार्थ ज्याच्या प्रकाशाने प्रकाशित होतात, त्या जाणत्या वस्तूचा प्रकाश कोणत्या दुसऱ्या वस्तू पासून होणार?

**एष स्वयंज्योतिरनन्तशक्तिः आत्माऽप्रमेयः सकलानुभूतिः**
**यमेव विज्ञाय विमुक्तबन्धो जयत्ययं ब्रह्मविदुत्तमोत्तमः ।।५३६।।**

हा आत्मा स्वयंप्रकाश आहे, अनंत शक्तिमान आहे, प्रमाणाच्या योगाने अगम्य आहे, आणि सकल वस्तूंचा अनुभवरुप आहे. सर्वात उत्तम ब्रह्मवेत्ता या आत्म्याला जाणून बंधमुक्त होत्साता जयजयकार पावतो.

**न खिद्यते नो विषयैः प्रमोदते न सज्जते नापि विरज्यते च**
**स्वस्मिन्सदा क्रीडति नन्दति स्वयं निरन्तरानन्दरसेन तृप्तः ।।५३७।।**

निरंतर आनंदरसाने तृप्त झालेला ब्रह्मवेत्ता, विषयांचा अभाव झाल्यास खेद पावत नाहीं, विषयांच्या योगाने हर्ष पावत नाहीं, कोठे आसक्त होत नाहीं, व कोठे विरक्तही होत नाहीं, तर स्वतःच स्वस्वरुपी सदैव क्रीडा करीत असतो, आणि आनंद पावत असतो.

**क्षुधां देहव्यथां त्यक्त्वा बालः क्रीडति वस्तुनिः**
**तथैव विद्वान् रमते निर्ममो निरहं सुखी ।।५३८।।**

बालक जसा भूक आणि शरीरपीडा यांना विसरुन खेळण्याच्या वस्तूने खेळत असतो, तद्वत विद्वान अहंता आणि ममता यांना सोडून सुखी होत्साता सर्वाला विसरुन स्वस्वरुपी रमतो.

**चिन्ताशून्यमदैन्यभैक्षमशनं पानं सरिद्वारिषु**
**स्वातन्त्र्येण निरंकुशा स्थितिरभीर्निद्रा श्मशाने वने**
**वस्त्रं क्षालनशोषणादिरहितं दिग्वास्तु शय्या मही**
**संचारो निगमान्तवीथिषु विदां क्रीडा परे ब्रह्मणि ।।५३९।।**

ब्रह्मवेत्ते पुरुष चिंता आणि दैन्य यावाचून मिळालेली भिक्षा खातात, नदीचे पाणी

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

पितात, स्वातंत्र्य असल्यामुळे निरंकुश राहतात, स्मशानात किंवा वनात निर्भयपणे निद्रा घेतात, ज्यांना धुण्याची किंवा वाळत घालण्याची गरज नाहीं अशी दिशारुप वस्त्रे नेसतात, घरातील शेजेप्रमाणे भूमीवर शयन करतात, वेदांतरुप मार्गामध्ये संचार करतात आणि परब्रह्माचे ठायी क्रीडा करतात.

**विमानमालम्ब्य शरीरमेतद् भुनक्त्यशेषान्विषयानुपस्थितान्**
**परेच्छया बालवदात्मवेत्ता योऽव्यक्तलिङ्गोऽननुषक्तबाह्यः ||५४०||**

ज्याचे जातिकुल वगैरे उघड दिसत नाहीं, असा बाह्यलक्षणांचा परित्याग करणारा ब्रह्मवेत्ता या शरीरारुप विमानात राहून दुसऱ्याच्या इच्छेने आलेल्या सर्व विषयांना मुलाप्रमाणे सेवन करतो.

**दिगम्बरो वापि च साम्बरो वा त्वगम्बरो वापि चिदम्बरस्थः**
**उन्मत्तवद्वापि च बालवद्वा पिशाचवद्वापि चरत्यवन्याम् ||५४१||**

चैतन्यरुप आकाशात राहिलेला ब्रह्मवेत्ता वस्त्र नेसून, वल्कले नेसून अथवा नग्नपणानेच वेड्यासारखा (उन्मत्त), मुलासारखा किंवा पिशाचासारखा पृथ्वीवर फिरतो.

**कामान्निष्कामरुपी संश्चरत्येकचारो मुनिः**
**स्वात्मनैव सदा तुष्टः स्वयं सर्वात्मना स्थितः ||५४२||**

एकटा फिरणारा, निरंतर स्वस्वरुपाच्या योगानेच तृप्त राहणारा आणि स्वतः सर्व रुपाने राहिलेला ब्रह्मवेत्ता निष्कामपणाने विषयांचे सेवन करतो.

**क्वचिन्मूढो विद्वान् क्वचिदपि महाराजविभवः**
**क्वचिद्भ्रान्तः सौम्यः क्वचिदजगराचारकलितः**
**क्वचित्पात्रीभूतः क्वचिदवमतः क्वाप्यविदितः**
**चरत्येवं प्राज्ञः सततपरमानन्दसुखितः ||५४३||**

निरंतर परम आनंदाने सुख पावलेला ब्रह्मवेत्ता कोठे विद्वान् होऊन, कोठे मूढ होऊन, कोठे मोठ्या राजाचे वैभव संपादन करणारा होऊन, कोठे भ्रमिष्ट होऊन, कोठे सभ्य गृहस्थ होऊन, कोठे अजगरासारख्या वृत्तिचा होऊन, कोठे सत्पात्र होऊन अथवा कोठे अपमान पावून कोठे कोणाला ओळखता न येईल
अशा रीतीने संचार करीत असतो.

**निर्धनोऽपि सदा तुष्टोऽप्यसहायो महाबलः**
**नित्यतृप्तोऽप्यभुञ्जानोऽप्यसमः समदर्शनः ||५४४||**
**अपि कुर्वन्नकुर्वाणश्चाभोक्ता फलभोग्यपि**
**शरीर्यप्यशरीर्येष परिच्छिन्नोऽपि सर्वगः ||५४५||**

ब्रह्मवेत्ता निर्धन असताही निरंतर संपुष्ट असतो, कोणी सहाय नसताही मोठा सामर्थ्यवान असतो, विषय न भोगताही निरंतर तृप्त असतो,
सर्वांहून विलक्षण असताही सर्वत्र
समदृष्टी ठेवणारा असतो, करित असताही कर्ता नसतो, फलांना भोगीत असताही भोक्ता नसतो, देहधारी असताही देहरहित असतो, आणि परिच्छिन्न असताही व्यापक असतो.

**अशरीरं सदा सन्तमिमं ब्रह्मविदं क्वचित्**
**प्रियाप्रिये न स्पृशतस्तथैव च शुभाशुभे ||५४६||**

V
pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

निरंतर शरीरावरच्या अभिमानाला सोडून राहणाऱ्या ब्रह्मवेत्त्याला कधीही सुखदुःखे किंवा पुण्यपातके स्पर्श करीत नाहींत.

**स्थूलादिसम्बन्धवतोऽभिमानिनः सुखं च दुःखं च शुभाशुभे च**
**विध्वस्तबन्धस्य सदात्मनो मुनेः कुतः शुभं वाऽप्यशुभं फलं वा ||५४७||**

स्थूलादिक शरीरांशी संबंध बाळगणाऱ्याला व त्यावर अभिमान ठेवणाराला सुखदुःखे किंवा पुण्यपातके लागू आहेत. पण ज्याने अभिमानरुप बंधनालाच तोडून टाकले अशा ब्रह्मस्वरुपी मुनीला पुण्यपातके व त्याची फले कोठून लागू असणार?

**तमसा ग्रस्तवद्भानादग्रस्तोऽपि रविर्जनैः**
**ग्रस्त इत्युच्यते भ्रान्त्यां ह्यज्ञात्वा वस्तुलक्षणम् ||५४८||**
**तद्वद्देहादिबन्धेभ्यो विमुक्तं ब्रह्मवित्तमम्**
**पश्यन्ति देहिवन्मूढाः शरीराभासदर्शनात् ||५४९||**

सूर्य वस्तुतः राहूने ग्रासलेला नसतो तथापि तो ग्रासल्यासारखा भासतो, म्हणून लोक सूर्याच्या खऱ्या स्थितीला न जाणता त्याला राहूने ग्रासले असे म्हणतात. तद्वत उत्तम ब्रह्मवेत्ता वस्तुतः देहादिक बंधनातून मुक्त असताही मूढ लोक त्याच्या खऱ्या स्थितीला न जाणता शरीराचा आभास दिसतो तेवढ्यावरुन त्या मुनीला शरीरी समजतात.

**अहिर्निर्ल्वयनीं वायं मुक्त्वा देहं तु तिष्ठति**
**इतस्ततश्चाल्यमानो यत्किञ्चित्प्राणवायुना ||५५०||**

सर्प जसा कात टाकून राहतो, तद्वत ब्रह्मवेत्ता देहाच्या अभिमानाला सोडून राहतो. या ब्रह्मवेत्त्याच्या देहाला प्राणवायूच थोडेबहुत इकडे तिकडे चाळवीत असतो.

**स्त्रोतसा नीयते दारु यथा निम्नोन्नतस्थलम्**
**दैवेन नीयते देहो यथाकालोपभुक्तिषु ||५५१||**

उदकाचा प्रवाह ज्याप्रमाणे लाकडाला उंच सखल ठिकाणी घेऊन जातो, तद्वत प्रारब्ध कर्म ब्रह्मवेत्त्याच्या देहाला जसा जसा ज्याचा समय प्राप्त झाला असेल त्या भोगाकडे घेऊन जाते.

**प्रारब्धकर्मपरिकल्पितवासनाभिः संसारिवच्चरति भुक्तिषु मुक्तदेहः**
**सिद्धः स्वयं वसति साक्षिवदत्र तूष्णीं चक्रस्य मूलमिव कल्पविकल्पशून्यः ||५५२||**

मुक्त पुरुषाचा देह प्रारब्ध कर्माने कल्पिलेल्या वासनानी, भोगांकडे संसारी पुरुषाप्रमाणे वळत असतो; पण संकल्पविकल्परहित असा मुक्त पुरुष त्या देहामध्ये चाकाच्या मध्यबिंदूप्रमाणे व साक्षीप्रमाणे स्वतः गुपचूप राहतो.

**नैवेन्द्रियाणि विषयेषु नियुक्तं एष नैवापयुंक्त उपदर्शनलक्षणस्थः**
**नैव क्रियाफलमपीषदवेक्षते स स्वानन्दसान्द्ररसपानसुमत्तचित्तः ||५५३||**

साक्षीप्रमाणे राहिलेला आणि स्वरुपानंद संबंधी घन रस प्यायल्यामुळे आनंदीत झालेला ब्रह्मवेत्ता इंद्रियांना विषयांकडे योजित नाहीं, किंवा विषयांकडून परतवीत नाहीं व कर्माच्या फलाकडे किंचितही पहात नाहीं.

**लक्ष्यालक्ष्यगतिं त्यक्त्वा यस्तिष्ठेत्केवलात्मना**

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

**शिव एव स्वयं साक्षादयं ब्रह्मविदुत्तमः ।।५५४।।**

स्थूल, सूक्ष्म शरीरावरचा अभिमान टाकून जो पुरुष केवलरुपाने राहतो, तो पुरुष स्वतःच साक्षात शंकर आहे आणि ब्रह्मवेत्त्यात अग्रगण्य आहे, असे समजावे.

**जीवन्नेव सदा मुक्तः कृतार्थो ब्रह्मवित्तमः**
**उपाधिनाशाद्ब्रह्मैव सन् ब्रह्माप्येति निर्द्वयम् ।।५५५।।**

उत्कृष्ट ब्रह्मवेत्ता जिवंत असताच सदा मुक्त आहे; आणि कृतार्थ आहे. हा जीवन्मुक्त पुरुष, उपाधिचा नाश होतो तेव्हां, ब्रह्मरुपानेच अद्वितीय ब्रह्माला प्राप्त होतो.

**शैलूषो वेषसद्भावाभावयोश्च यथा पुमान्**
**तथैव ब्रह्मविच्छ्रेष्ठः सदा ब्रह्मैव नापरः ।।५५६।।**

नट (स्त्रीचा) वेष घेतलेला असो की नसो, तो जसा सदैव पुरुष असतो. तद्वत उत्कृष्ट ब्रह्मवेत्ता सदैव ब्रह्मरुपच असतो वेगळा नसतो.

**यत्र क्वापि विशीर्णं सत्पर्णमिव तरोर्वपुः पततात्**
**ब्रह्मीभूतस्य यतेः प्रागेव तच्चिदग्निना दग्धम् ।।५५७।।**

ब्रह्मरुप झालेल्या पुरुषाचे शरीर झाडाच्या पानाप्रमाणे गळून कोठेही पडो, त्याची कांहीं त्याला चिंता नसते. कारण, ते त्याचे शरीर पूर्वीच चैतन्यरुप अग्नीने जाळून टाकलेले असते.

**सदात्मनि ब्रह्मणि तिष्ठतो मुनेः पूर्णाऽद्वयानन्दमयात्मना सदा**
**न देशकालाद्युचितप्रतीक्षा त्वङ्मांसविट्पिण्डविसर्जनाय ।।५५८।।**

पूर्ण, अद्वितीय आणि आनंदमयरुपाने सद्रूप ब्रह्माचे ठायी निरंतर राहणाऱ्या मुनिला त्वचा, मांस आणि विष्ठा यांचा पिंड (देह) टाकण्याला देश, काल इत्यादिकांच्या योग्यतेची अपेक्षा नसते.

**देहस्य मोक्षो नो मोक्षो न दण्डस्य कमण्डलोः**
**अविद्याहृदयग्रन्थिमोक्षो मोक्षो यतस्ततः ।।५५९।।**

देहाचा, दंडाचा किंवा कमंडलूचा त्याग करणे हा मोक्ष नव्हे तर हृदयातील अविद्यारुप ग्रंथी सोडणे हाच मोक्ष होय.

**कुल्यायामथ नद्यां वा शिवक्षेत्रेऽपि चत्वरे**
**पर्णं पतति चेत्तेन तरोः किं नु शुभाशुभम् ।।५६०।।**

कालव्यात, नदीत, शंकराच्या देवालयात किंवा चव्हाट्यात जर पान पडेल तर त्या योगाने झाडाला कांहीं शुभ किंवा अशुभ आहे? (कांहीं नाहीं.)

**पत्रस्य पुष्पस्य फलस्य नाशवद्- देहेन्द्रियप्राणधियां विनाशः**
**नैवात्मनः स्वस्य सदात्मकस्या- नन्दाकृतेर्वृक्षवदस्ति चैषः ।।५६१।।**

देह इंद्रिये, प्राण आणि बुद्धि यांचा पान, फूल आणि फल यांच्याप्रमाणे नाश होतो. पण पान, फूल फल इत्यादिकांबरोबर जसा वृक्षाचा नाश होत नाहीं, तद्वत देह, इंद्रिये प्राण आणि बुद्धि या बरोबर सच्चिदानंदरुप स्वकीय आत्म्याचा विनाश होत नाहींच.

**प्रज्ञानघन इत्यात्मलक्षणं सत्यसूचकम्**
**अनूद्यौपाधिकस्यैव कथयन्ति विनाशनम् ।।५६२।।**

श्रुति, आत्मा प्रज्ञानघन आहे. अशा प्रकारे आत्म्याच्या सत्यत्वसूचक लक्षणाचा

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S

अनुवाद करुन उपाधिच्या संबंधाने प्राप्त झालेल्या देहादिकांचा मात्र नाश सांगत आहे.

**अविनाशी वा अरेऽयमात्मेति श्रुतिरात्मनः**
**प्रब्रवीत्यविनाशित्वं विनश्यत्सु विकारिषु ।।५६३।।**

'अविनाशी वा अरेऽयमात्मा' ही श्रुति विकारी पदार्थांचा नाश होत असताही आत्म्याच्या अविनाशीपणाचा उपदेश करीत आहे.

**पाषाणवृक्षतृणधान्यकङङ्कराद्या दग्धा भवन्ति हि मृदेव यथा तथैव**
**देहेन्द्रियासुमन आदि समस्तदृश्यं ज्ञानाग्निदग्धमुपयाति परात्मभावम् ।।५६४।।**

दगड, झाडे, गवत, धान्य, भुसकट इत्यादिक पदार्थ जळले असता जसे मृत्तिकारुपच होतात. तद्वत देह, इंद्रिये, प्राण, मन इत्यादिक सर्व दृश्य वस्तु ज्ञानाग्नीने जळल्या असता परमात्मरुपाला प्राप्त होतात.

**विलक्षणं यथा ध्वान्तं लीयते भानुतेजसि तथैव सकलं दृश्यं ब्रह्मणि प्रविलीयते ।।५६५।।**

अंधःकार प्रकाशाहून अगदी वेगळा असताही जसा सूर्याच्या प्रकाशात लय पावतो. तद्वत सकल दृश्य वस्तु ब्रह्माहुन अगदी वेगळ्या असताही ब्रह्माचे ठायी लय पावतात.

**घटे नष्टे यथा व्योम व्योमैव भवति स्फुटम् तथैवोपाधिविलये ब्रह्मैव ब्रह्मवित्स्वयम्।।५६६।।**

घडा फुटला असता त्यातील आकाश जसे व्यक्तपणे आकाशच होते, तद्वत उपाधिचा लय झाला असता ब्रह्मवेत्ता स्वतः ब्रह्मच होतो.

**क्षीरं क्षीरे यथा क्षिप्तं तैलं तैले जलं जले**
**संयुक्तमेकतां याति तथाऽऽत्मन्यात्मविन्मुनिः ।।५६७।।**

जसे दूध दूधात, तेल तेलात, पाणी पाण्यात मिळविले असता एकरुप होते, तद्वत ब्रह्मवेत्ता मुनि ब्रह्माचे ठायी मिळाला म्हणजे एकरुप होतो.

**एवं विदेहकैवल्यं सन्मात्रत्वमखण्डितम् ब्रह्मभावं प्रपद्यैष यतिर्नावर्तते पुनः ।।५६८।।**

अशा प्रकारे जो अखंड सद्रूपपणा याचेच नाव विदेहकैवल्य. तस्मात संन्याशी अशा ब्रह्मरुपाला प्राप्त होऊन पुन्हा जन्ममरणाच्या फेऱ्यात येत नाहीं.

**सदात्मैकत्वविज्ञानदग्धाविद्यादिवर्ष्मणः अमुष्य ब्रह्मभूतत्वाद् ब्रह्मणः कुत उद्भवः।।५६९।।**

जीव आणि ब्रह्म यांच्या ऐक्यज्ञानाने या संन्याशाचे अविद्यादिक देह जळून गेल्यामुळे याला ब्रह्मरुपताच प्राप्त झालेली असते. तर मग ब्रह्माला जन्म कोठून संभवणार?

**मायाक्लृप्तौ बन्धमोक्षौ न स्तः स्वात्मनि वस्तुतः**
**यथा रज्जौ निष्क्रियायां सर्पाभासविनिर्गमौ ।।५७०।।**

क्रियारहित रज्जूचे ठायी सर्पाचा आभास आणि त्याचा निरास हे जसे पुरुषाने कल्पिलेले आहेत, तद्वत क्रियारहित सद्रूप आत्म्याचे ठायी बंध आणि मोक्ष मायेने कल्पिलेले आहेत (वस्तुतः नाहींत.)

**आवृतेः सदसत्त्वाभ्यां वक्तव्ये बन्धमोक्षणे नावृतिर्ब्रह्मणः काचिदन्याभावादनावृतम्**
**यद्यस्त्यद्वैतहानिः स्याद् द्वैतं नो सहते श्रुतिः ।।५७१।।**

आवरण असल्याने बंध होतो, आणि त्याचा नाश झाल्याने मोक्ष होतो, असे म्हटले पाहिजे. ब्रह्माला कोणत्याही प्रकारचे आवरण नाहीं. कारण, ब्रह्मावाचून दुसऱ्या वस्तूचा अभाव असल्यामुळे ते आवरणरहित आहे. दुसरी वस्तू आहे असे म्हणावे तर अद्वैताची हानि होते, आणि द्वैताला तर श्रुति मुळीच सहन करीत नाहीं.

pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa

**बन्धश्च मोक्षश्च मृषैव मूढा बुद्धेर्गुणं वस्तुनि कल्पयन्ति**
**दृगावृतिं मेघकृतां यथा रवौ यतोऽद्वयाऽसङ्गचिदेतदक्षरम् ||५७२||**

मेघाने केलेल्या दृष्टीच्या आवरणाची, मूढ लोक ज्याप्रमाणे सूर्याचे ठायी कल्पना करतात. तद्वत बंध आणि मोक्ष या बुद्धीच्या गुणांची मूढ लोक ब्रह्माचे ठायी कल्पना करतात. ब्रह्म तर अद्वैत, असंग चैतन्यरुप आणि अक्षर आहे. म्हणून त्याच्या ठिकाणी बंध किंवा मोक्ष मुळीच नाहींत.

**अस्तीति प्रत्ययो यश्च यश्च नास्तीति वस्तुनि**
**बुद्धेरेव गुणावेतौ न तु नित्यस्य वस्तुनः ||५७३||**

ब्रह्माचे ठायी बंध आहे, किंवा होता तो नाहींसा झाला, असे जे दोन प्रकारचे प्रत्यय ते बुद्धीचेच गुण आहेत. पण नित्यवस्तुरुप जे ब्रह्म त्याचे नव्हेत .

**आतस्तौ मायया क्लृप्तौ बन्धमोक्षौ न चान्मनि**
**निष्कले निष्क्रिये शान्ते निरवद्ये निरञ्जने**
**अद्वितीये परे तत्त्वे व्योमवत्कल्पना कुतः ||५७४||**

यासाठी बंध आणि मोक्ष हे मायेने कल्पिलेले आहेत. ते आत्म्याचे ठायी नाहींत. अवयवरहित, क्रियारहित, शांत, निर्दोष, निरंजन , अद्वितीय, आकाशाप्रमाणे असंग अशा परमतत्त्वरुप आत्म्याचे ठायी बंधमोक्षाची कल्पना कशी संभवणार.

**न निरोधो न चोत्पत्तिर्न बद्धो न च साधकः**
**न मुमुक्षुर्न वै मुक्त इत्येषो परमार्थता ||५७५||**

प्रलय नाहीं, उत्पत्ति नाहीं, बंध नाहीं, साधक नाहीं, मुमुक्षु नाहीं आणि मोक्षही नाहीं, हेच वास्तविक आहे.

**सकलनिगमचूडास्वान्तसिद्धान्तरुपं परमिदमतिगुह्यं दर्शितं ते मयाद्य**
**अपगतकलिदोषं कामनिर्मुक्तबुद्धिं स्वसुतवदसकृत्त्वां भाव्यित्वा मुमुक्षुम् ||५७६||**

हे शिष्या ! कलियुगासंबंधी दोष ज्याच्या अंगी नाहींत कामनारहित ज्याची बुद्धी आणि मुक्त होण्याची ज्याला इच्छा आहे, अशा तुला वारंवार आपल्या मुलाप्रमाणे मानून, सकल वेदांतातील मुख्य सार सिद्धांतरुप हे अति गुह्य परमतत्त्व मी तुला आज कथन केले.

**इति श्रुत्वा गुरोर्वाक्यं प्रश्रयेण कृतानतिः य तेन समनुज्ञातो ययौ निर्मुक्तबन्धनः ||५७७||**

अशा प्रकारचे गुरुंचे वचन ऐकून सकल बंधनातून मुक्त झालेला शिष्य प्रेमपूर्वक सद्‌गुरुंना नमस्कार करुन त्यांची आज्ञा मिळाल्यावर तेथून चालता झाला.

**गुरुरेव सदानन्दसिन्धौ निर्मग्नमानसः पावयन्वसुधां सर्वां विचचार निरन्तरः ||५७८||**

ब्रह्मानंदरुप समुद्रात ज्यांचे अंतःकरण सदैव निमग्न झाले असे सद्‌गुरु सकल पृथ्वीला पवित्र करीत संचार करु लागले.

**इत्याचार्यस्य शिष्यस्य संवादेनात्मलक्षणम् निरुपितं मुमुक्षुणां सुखबोधोपपत्तये ||५७९||**

मुमुक्षु जनांना सुखाने बोध होण्यासाठी वर सांगितल्याप्रमाणे गुरु आणि शिष्य यांच्या संवादरुपाने आत्मलक्षणाचे निरुपण केले.

**हितमिदमुपदेशमाद्रियन्तां विहितनिरस्तसमस्तचित्तदोषाः**
**भवसुखविरताः प्रशान्तचित्ताः श्रुतिरसिका यतयो मुमुक्षवो ये ||५८०||**

शास्त्रोक्त कर्माच्या योगाने ज्यांनी आपल्या चित्तातील सकल दोष नाहींसे केले आहेत,

V
pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
“Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sa


संसारसुखाचा ज्यांना वीट आला, ज्यांचे चित्त अतिशय शांत झाले, श्रुतीवर ज्यांची प्रीति फार, अशा प्रकारचे मुमुक्षुजन या हितकारक उपदेशाचा आदर करोत.

**संसाराध्वनि तापभानुकिरणप्रोद्भूतदाहव्यथा-**
**खिन्नानां जलकांक्षया मरुभुवि भ्रान्त्या परिभ्राम्यताम्**
**अत्यासन्नसुधाम्बुधिं सुखकरं ब्रह्माद्वयं दर्शय-**
**न्त्येषा शङ्करभारती विजयते निर्वाणसंदायिनी ||५८१||**

संसाररुप मार्गामध्ये तापत्रयरुप सूर्य किरणांपासून उत्पन्न झालेल्या दाहव्यथेने खेद पावलेले आणि थकवा आल्यामुळे निर्मल प्रदेशात उदकाच्या इच्छेने परिभ्रमण करणारे अशा संसारी लोकांना अतिशय समीप असलेल्या अद्वैतब्रह्मरुप सुखकर अमृतसमुद्राला दाखविणारी आणि परम सुख (मोक्ष) देणारी शंकराचार्यांनी वाणी जयजयकार पावत आहे.

**|| इति शंकराचार्यविरचितं विवेकचूडामणि समाप्त ||**

---




**समन्वय से समाधि**

**शुध्द ,स्थिर ,व्यापक आणि परिपूर्ण म्हणजे परमार्थ**


Kaivalya 924/30 Vishalnagar Hupari
Dist.Kolhapur (M.S.) India 416 203
www.vchindia.com Email:info@vinayanand.com
Ph.0230-2450365 Mob. 09325005525



pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWrite
product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.S